# पाऊल प्रगतीचे महाराष्ट्राच्या विकासाचे

आमचे मार्गदर्शक



मा.श्री.नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

महाराष्ट्र शासन

**औद्योगिक गुंतवणुकीतून लाखो रोजगार निर्मिती**
- दीड लाखांवर नवे रोजगार, समृद्धीचे नवे पर्व
- नव्या आयटी धोरणाची घोषणा; ५० हजार रोजगार
- फार्म टू फॅशन : अमरावती येथे टेक्स्टाईल पार्क
- शेंद्रा-बिडकिन मेगा औद्योगिक पार्क, औरंगाबाद
- मेक इन महाराष्ट्र; परवानगींची संख्या कमी
- राज्यात विक्रमी ६६००० कोटींची नवी गुंतवणूक

**शेतीच्या शाश्वत विकासासाठी**
- २०१९ पर्यंत महाराष्ट्राच्या दुष्काळमुक्तीचे उद्दिष्ट
- दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना २ रूपयांत गहू ३ रूपयांत तांदूळ
- आरोग्यसेवा, शिक्षणावर सवलत
- १ कोटींवर शेतकऱ्यांना ८५८२ कोटींची मदत
- दुष्काळ, आपत्तीमुळे झालेल्या नुकसान भरपाईसाठी ५०% ऐवजी ३३% नुकसानची अट
- ६ हजारांवर गावांमध्ये जलयुक्त शिवाराची १.२० लाख कामे ◆ कर्जाची फेररचना व्याज भरतंय सरकार.

**हे राज्य समतेचे**
- वर्षानुवर्षे रखडलेल्या इंदू मिल स्मारकाचे भूमिपूजन
- प्रत्येक जिल्ह्यात जातप्रमाणपत्र पडताळणी समिती
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन वास्तव्यातील घराची खरेदी ◆ २५ हजार आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळांत प्रवेश ◆ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५व्या जयंती वर्षासाठी रू.१२५ कोटी
- अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा २.५ वरून ६ लाखांवर.

**सुरक्षा रयतेची, भय मुक्त महाराष्ट्राची**
- मुंबई शहर सीसीटिव्हीच्या निगराणीखाली
- सीसीटीएनएस : सर्व पोलीस ठाणी ऑनलाईन करणारे पहिले राज्य ◆ पुणे, पिंपरी-चिंचवड सीसीटीव्हीच्या निगराणीत अपराधसिद्धतेचा दर ८ वरून ४२ टक्यांवर ◆ २.६ लाख पोलीसांना सुटीच्या दिवशी काम केल्यास पूर्ण वेतन

**स्वच्छ कारभार गतिमान सरकार**
- सेवाहमी-२४६ सेवा अधिसूचित ४६ सेवा ऑनलाईन
- सेवेत कसूर करणाऱ्यांना ५००० रूपयांपर्यंत दंड
- ३ लाखाहून अधिक रक्कमेच्या कामासाठी ई- टेंडर
- आपले सरकार-नागरिक-शासन सुसंवाद
- मुख्यमंत्री वॉर रूम २७ प्रकल्पांवर देखरेख

**तरूणांना कौशल्य प्रशिक्षण**
- राज्यात कौशल्य विकास व उद्योजकता विभागाची स्थापना, प्रमोद महाजन कौशल्य विकास कार्यक्रमासाठी रू.१६१ कोटी

**टोलमुक्ती**
- दोन टोल वगळता राज्य सरकारचे संपूर्ण टोलनाके बंद
- ५३ टोलनाक्यांवर कार, जीप, बसेसना सवलत

**एलबीटीमुक्ती**
- आश्वासन दिल्याप्रमाणे एलबीटी हटविली
- महापालिकांना सहाय्यक अनुदानातून प्रतिपूर्ती

**पाऊल प्रगतीचे पडे, नवा महाराष्ट्र घडे**
- मुख्यमंत्री ग्रामसडक योजना : रू.१४००० कोटींची योजना
- ३०००० किमीची रस्ते दुरूस्ती, ७०० किमीचे नवे मार्ग
- मुंबई रू.३५,४०० कोटींच्या चार नवीन मेट्रोंना मंजुरी
- मुंबई ट्रान्सहार्बर लिंक तसेच ३६ किमीच्या कोस्टल रोडला गती ◆ मुंबईत पायाभूत सुविधेचे अनेक प्रकल्प सुरू
- १९९७ पासून प्रलंबित नवी मुंबई विमानतळ मार्गी
- रू.३०००० कोटींचा नागपूर-मुंबई ८०० किमीचा नवा कम्युनिकेशन सुपर एक्सप्रेसवे
- १० शहरांचा स्मार्ट सिटी तसेच ४३ शहरांचा अमृत योजनेमध्ये समावेश

**सुलभ आणि उत्तम शिक्षण**
- दहावीच्या फेरपरीक्षेमुळे लाखावर विद्यार्थ्यांचे वर्ष वाचले
- दप्तराचे ओझे, कमी प्रवेश आणि शिक्षणशुल्क नियमन कायदा ◆ एम्स, आयआयएम, आयआयआयटीच्या माध्यमातून शिक्षणाची गंगोत्री ◆ मुंबई, औरंगाबाद, नागपूरात राष्ट्रीय विधी विद्यापीठ

**सामान्यांना सहारा, हक्काचा निवारा**
- शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाला रू.५०० कोटी
- झोपडपट्टी पुनर्वसन आणि परवडणाऱ्या किंमतीत प्रत्येकाला घर





माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - महाराष्ट्र शासन


# ९६ वे अखिल भारतीय मराठी नाट्य-संमेलन, ठाणे

**विशेषांक २०१६**

संपादक-
सत्यवान तेटांबे



८०/-रु.



बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक
जेथे जातो तेथे,
महाबँक माझा सांगाती
बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
Banking
Fund Transfer
Bill Pay
Card Services
Service Request
VAS
Home
Banking
Logout
बँकिंग
• शिल्लक चौकशी
• लघु विवरणपत्र
कार्ड सेवा
• डेबिट / क्रेडिट कार्डासाठी अर्ज,
• एटीएम पीन रिसेट करणे,
• डेबिट कार्ड ब्लॉक करणे
फंड ट्रान्सफर
• स्वतः च्या खात्यात ट्रान्सफर करणे
• अन्य खात्यांमध्ये ट्रांसफर करणे
• एनईएफटी ने इतर बँक खात्यांमध्ये ट्रांसफर करणे.
• लाभार्थी नावे पहाणे/वाढवणे/ सुधारित करणे /वगळणे
सेवा विनंती
• भूतकाळातील व्यवहारांचा शोध घेणे
• खाते विवरणपत्र विनंती
• धनादेश (चेक) पुस्तक धनाकर्ष विनंती
• धनादेश स्थिती चौकशी
• धनादेश थांबवणे
• नवीन खाते उघडणे
देयक प्रदान
• बिलर्स वाढवणे / त्वरित प्रदान सामिल करणे
• बिलर्स वगळणे
मूल्याधिष्ठीत सेवा
• तक्रार नोंदणी
• मोबाईल खाते पुस्तक
• एम-पिन आणि एमटी-पिन बदलणे
लिंक डाऊनलोड करण्यासाठी 9223181818 वर
MAHAMOBILE हा एसएमएस पाठवा किंवा appstore
येथून प्राप्त करा:
Available on the App Store
GET IT ON Google play




1st IN PSU BANKS
सेल्फी घ्या
आणि त्वरित
बँक खाते उघडा.
सादर आहे
Selfie
तुमचे खाते उघडताना
खालील क्रमांचा अवलंब करा आणि वेळ वाचवा.
1
तुमच्या मोबाईलमध्ये युनियन सेल्फी
ॲप डाऊनलोड करा
2
तुमची जवळची शाखा निवडा
3
ॲपमधून तुमचा सेल्फी आणि
तुमच्या आधार कार्डाचा फोटो घ्या
4
तुमची जन्मतारीख आणि इतर तपशील भरा.
अभिनंदन! तात्काळ तुमचा खाते क्रमांक मिळवा.
तुमच्या नोंदणीकृत शाखेला भेट द्या आणि तुमचा वेलकम किट घ्या.
ॲप येथून डाऊनलोड करा
ANDROID APP ON Google play
Download on the App Store
गौरवशाली भागीदार
Digital India Power To Empower
MAKE IN INDIA
युनियन बँक
ऑफ इंडिया
चांगले लोक, चांगली बँक
भारतीय बँकिंग कोड्स आणि स्टँडर्ड बोर्ड ऑफ इंडिया चे सदस्य
हेल्पलाईन नं.: 1800 22 2244/1800 208 2244 (टोल फ्री नं.) | 080 2530 0175 (सशुल्क) | 080 2530 2510 (एनआरआयसाठी) | www.unionbankofindia.co.in

**माजी खासदार, माजी मंत्री,**
**९४ वर्षांचे तरुण तुर्क**
**हुसेन दलवाई यांच्या संमेलन विशेषांकास शुभेच्छा!**

जन्म १७ ऑगस्ट, १९२२
वय वर्षे ९४



सत्यवान तेटांबे आमच्या कोकणातील एक धडपडे आणि जिद्दी व्यक्तिमत्त्व, पत्रकारितेपेक्षाही सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य अधिक, मी त्यांना ५० वर्षांपासून ओळखतो.

ते सतत कोणत्या ना कोणत्या उद्योगात मग्न असतात. आमच्या कोकणातलाच गंगाराम गवाणकर नाट्य संमेलनाचा अध्यक्ष झाला हे समजताच त्यांनी ९६ व्या नाट्य संमेलनावर आणि पर्यायाने गवाणकरांवर विशेषांक काढायला घेतला, यात ते निश्चितच यशस्वी होतील. कारण एकदा हाती घेतलेले काम ते कधीही अर्धवट सोडत नाहीत. हा माझा अनेक वर्षांचा अनुभव आहे.

नाट्य संमेलन विशेषांकास गंगाराम गवाणकर आणि आमच्या सत्यवान तेटांबे यांनाही अनेक अनेक शुभेच्छा!

**नाट्य संमेलन विशेषांकास शुभेच्छा!**



आमच्या विभागात गेली अनेक वर्षे राहत असलेले ज्येष्ठ नाटककार, वस्त्रहरणफेम गंगाराम गवाणकर हे ९६ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष झाले ही बातमी वाचून अतिशय आनंद झाला.

आमचे मित्र श्री. सत्यवान तेटांबे हे नाट्य संमेलन विशेषांक प्रसिद्ध करीत आहे व गंगाराम गवाणकर यांच्या एकूण कार्यावर प्रकाशझोत टाकत आहेत याचा मला आनंद वाटतो.

या नाट्य संमेलन विशेषांकाचे प्रकाशन ठाणे येथे होत आहे आणि हा विशेषांक नेहमीप्रमाणे दर्जेदार होईल यात मला शंका वाटत नाही.

नाट्य संमेलन विशेषांकास, श्री. गंगाराम गवाणकर तसेच सत्यवान तेटांबे यांना माझ्या हार्दीक शुभेच्छा

**डॉ. रवींद्र बापट**

**नाट्य संमेलन विशेषांकास शुभेच्छा!**

गेली अनेक वर्षे तेटांबे नाट्य संमेलन विशेषांक प्रसिद्ध करीत आहेत. यावर्षी ठाणे येथे संपन्न होत असलेल्या ९६व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनातही ते विशेषांक प्रसिद्ध करीत आहेत याचा मला आनंद होत आहे. माझ्या बोरिवली मतदार संघात ते सामाजिक क्षेत्रात तसेच पत्रकारितेत सातत्याने सहभागी असतात.



यावर्षी आमच्या कोकणातील वस्त्रहरणफेम नाटककार गंगाराम गवाणकर हे संमेलनाध्यक्ष होत आहेत ही आनंदाची बाब आहे.

तेटांबे यांच्या संमेलन विशेषांकास आणि गंगाराम गवाणकर यांना माझ्या शुभेच्छा.

**विनोद तावडे**
मंत्री-शालेय शिक्षण क्रीडा आणि युवक कल्याण उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य महाराष्ट्र राज्य.
जनसंपर्क कार्यालय,
सी-२ बंगला, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१

श्री. सत्यवान तेटांबे ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनावर विशेषांक प्रसिद्ध करीत आहेत हे वाचून आनंद झाला.



श्री. गंगाराम गवाणकर यांची नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली यावरून नाट्यसृष्टीत त्यांच्या शब्दाला नक्कीच वजन आहे. त्यांच्या 'वस्त्रहरण' नाटकाचे पु. ल. नी प्रचंड कौतुक केले आणि रसिकांनी या नाटकाला प्रचंड प्रतिसाद दिला हे सर्वांना माहीत आहेच.


नाट्य संमेलन विशेषांकास माझ्या हार्दीक शुभेच्छा
**डॉ. वसंत चव्हाण**
बोरिवली





# संपादकीय

## दादासाहेब खापर्डे व्हाया गंगाराम गवाणकर



मला सांगायला अतिशय आनंद होतो की माझे वर्गमित्र गंगाराम गवाणकर हे ठाणे येथे भरत असलेल्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होत आहेत. माझे भाऊ कविवर्य पर्शुराम तेटांबे, पुतण्या श्रीधर तेटांबे, मी व 'वस्त्रहरण फेम ' गंगाराम गवाणकर हे सँढहर्स्ट रोड रेल्वे लगत डर्बी टॉकीजच्या बाजूला असलेल्या माझगांव नाईट हायस्कूलचे विद्यार्थी. मी फक्त ११वीलाच या शाळेत होतो आणि माझगांव नाईट हायस्कूल मधून बाहेर पडल्यानंतरही माझगांव नाईट हायस्कूलचे संस्थापक आणि सर्वेसर्वा श्री. म्हाळगी सर यांना मी अधूनमधून भेटत असे. त्या वेळी ते माझे भाऊ पर्शुराम तेटांबे आणि गंगाराम गवाणकर यांची आवर्जून आठवण काढत असत. त्यांची एक इच्छा होती की आम्ही एक साप्ताहिक किंवा मासिक सुरू करावे; परंतु म्हाळगी सर हयात असेपर्यंत आम्हाला ते शक्य झाले नाही. असो.

गेली ४५ वर्षे मी स्वतः नाट्य संमेलनाला तसेच साहित्य संमेलनाला हजेरी लावत आहे. संमेलनाला येण्यामागे स्वार्थ एवढाच की, या संमेलनात अनेक नाटककार, लेखक, साहित्यिक, कवी, गायक, संगीतकार, नाटककार एकत्र भेटावेत; परंतु खरे पाहता १० टक्के कलाकार किंवा साहित्यिक अशा संमेलनाला येत असावेत. जेव्हा आम्ही कलाकार, साहित्यिक यांना या संदर्भात विचारणा करतो, की आजपर्यंत आपण किती संमेलनाला उपस्थित राहिलात? त्यावर त्यांचे उत्तर असते- 'आम्हाला निमंत्रण असेल तर जरूर आम्ही येऊ.' पत्रकारांचीही उत्तरे ठरलेली असतात. आमच्या संपादकानी पाठविले तर नक्कीच आम्ही संमेलनाला जाऊ. म्हणजे स्वतःच्या आनंदाकरिता संमेलनाला जायचं नाही तर मला मानधन मिळाले, माझा खर्च संमेलनाने उचलला तर आणि तरच जाणार.

परंतु माझ्या असेही लक्षात आले आहे की काही ठरावीक कलाकार, लेखक, साहित्यिक, पत्रकार, कवी आणि रसिक वाचक, प्रेक्षक प्रतीवर्षी संमेलनात आवर्जून उपस्थित असतात. या सर्वांना माझा नमस्कार.

१९०५ ला मुंबईत पहिले अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन भरले होते आणि त्या पहिल्या-वहिल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते दादासाहेब खापर्डे, त्यानंतर न. चि. केळकर, कृ. प्र. खाडिलकर, शिवराम महादेव परांजपे, रे. ना. वा. टिळक, वीर वामनराव जोशी, दादासाहेब फाळके, बालगंधर्व, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, चिंतामणराव कोल्हटकर, वि. स. खांडेकर, नानासाहेब फाटक, वसंत देसाई, दुर्गा खोटे, अनंत काणेकर, पु. ल. देशपांडे, ग. दी. माडगुळकर, वि. वा. शिरवाडकर, विद्याधरजी गोखले, पुरुषोत्तम दारव्हेकर, वसंतराव देशपांडे, वसंत सबनीस (डॉ. श्रीपाल सबनीस नव्हे), छोटा गंधर्व, शाहीर साबळे, नाना पाटेकर, शं. ना. नवरे असे दिग्गज संमेलनाध्यक्ष झाले आणि त्यांनी अध्यक्ष पदाची शान निश्चितच वाढविली.

आजपर्यंत ठाण्यात यापूर्वी तीन संमेलने झाली. १९७२ मध्ये कल्याण येथे झालेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते मामा

पेंडसे. १९९२ ला वाशी येथे झालेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते विनोदी तसेच अभ्यासू कलाकार शरद तळवलकर आणि २००२ साली वसई येथे झालेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होते आमचे ज्येष्ठ स्नेही, नाट्य निर्माते (कलावैभव नाट्यसंस्था) मोहनराव तोंडवळकर हे आणि आता ठाणे येथे भरत असलेल्या ९६व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होत आहेत आमचे मित्र 'वस्त्रहरण फेम' नाटककार गंगाराम गवाणकर. हे संमेलन गवाणकर निश्चितच गाजवतील आणि जास्तीत जास्त कलाकारांचा फायदा त्यांच्या कारकिर्दीत करून देतील असे मला वाटते.

प्रत्येक संमेलनात संमेलनाध्यक्ष अनेक घोषणा करतात; परंतु तसा कोणताही अधिकार अध्यक्षाला नसतो. परंतु पाठपुरावा केला आणि नाट्य परिषदेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे, शासनाचे, महापालिकेचे सहकार्य मिळाले तर निश्चितच प्रश्न सुटणे काहीच कठिण नाही. मात्र गवाणकरांना जन्मतःच विनोद -बुद्धी लाभल्यामुळे ते त्यांच्या कारकिर्दीत भरीव कार्य करतील असे मला वाटते.

रंगभूमीवरील लहानात लहान कलाकार, बॅकस्टेज आर्टीस्ट, रंगभूषाकार, नेपथ्यकार, प्रकाशयोजनाकार अशा म्हणजेच कमीत कमी मानधन असणाऱ्या कलाकारांना ५० लाख, ९० लाखांचे फ्लॅट घेणे शक्य नाही. अशा सर्वसामान्यांसाठी शासनाकडून किंवा महापालिकेकडून एखादा मोठा रिझर्व्ह प्लॉट ठाणे-मुंबई मध्ये मिळावा व ५/१० लाखापर्यंत त्यांना छोटासा फ्लॅट का होईना मिळवून द्यावा.

शासनाकडे, महापालिकेकडे अनेक भूखंड रिझर्व्ह असतात; परंतु लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि बिल्डर लॉबी हे सर्व फ्लॅट हडप करतात, हा माझा अनुभव आहे.

मी स्वतः बोरिवलीला जेव्हा ४० वर्षापूर्वी राहायला आलो तेव्हा अनेक भूखंड गायब झालेले दिसले. शासनाला आणि महापालिकेला अनेक भूखंड अजूनही शिल्लक आहेत असे नकाशासहित दाखवून दिले. त्यातील एखादा भूखंड नाट्यगृहाकरिता मिळावा म्हणून सतत २५ वर्षे संघर्ष करावा लागला, तेव्हा कुठे बोरिवलीत प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहासारखे अद्ययावत नाट्यगृह झाले. याचा उल्लेख मंत्री महोदय दिवाकर रावते यांनी बेळगांव येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात जाहीररित्या केला व बोरिवलीला जे ठाकरे नाट्यगृह झाले ते शिवसेना प्रमुखांच्यामुळे झाले; परंतु सत्यवान तेटांबे यांच्या सारख्यांनी पाठपुरावा केला म्हणून ते झाले. म्हणून शंभर टक्के श्रेय हे सत्यवान तेटांबे यांचे आहे, असा मंत्री महोदयानी गौरव केला.

हा आत्मस्तुती करण्याचा प्रश्न नाही ; परंतु लोकप्रतिनिधी, राजकारणी किती गेंड्याच्या कातडीचे असतात हे मी स्वतः गेली ५५ वर्षे अनुभवत आहे.

नाटककार जयवंत दळवी दादर सोडून बोरिवलीला आले. बोरिवलीत नाट्यगृह नसल्यामुळे त्यांना खूप खेद वाटत होता. अनेकदा त्यांची-माझी भेट झाली. त्या प्रत्येक भेटीत ते एकच वाक्य म्हणत असत, तेटांबे मी जिवंत असेपर्यंत तरी बोरिवलीत नाट्यगृह होईल का?

बोरिवलीच्या नाट्यगृहाबद्दल लिहायचे झाले तर १०० पानेही कमी पडतील आणि लिहिण्याचे हे स्थळ नाही; परंतु ओघाने आले म्हणून लिहिले आणि सभा-संमेलनात केवळ घोषणा करून चालत नाही तर सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. लोकप्रतिनिधी, राज्यकर्ते हे आश्वासन देतील; परंतु त्यांच्या मागे सतत लागावे लागेल. बरे कोणत्याही एका अध्यक्षाने ठरवून होत नाही. त्यांना सर्वांचे पाठबळ मिळणे अगत्याचे आहे.

माझ्या माहितीत अनेक नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष, अनेक सांस्कृतिक मंत्री आहेत; परंतु एकाही व्यक्तीने बोलल्याप्रमाणे कृती केली असे झालेले नाही.

संमेलनात केलेली सांस्कृतिक मंत्र्यांची अनेक भाषणे मला पाठ आहेत. 'माझ्या कारकिर्दीत मी सांस्कृतिक मंत्री असेपर्यंत प्रत्येक तालुक्यात एकतरी नाट्यगृह बांधीन' असे आश्वासन


**नाट्य संमेलन विशेषांकास हार्दिक शुभेच्छा!**



**सौ. मनिषा अशोक चौधरी**

**आमदार -दहिसर विधानसभा**

**भारतीय जनतापार्टी**

६०२, गुरू निहार, सेंट रॉक ज्युनिअर कॉलेज जवळ, डी. एन. म्हात्रे रोड, एक्सर विलेज, बोरिवली ( प.), मुंबई ४०००९२

०२२-६५६१६१०९/ ०२२- २८९३५५१०




# रंगसाधकाला प्रणाम!-

**शुभदा वराडकर - नृत्यशिक्षिका**



गंगाराम गवाणकर यांना मी प्रथम भेटले ते आम्ही महाराष्ट्र शासनाच्या चित्रपट परीक्षक मंडळामध्ये परिक्षण करताना वयाने, मानाने कर्तुत्वाने अशा सर्वार्थाने ज्येष्ठ असलेले गवाणकर अत्यंत साधेपणाने आणि निर्मळ मनाने माझ्या सारख्या नव्यांमध्ये मिसळून गेले. त्यांच्यामुळे आमच्या त्या परीक्षक मंडळाचे किचकट काम ही खूप सोपं आणि आनंददायी झालं. गवाणकरांची भेट नाट्यगृहात होणे हा एक आगळावेगळा संकेत होता. कारण त्यानीच पुढे माझ्या आग्रहाचा मान राखून 'चित्रांगदा' हे नृत्यनाट्य लिहिलं.

जेव्हा एखादी कलाकृती विशुद्ध स्वरूपात सादर करायचा ध्यास लागतो तेव्हा ती प्रत्यक्षात उतरायला चहुबाजूंनी मदतीचे हात पुढे येतात. रविंद्रनाथ टागोरांच्या जन्मशताब्दी निमित्त भारत सरकार तर्फे 'चित्रांगदा' हे नृत्य-नाट्य मराठीत सादर करायची जबाबदारी मी स्वीकारल्यावर मला सर्व प्रथम प्रेरणा दिली ती श्री. गंगाराम गवाणकर यांनी.

जगामध्ये जे जे उत्तम आणि उदात्त आहे त्यावर प्रेम करणारं त्यांचं एक लोभवणारं व्यक्तिमत्त्व आहे. उन्हाचा स्वच्छ प्रकाश त्यांच्या मनात सतत असतो. त्यामुळे त्यांच्या सान्निध्यात नैऱ्याश्याचा काळोख टिकत नाही. 'चित्रांगदा' नाटकातल्या चित्रांगदेच्या कुरूपतेकडून सुरूपतेच्या प्रवासात जसे अनेक अडथळे आले तसे अनेक अडथळे, वाईट प्रसंग, नैराश्याचे क्षण रविंद्रनाथांसारख्या अद्वितीय महाकवीची अद्वितीय कलाकृती आपल्या महाराष्ट्रातला थोर नाटककार अत्यंत भक्तिभावाने लिहिताना पहाण्याचे आणि अंतर्मुख होऊन जीवनाच्या संघर्षाकडे उदात्तपणे पाहण्याचे सुवर्ण क्षण मी अनुभवले.

हे नृत्यनाट्य बंगाली भाषेत 'चित्रांगदा' आणि इंग्रजीत 'चित्रा' या नावाने गुरुदेवानी लिहिलं आहे. गवाणकर मला म्हणाले, 'मला बंगाली मुळीच येत नाही आणि इंग्रजीही साहित्य वाचण्याइतकी येत नाही' पण हे बोलल्यावर माझा चिंताग्रस्त चेहऱ्याकडे पाहून ते म्हणाले, 'तू ती पूर्ण कथा मला सांग आणि एका कागदावर लिहून दे' मी वहीच्या दीड पानावर ती गोष्ट लिहून दिली. त्याच्या आधारे या महान नाटककाराने 'चित्रांगदाचा' डोलारा उभा केला.

कोणावरही असूया, दुःस्वास न करता जगण्याचा आनंद लुटायचा हे ते आपल्या वर्तनातून दाखवतात, म्हणून एक नाटककार म्हणूनच नाही तर एक माणूस म्हणूनही ते थोर आहेत.

एक लेखक असूनही लेखन किती कठीण आहे असं न म्हणता ते किती सोपं आहे असं म्हणत त्यांनी मला लेखनाची प्रेरणा दिली. सहज, गप्पांच्या ओघात माझे अनुभव पुस्तकस्वरूपात वाचकांपर्यंत पोहोचले पाहिजेत ही सूचना करून ते थांबले नाहीत तर त्यासाठी तगादा लावून मला मयूरपंख हे पुस्तक लिहिण्याची स्फूर्ती त्यांनी दिली.

रविंद्रनाथांच्या 'चित्रांगदा'चे मी लिहिलेल्या दीड पानावरून त्यांनी केलेले स्वैर रूपांतर वाचून त्यांच्या चिंतनशील, सखोल आणि तरलस्पर्शी लेखणीचा एक वेगळा पैलू जाणवतो आणि 'वस्त्रहरण' च्या लेखकाने 'चित्रांगदा'च्या रूपात एक 'भरजरी वस्त्र' मराठी रंगभूमीला प्रदान केलं आहे असं वाटतं.

रंगभूमीच्या इंद्रधनुषी रंगाने जीवनाचं सौंदर्य मंचावर रेखाटणाऱ्या या रंगसाधकाला प्रणाम!


**शुभदा वराडकर**
नृत्यशिक्षिका
९८२१६२८३८८



**With Best Compliments From**

**C. Naresh- 9870785139**

**Jay Shree Krishna Nirmit**
**Film Writer (Hindi & Marathi)**

**NARESH- JAYESH**

B/508 Mulshi Co.HSG. Soci Plot No. 63,
L.T. Road Gorai-2, Borivali (W.),
Nr. Gorai Khadi, Mumbai- 400091



## सौ. सिंधुताई सपकाळ (माई)

संस्थापक/ अध्यक्षा
सन्मती बाल निकेतन संस्था
ए.एम.कॉलेज रोड, बेल्हेकर वस्ती, मांजरी बु.
वसंतदादा शुगर इन्स्टीट्युट जवळ, पुणे ४१२३०७

**Sanmati Bal Niketan**

A.M.College Road, Belhekar Vasti, Manjari BK.,
Near Vasantdada Sugar Institute, Pune- 412307
sanmatibalniketan2001@gmail.com
www.mysaptsindhu.org
020-26999541/9326535224/9371074256 / 9881337914

हार्दीक शुभेच्छा

## गोपिका गाय रक्षण केंद्र

नवरगांव (फॉरेस्ट) हेटी, ता. सेलु, जि. वर्धा (विदर्भ)
**Gopika Gai Rakshan Kendra**
Navargaon (forest) Heti, Tal. Selu, Dist. Wardha (Vidarbha)
संचालिका - सौ. सिंधुताई सपकाळ (माई)
कार्यालय - माई निवास, वॉर्ड नं.६, गजानन नगर, आर्वी रोड, वर्धा
मो.९९२११९२७९९/८४८५८६५७४७
www.sindhutaisapakal.org

मी अनाथांची 'आई' झाले, तुम्ही गणगोत व्हा...!

Madhv Dhamankar

## Shadow Play & Magic

A-2, 1st Floor, Shreepal Complex, CHSLtd. Panchpakhadi, Thane (W.), 400602
Tel. 25436911 Mo. 9867912627
E-mail: madhv.dhamankar@gmail.com



अनेक सांस्कृतिक मंत्र्यांनी दिलेले मी स्वतः व माझ्यासारख्या संमेलनाला उपस्थित असलेल्या अनेकांनी ऐकले असेल. मंत्र्यांनी आश्वासन दिल्यानंतर संबंधितानी पाठपुरावा करणे जितके आवश्यक आहे तितकेच प्रसिद्धी माध्यमानीही असे ज्वलंत प्रश्न उचलून धरले पाहिजेत. प्रसिद्धी दिली पाहिजे.

आम्ही जवळ जवळ ५५ वर्षे विविध वर्तमानपत्रातून लिहित आहोत. फोनवरून दिलेल्या बातमीनेही महाराष्ट्र शासनाला दिलेले निर्णय बदलायला लागलेले आहेत. तो काळ वेगळा होता. आताचा काळ वेगळा आहे. दिल्या-घेतल्या शिवाय कोणतेच काम होत नाही. केवळ लोकप्रतिनिधीच भ्रष्टाचारी आहेत असे नाही तर समस्त समाजाला भ्रष्टाचाराचे काहीच देणेघेणे नाही.

सांगायचा मुद्दा असा की शासनाने जाहीर केले म्हणजे काम झाले असे नाही तर आज महाराष्ट्रात नवीन सरकार आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सारखे तरुण तडफदार मुख्यमंत्री आहेत. विनोद तावडे यांच्यासारखे अभ्यासू शिक्षणमंत्री आहेत. एकनाथ शिंदे यांच्यासारखे तडफदार मंत्री आहेत, तेव्हा आपण कुठेही पाठपुरावा करण्यात कमी पडू नये. प्रसिद्ध गायिका, अभिनेत्री फैय्याज शेख यांनी किंवा त्यांच्या पूर्वी झालेल्या संमेलनाध्यक्षांनीही अनेक घोषणा केल्या असतील त्या प्रत्यक्षात उतरल्या का? हे गवाणकरांना पाहावे लागेल. गवाणकर हे कोणाचेही मन जिंकू शकतात.

गवाणकर हे दहिसरचे, शिक्षणमंत्रीही विनोद तावडे बोरिवली परिसरातून निवडून आलेले आहेत. मंत्री महोदय सुभाष देसाई गोरेगावचे आणि कार्य सम्राट खासदार गोपाळ शेट्टी हेही बोरिवलीचेच. या सर्वांशीच नाट्य संमेलनाध्यक्ष गंगाराम गवाणकर यांचा ऋणानुबंध आहे. तेव्हा गंगाराम गवाणकराना शासनाकडून एखादा मोठा भूखंड मिळवायला काहीच हरकत नाही. जेणेकरून काही गरीब कलाकार, बॅकस्टेज कलाकार, वृत्तपत्र लेखक, पत्रकार, ज्येष्ठ नागरिक अशा सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात जे झोकून देऊन काम करणारे आहेत अशा लोकांसाठीही शासनाने सहकार्य करावे. एखादा भूखंड द्यावा असे मला वाटते. तसा प्रयत्नही करायला हवा.

शेक्सपिअरलाही मागे टाकील असे नाटककार आमच्या महाराष्ट्रात होऊन गेले. त्यांचे नाव राम गणेश गडकरी, आणि आचार्य अत्रे. ठाण्याला शिवसेनेने गडकरी रंगायतन नाट्यगृह उभे केले. याच परिसरात १९,२०,२१ फेब्रुवारीला ठाण्यात ९६वे नाट्य संमेलन होत आहे; परंतु राम गणेश गडकरी आणि आचार्य अत्रे यांचे पुण्यात आणि ठाणे, मुंबईत भव्य-दिव्य असे स्मारक होणे अत्यंत आवश्यक आहे. गंगाराम गवाणकर यांनी हा प्रश्नही मार्गी लावण्याकरीता प्रयत्न करावा. महाराष्ट्र शासनाने ठाणे, पुणे, मुंबई महापालिकेनेही आपली जबाबदारी पार पाडावी. कोणीतरी मागितल्यानंतरच काहीतरी द्यायला हवे असेच काही नाही. तेव्हा शासनाने, महापालिकेने आपली जबाबदारी झटकून न टाकता ती आनंदाने उचलावी. शिवाजीमहाराजांनी प्रजेकरिता ज्या ज्या गोष्टी केल्या त्या करणे आजच्या राज्यकर्त्यांना शक्य नाही; परंतु त्यातील काही 'अल्प' वाटा जरी लोकप्रतिनिधी, राज्यकर्त्यांनी उचलला व आपले मानधन वाढविण्याकरिता जसे सर्वच लोकप्रतिनिधी हात वर करतात. तसा प्रजेसाठी, समाजासाठी, कलाकारासाठी केला तर किती बरे होईल.

नाट्यसंमेलन फक्त तीन दिवस भरते; परंतु या तीन दिवसाला किती कलाकार, निर्माते, दिग्दर्शक, नाटककार हजेरी लावतात हा एक संशोधनाचा विषय आहे. या तीन दिवसात सर्वच नाट्य निर्मात्यांनी जर नाट्य प्रयोग बंद ठेऊन नाट्य संमेलनाला उपस्थिती दाखविली तर किती मजा येईल. रसिक श्रोत्यांना किती आनंद होईल. आपल्या लाडक्या कलाकारांना, अभिनेत्रीला जवळून पाहण्याचे नेत्रसुख त्यांना केव्हा लाभणार. मला वाटते, इतका उदारपणा आमच्या निर्मात्यांनी, कलाकारांनी दाखवला व रसिकांना जर वाटले की संमेलनाला झाडून सर्व कलाकार, अभिनेत्री, निर्माते उपस्थित राहतात तर प्रतीवर्षी येणारा रसिक हा दुपटीने हजेरी लावेल आणि त्या त्या कलाकारांना धन्यवाद देईल; परंतु इतका उमदेपणा, मोठेपणा कलाकार दाखवतील का? गेली अनेक वर्षे मी संमेलनाला जात असल्यामुळेच मी अधिकारवाणीने बोलत आहे. त्यात कोणाचाही अवमान करण्याचा हेतू नाही.

यावर्षी एक दिलदार, गरिबीचे चटके सहन करूनही त्याचे प्रदर्शन न मांडता सतत लोकांना हसवत ठेवणारा एक नाटककार गंगाराम गवाणकर नाट्य संमेलनाचा अध्यक्ष होत आहे. आजपर्यंत त्यांचा प्रवास पाहता ते यात यशस्वी होतील असे संकेत मिळत आहेत. सर्वांना घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी आहे. नाट्य परिषदेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, राजकीय नेत्यांनी त्यांना साथ दिली तर त्यांचे काम सोपे होईल. गंगाराम गवाणकर यांना त्यांचा कार्यकाळ उज्ज्वल जावो आणि कलाकारांचे प्रश्न त्यांच्या कार्यकाळात मार्गी लागावेत हीच परमेश्वर चरणी प्रार्थना!

**संपादक**
- श्री. सत्यवान तेटांबे
मो.९८६९५०१३६८

# अनुक्रमणिका


**मान्यवरांच्या प्रतिक्रिया** ०६

१९०५ ते २०१५ पर्यंत झालेल्या
अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनासंबंधी
सविस्तर माहिती १०

आमचो गंगो खयच्या खय गेलो!
**-राजा पटवर्धन** १९

आमचे लाडके नाना 'गंगाराम गवाणकर'
**-सुरेश चाफेकर** २८

निलकंठ उर्फ गंगाराम गवाणकर
**- ॲड. प्रकाश लब्धे** २९

बॅकस्टेज वर्कर्स साठी काम करायचं आहे
**- गंगाराम गवाणकर**

**शब्दांकन - सुनिल ढेकळे** ३३

राम गणेश गडकरींचे स्मारक आजही अधांतरी
महाराष्ट्राच्या प्रतिभा सम्राटाचे स्मरण!
**- संजय राऊत** ३४

**कविता** ३७

बेळगावात संपन्न झालेल्या ९५ व्या
अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या
अध्यक्षा श्रीमती फैय्याज यांचे अध्यक्षीय भाषण ३८

महाराष्ट्रातील प्रायोगिक नाट्यचळवळीत साठ वर्षे
सक्रीय सहभाग असलेले, 'प्रायोगिक नाटक' हाच
एकमेव जीवित हेतू मानणारे एक झपाटलेले
व्यक्तिमत्त्व म्हणजे **अरुण काकडे** ४४

संमेलनाध्यक्ष अरुण काकडे
यांच्या कार्याचा संक्षिप्त अहवाल ४६

नाट्य संमेलनाकडून अपेक्षा
**- दीपक बिडकर** ४९

आव्हानांशी जुगलबंदी
**याकूब सईद** ५१

गवाणकरांनी केलेले स्वतःचे वस्त्रहरण
**- नीलकंठ खाडीलकर** ५५

'व्हाया वस्त्रहरण' या गंगाराम गवाणकर
यांच्या आत्मचरित्रातील काही अंश ५७

ठाणे तेथे काय
**मेघना साने** ६६

व्यक्तिविशेष
**महेश्वर तेटांबे** ६८

**कुमार आर्य तेटांबे** ६९

रंगसाधकाला प्रणाम!
**शुभदा वराडकर** ७१

**मान्यवरांच्या प्रतिक्रिया** ७२



**९६वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन,(ठाणे)**
**विशेषांक फेब्रुवारी २०१६**

मालक, मुद्रक, प्रकाशक,
संपादक- सत्यवान तेटांबे

**साक्षीदार प्रकाशन**
डी/३०३, क्रेमलिन,
जयराज नगर, बोरिवली प., मुंबई ९१
मोबा. ९८६९५०१३६८

**अक्षरजुळणी**
ओम स्वरूप कॉम.प्रिंट,विरार

**मुखपृष्ठ**
**प्रीतम-प्रशांत**

**मुद्रक-** राजेश आर्ट,
करी रोड, मुंबई

**मूल्य-** ८० रुपये



**प्रसिध्द झाला!**
**८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन - पिंपरी-चिंचवड विशेषांक २०१६**
**मूल्य ६०/रु.**




# कुमार आर्य महेश्वर तेटांबे



(वय वर्षे ७)

बाल खेळाडू योगा आणि मल्लखांबपटू

ब/४५, कात्रादेवी कॉलनी, डॉ. एस. एस. राव रोड, राजकमल लेन, परेल, मुंबई ४०००१२

साईबाबा पथ मुंबई पब्लिक स्कूल, साईबाबा रोड,

परेल, मुंबई ४०००१२ या शाळेत इयत्ता २रीत शिकत आहे.

यशस्वी कारकीर्द खालील प्रमाणे

१) चिंतामणी प्रतिष्ठान, चिंचपोकळी, मुंबई ४०००१२ या सेवाभावी संस्थेच्या सौजन्याने आणि ऋतुराज स्पोटर्स अकॅडमी आयोजित दिनांक १/११/२०१४ रोजी भरविण्यात आलेल्या योगासन स्पर्धेत वय वर्षे ८ अंतर्गत (प्रथम क्रमांक- सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र)

२) नटरंग कला अकादमी आयोजित दिनांक २९/११/२०१४ रोजी भरविण्यात आलेल्या योगासन स्पर्धेत वय वर्षे ८ अंतर्गत (द्वितीय क्रमांक- रौप्य पदक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र)

३) भाऊसाहेब रानडे नवोदित विभागीय मल्लखांब स्पर्धा २०१४ सानेगुरुजी आरोग्य मंदिर, सांताक्रूझ, मुंबई आयोजित दिनांक १३/१२/२०१४ रोजी भरविण्यात आलेल्या मल्लखांब स्पर्धेत वय वर्षे ८अंतर्गत ('ब' नामांकन प्रमाणपत्र)

४) चिंतामणी प्रतिष्ठान, चिंचपोकळी या सेवाभावी संस्थेच्या सौजन्याने आणि ऋतुराज स्पोटर्स अकॅडमी आयोजित दिनांक २१/१२/२०१४ रोजी भरविण्यात आलेल्या मल्लखांब स्पर्धेत वय वर्षे ८ अंतर्गत (सहभाग प्रमाणपत्र)

५) पार्ले महोत्सव १४-१५, विलेपार्ले आयोजित दिनांक २९/१२/२०१४ रोजी भरविण्यात आलेल्या योगासन स्पर्धेत वय वर्षे १२ अंतर्गत (सहभाग प्रमाणपत्र)

६) ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर, माहीम, मुंबई ४०००१६ या ठिकाणी दिनांक १९/१/२०१५ रोजी भरविण्यात आलेल्या योगासन स्पर्धेत वय वर्षे ८ अंतर्गत (प्रथम क्रमांक - सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र)

७) २१ मार्च, २०१५ रोजी गुढीपाडवा निमित्त ७ वाजल्यापासून ऋतुराज स्पोटर्स अकॅडमी तर्फे गिरगाव, मुंबई ४००००४ येथे मल्लखांब आणि योगासन प्रात्याक्षिक सादरीकरण.

८) दिनांक २७ मार्च, आणि दिनांक २८ मार्च, २०१५ रोजी बिग मॅजीक या हिंदी वाहिनीवर अकबर-बिरबल या सुप्रसिद्ध धारावाहिक मध्ये मल्लखांब सादरीकरण.

९) असोसिएशन ऑफ मुंबई योगा डीस्ट्रीक्ट, धारावी, मुंबई ४०००१७ या ठिकाणी दिनांक १६/८/२०१५ रोजी भरविण्यात आलेल्या योगासन स्पर्धेत वय वर्षे ८ अंतर्गत (विशेष प्राविण्यपद - प्रमाणपत्र)

कुमार आर्य महेश्वर तेटांबे याचे आतापर्यंत झालेले योगासन आणि मल्लखांब प्रात्याक्षिके

१) दिनांक ३१/१२/२०१४ रोजी ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई - योगासन आणि मल्लखांब प्रात्याक्षिके

२) दिनांक ५/१/२०१५ रोजी ऐरोली - दिवा कोळी महोत्सव - २०१४, नवी मुंबई - योगासन आणि मल्लखांब प्रात्याक्षिके

३) दिनांक ११/१/२०१५ रोजी जिजामाता नगर, आंबेवाडी, नवजीवन सेवा मंडळ- योगासन आणि मल्लखांब प्रात्याक्षिके


४) दिनांक २६/१/२०१५ रोजी खापारादेव मंडळ, रामदूत, करीरोड, लालबाग, मुंबई - योगासन आणि मल्लखांब प्रात्याक्षिके

---

लाखाचा' राज्य
शासन अंतर्गत 'एड्स' पथनाट्य
२) 'ओम कला मंच' प्रस्तुत 'कर भरा तो हो भला' 'पाणीपुरवठा' आणि 'थेंब थेंब' नवी मुंबई महापालिका अंतर्गत पथनाट्य

**इतर अनुभव -**
गेली १५ वर्षे विविध दैनिकातून सामाजिक विषयावर पत्रकारिता
पुरस्कार - पत्रलेखन पत्रमहर्षी, जागृत पत्रलेखक, पत्रभूषण, महाराष्ट्र समाज भूषण, साद सांगाती महाराष्ट्र दिप

**घनिष्ट संबंध असलेल्या संस्था-**
१) सभासद - अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ
क्रमांक - ६३६२
विभाग - अभिनेता 'अ' वर्ग
२) आजीव सभासद
महाराष्ट्र मराठी मुक्त पत्रकार संघ
क्रमाक १३४
विभाग - मुक्त पत्रकार
३) आजीव सभासद -
मराठी वृत्तपत्र लेखक
संघ, मुंबई
छंद - गायन आणि वादन
०००



## श्री. महेश्वर भिकाजी तेटांबे

**प्रसिद्धीपासून दूर असलेला कलावंत**

नाट्य, चित्रपट, कलाकार, मुक्त पत्रकार श्री. महेश्वर भिकाजी तेटांबे हे कोकणच्या सुगंधित मातीत श्री परशुरामाच्या पवित्र भूमीत जन्मलेले नावाजलेले नाट्य, चित्रपट, कलाकार, मुक्त पत्रकार असून त्यांचा जन्म ८ ऑगस्ट १९७१ रोजी झाला. सुरुवातीला छंद म्हणून जोपासलेली अभिनयाची आवड त्यांना व्यावसायिक रंगभूमीपर्यंत घेऊन गेली. तुझी ती माझी, गैरसमज, पोस्ट भांडेवाडी, गाभारा,आता होती गेली कुठं, खुर्चित पडला मुर्च्छित, पेटला वंशाचा दिवा, चोर चोर चाळीत चोर, बुवा तेथे बाया, स्वप्न अंधाराचे, गाढवाचे लग्न, दिवा पेटे दिनरात, शापित गंधर्व इत्यादी व्यावसायिक नाटकात काम करण्याची संधी त्यांना मिळाली. सोबत मराठी मालिकामध्येही अभिनय करण्याची संधी त्यांना मिळाली. यात तिसरा डोळा, दामिनी,बंदिनी ,आभाळमाया, डिटेक्टिव्ह जयराम, कुंडली, क्राइम डायरी ,कळत नकळत, चार दिवस सासुचे,क्राइम वॉच,छत्रपती शिवाजी महाराज, पुढच पाऊल, स्वप्नांच्या पलीकडले या अतिशय गाजलेल्या मालिकांचा समावेश आहे. या सोबत सिने क्षेत्रातही श्री. महेश्वर तेटांबे यांनी भूमिका केल्या आहेत. त्याचबरोबर मराठी व हिंदी पथ नाटकातही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. त्यात 'गजप्रभा कलामंच' प्रस्तुत 'जिव वाचवा लाखाचा' 'ओम कला मंच' प्रस्तुत 'कर भरा तो हो भला' 'पाणीपुरवठा' आणि 'थेंब थेंब' यांचा समावेश आहे. श्री. महेश्वर तेटांबे यांनी नाट्यलेखनही केले असून आमची शाळा, चाळ नावाची वाचाळ वस्ती, पुरस्कार या एकांकिका लिहिल्या आहेत. त्यात त्यांच्या 'पुरस्कार' या एकांकिकेला अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. तसेच त्यांनी आतापर्यंत 'माझी बी आय टी चाळ' 'चांद मियां' इत्यादी लघु चित्रपटांचे सहाय्यक दिग्दर्शनही केले आहे. श्री. महेश्वर तेटांबे केवळ कलाकार नसून मुक्त पत्रकार, वृत्तपत्र लेखक आहेत. गेली २० वर्ष विविध दैनिकातून त्यांनी जनतेच्या समस्यांवर आवाज उठविला आहे. त्यांच्या कला, पत्रकारिता व समाजसेवा कार्याची दखल घेऊन त्यांना विविध पुरस्कार या पुरस्कारात बाळशास्त्री जांभेकर राज्य स्तरीय पुरस्कार, महाराष्ट्र दीप पुरस्कार, समाज भूषण पुरस्कार, पत्र लेखक पुरस्कार व इतर अनेक सन्मान चिन्ह व प्रमाणपत्रांचा समावेश आहे. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे ते सभासद असून अ वर्गाचे अभिनेते आहेत. महाराष्ट्र मुक्त पत्रकार संघ व मराठी वृत्तपत्र लेखक संघाचे ते सदस्य आहेत. फावल्या वेळेत गायन व वादन करण्याचा त्यांचा छंद आहे.

सध्या त्यांच्या 'पुरस्कार' या एकांकिकेवर आधारित सिनेमा दिग्दर्शित करण्याचा मानस आहे. संपर्कचा पत्ता

ब-४५, कात्रादेवी कॉलनी,डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई ४०००१२

मो नं. ९०२९४७५४१८/ ९८२१७६११८८

email-maheshwartetambe@gmail.com,

**व्यक्ती परिचय**

**श्री. महेश्वर भिकाजी तेटांबे**

सिने क्षेत्रातील नाव - महेश

संपूर्ण पत्ता - ब-४५, कात्रादेवी कॉलनी, डॉ. एस. एस. राव रोड, परेल, मुंबई ४०००१२

जन्म दिनांक - ८ ऑगस्ट, १९७१

संपर्क - मो नं. ९०२९४७५४१८/ ९८२१७६११८८

उंची - ५फूट ६इंच

**अनुभव**

**लेखन (एकांकिका) -**

१) आमची शाळा

२) चाळ नावाची वाचाळ वस्ती

३) पुरस्कार

**व्यावसायिक नाटके -**

१) तुझी ती माझी

२) गैरसमज

३) मुक्काम पोस्ट भांडेवाडी

४) गाभारा

५) आता होती गेली कुठं

६) खुर्चित पडला मुर्च्छित

७) पेटला वंशाचा दिवा

८) चोर चोर चाळीत चोर

९) बुवा तेथे बाया

१०) स्वप्न अंधाराचे

११) गाढवाचे लग्न

१२) दिवा पेटे दिन रात

**मराठी मालिका** (अभिनय)

१) तिसरा डोळा, २) दामिनी ३) बंदिनी ४) आभाळमाया

५) डिटेक्टिव्ह जयराम ६) कुंडली ७) क्राइम डायरी

८) कळत नकळत ९) चार दिवस सासुचे १०) क्राइम वॉच ११) छत्रपती शिवाजी महाराज

**मराठी चित्रपट -**

१) माझं सौभाग्य

२) नो प्रॉब्लेम


३) उलाढाल ४) सखी ५) दाह

**मराठी / हिंदी** (अभिनय)

१) 'गजप्रभा कलामंच' प्रस्तुत 'जिव वाचवा




हार्दीक शुभेच्छा



# दिलीप महाशब्दे

**गायक / संगीत दिग्दर्शक**

**Approved 'A' Grade Singer & Composer of AIR & Doordarshan**

**भारत तथा विदेशों में ५०० से अधिक सफल प्रस्तुतियां**

**मराठी**

दोन ओळींची जादू (मराठी गज़ल)

मध्यप्रदेशातील मराठी कविता (संगीतमय प्रस्तुती)

भाव सरगम (मराठी/ हिंदी अमर गीत)

गीत -शिवाजी (शिव छत्रपती गाथा)

**हिंदी/ उर्दू**

एहसास-ए-गज़ल

सत्यम् शिवम् सुंदरम् (आध्यात्मिक / धार्मिक तथा सर्वधर्म भक्तिगीत)

हिंदी गज़ल

आनंद यात्रा (हिंदी फिल्मी भक्तिगीत)

शिवोम वाणी (आध्यात्मिक भजन)

मिशन नामसंकीर्तन (सर्वधर्म देवी देवता तथा अवतारों का नामस्मरण

२२३ ए, एकता वुडस्, रहेजा इस्टेट, कुलूपवाडी, बोरिवली (पूर्व), मुंबई

मो. ९८१९५७८०९६/ ९८९३५०६९७९

E-mail:dilipmm@yahoo.co.in



## खासदार गोपाळ शेट्टी

मालवणी या बोलीभाषेला पार सातासमुद्रापलिकडे नेऊन जगप्रतिष्ठा मिळवून दिल्याबद्दल नाटककार श्री. गंगाराम गवाणकर यांचे हार्दीक अभिनंदन. गवाणकरांचे नाट्यक्षेत्रातील योगदान फार महत्त्वाचे आहे.

अशा नाट्य कलेची सेवा करणाऱ्या श्री. गंगाराम गवाणकरांची ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवड होणे हे कालसंगत आणि योग्यतेनुसारच आहे. मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**खासदार, उत्तर मुंबई**



## अलका कुबल

श्री. सत्यवान तेटांबे प्रसिद्ध करीत असलेल्या आणि ठाणे येथे संपन्न होत असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन विशेषांकास माझ्या हार्दीक शुभेच्छा.

या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून वस्त्रहरण फेम नाटककार गंगाराम गवाणकर यांची एकमताने निवड झाली ते योग्यच झाले.

ख्यातनाम अभिनेत्री

**अलका कुबल- आठल्ये**

**मो. ९८६९०४९७७५**




**अशोक सुतार**

व्यंगचित्रकार

हार्दीक शुभेच्छा

**•व्यंगचित्र •रेखाचित्र •पेंटींग •कॉमिक्स स्ट्रीप्स डिझाईन**

पत्ता - १०७, बनवडी कॉलनी,
ता. कराड, जि. सातारा

संपर्क -९३२१५६१९८४/८६००३१६७९८

ashoksutar1973@gmail.com

**S.E.O.**
AMITABHA MEDIA CREATION, MUMBAI




'मराठी ग्रंथ संग्रहालय' या संस्थेचा वाचकवर्ग ठाणेभर पसरलेला आहे. निरनिराळ्या कलावंतांना कार्यक्रमात सहभाग देणे हे ग्रंथालय करतेच. ठाण्याची सांस्कृतिक जडणघडण करण्यात मराठी ग्रंथ संग्रहालयाचा खूप वाटा आहे. ८८ वे अखिल भारतीय संमेलन येथे झाले तेव्हा पां. के. दातार, विद्याधर ठाणेकर या मंडळींसह काम करायची संधी मिळाली. ठाण्यातील सर्व शाळांमध्ये आम्ही लेखकांचे कार्यक्रम घडवून आणले. तेव्हा ठाण्यातील शाळांचेही वातावरण व शिक्षकांची साहित्यप्रीती यांची प्रचिती आली.

अभिनेत्री सुहास जोशी यांचे बॅरिस्टर नाटक मी लहानपणी पाहिले होते. त्या अचानक मला ठाण्यात दिसल्या. मग कळले येथेच राहतात. पुढे शूटींगमध्ये ओळखही झाली. अगदी अलीकडे त्यांच्या घरी जायची संधी मिळाली. आमंत्रण घेऊन गेले होते. 'मेघना तू पहिल्यांदाच आलीस, त्यामुळे आता तुला तशी सोडणार नाही. माझ्या हातचे श्रीखंड खाऊन जा' असा आग्रह करून मला त्यांनी प्रेमाने श्रीखंड खाऊ घातले. ठाण्याच्या मातीत हा गुण आहे. मुंबईत कितीही मोठे झालात तरी जेव्हा तुम्ही ठाण्यात ठाणेकर म्हणून भेटता तेव्हा चेहऱ्यावर एक नातलगासारखे हसू असते. आपलेपणा आणि आदरही.

२००२ पासून शैला खांडगे यांचा लोकरंग सांस्कृतिक मंच ठाण्यात काम करीत आहे. लोकसाहित्याच्या शिबिरातून अनेक कलाकार घडविले. महाराष्ट्र महोत्सवही करतात. अलीकडे महाराष्ट्र सांस्कृतिक मंचची स्थापन करून दरवर्षी आळंदी ते पंढरपूर पथनाट्यातून जागृती करण्याचे कामही त्या करतात. मला त्यांच्या काही महिला संमेलनांचे निवेदन करायला मिळाले. तेव्हा लोकसाहित्याची चांगली माहिती मिळाली. राम मराठे यांचे सुपुत्र मुकुंद मराठे यांनी गायक कलाकार घडविले. राम मराठे महोत्सव दरवर्षी ठाण्यात दणक्यात होतो आणि अखिल भारतीय नाट्य परिषदेचा हा मोठा उपक्रम असतो. मोठमोठे कलावंत त्यात कला सादर करतात.

२००० साली मी ठाण्यात मेघदूत कला अकादमी ही संस्था स्थापन केली आणि मुलींसाठी काम सुरू केले. शिबिरे घेणे, मुलांसाठी सीडीज काढणे, त्यांना कविता, कथाकथन, नाटुकले यात रमवणे, हे सर्व करताना त्यांच्या पालकवर्गातही याची गोडी निर्माण करणे हे मेघदूत तर्फे आम्ही करत होतो. मग मुलांची 'हसरी मुले,' 'आज्ज्यात मज्यात' अशी नाटकेही बसविली. प्रबोधन कुलकर्णी दिग्दर्शक मिळाले. बालनाट्याचे आम्ही प्रयोग केले.

पुढे 'कोवळी उन्हे' हा एकपात्री प्रयोग मी २००८ पासून करू लागले. गेल्या काही वर्षात माझी सात-आठ पुस्तके प्रकाशित झाली होती. माझ्या काही पुस्तकांचे प्रकाशक विवेक मेहेत्रे यांनी आम्हाला सहकार्य केले. जाहिरात देऊन मी प्रयोग सादर करताना, ब्रोशर बॅनर काय लागेल ते वैशाली मेहेत्रे प्रेमाने बनवून देई. मग हिम्मत वाढली. मी मादाम क्यूरीवर ऑडिओ व्हिज्युएक शो प्रोड्युस केला. तेव्हा तिने मादाम क्युरीचे फोटो मिळवून डिसप्ले तयार करून दिले. असे अनेक उपक्रम पुढे मी उद्वेली बुक्सच्या ऑफिसमध्ये बसून मेहेत्रे दांपत्यासोबत केले. 'कोवळी उन्हे'चा १५०वा प्रयोग रविंद्र नाट्यमंदिरला केला. तो पाहून मेहेत्रे सरांनी माझे नाव इस्त्रायल मधील मायबोलीच्या कार्यक्रमासाठी सुचविले. महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमासाठी एकपात्री कलाकार म्हणून मी एकटीच इस्त्रायलला गेले. तेथे प्रयोग यशस्वी झाला. म्हणून पुढील वर्षीसाठी पुन्हा आमंत्रण मिळाले. मग मी व हेमंत साने गाण्याचा (काटावके) कार्यक्रम घेऊन गेलो. 'नाते सुरांचे मायबोलीचे' हे नाव देखील मेहेत्रे सरांनीच दिले.

कविवर्य अशोक बागवे, महेश केळुस्कर (लेखक), कवी अरुण म्हात्रे, सोमण सर, गीतकार प्रवीण दवणे हे सारे ठाण्यातील रहिवासी आहेत. यांची भाषणे ऐकायला जाणे ही एक पर्वणीच असते. ठाणे भूषण अनंत मेढेकर यांची भाषणे तर महाराष्ट्रात खूपच गाजली. १५ ऑगस्टला दरवर्षी कोर्टात त्यांचे सर्व वकिलांसमोर भाषण असते. प्रा. अशोक चिटणीस व शुभा चिटणीस यांची लेखणी सातत्याने ठाण्यातील कलावंतांवर लिहित असते. त्यांचा लोकसंग्रह खूप आहे.





**निता रणजीत भंवर**

रोहित भरत इंगळे
२८/१/१, रायगड नगर, बिल्डिंग नं.६
अभ्युदय नगर, काळाचौकी
मुंबई ४०००३३
मोबा.९८३३०२७०२९

# ठाणे तेथे काय उणे?



**मेघना साने**

पाखराने दिवसभर आकाशात फिरावे आणि रात्री घरट्यात परतावे तसे आम्ही ठाणेकर कलावंत! महाराष्ट्रातील कलाक्षेत्रात आमचा सतत वावर असतो, पण राहायला मात्र आम्हाला ठाणेच आवडते. कारण आमच्यातील कलावंत रोपट्याला खतपाणी येथेच मिळते. सांस्कृतिक दृष्ट्या ठाणे शहर जेवढे प्रगत आहे तेवढे क्वचितच कोणते शहर असेल. मुंबईत चित्रपट कलावंत भरपूर राहत असतील, परंतु ठाण्यातील प्रत्येक माणूस क्रिएटिव्ह आहे. कोणत्या ना कोणत्या कलेशी नाते जोडून असतो. इथलं हवा-पाणीच तसे आहे म्हणा ना!

गायन, वादन, नृत्य, वक्तृत्व, लेखन, कलाकुसर सर्व बाबतीत आघाडीवर असणारी माणसं इथं तळ ठोकून आहेत आणि त्यात आणखी भर पडत आहे बाहेरून येणाऱ्यांची. मी साधारण १९८८ मध्ये ठाण्यात राहायला आले. एकदोन वर्षातच माझी अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या मंडळींशी ओळख झाली. माझा राज्यनाट्य स्पर्धेचा अनुभव गाठीशी होता. मग 'गडकरी रंगायतन' येथे होणाऱ्या 'एकच प्याला' नाटकात शशी जोशी या दिग्दर्शकांनी भूमिका दिली. ठाण्यातील कलावंत रवि पटवर्धन प्रमुख भूमिकेत होते. यांना मी अनेक चित्रपटांत पाहिले होते. सिंधूची भूमिका मधुवंती दांडेकर करीत होत्या. त्यांचे गीत ऐकून मी तल्लीन झाले. या भूमिकेत स्टेजवर वावरताना बघून मला व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकात सुचविण्यात आले. सुयोगचे 'लेकुरे उदंड झाली' आणि नाट्यसंपदाचे 'तो मी नव्हेच' हे नाटक देखील मिळाले. प्रत्यक्ष प्रभाकर पणशीकर यांचे समवेत मी सुनंदा दातारच्या म्हणजे नायिकेच्या भूमिकेत महाराष्ट्रभर फिरले. लेकुरे उदंड झाली मध्ये प्रशांत दामले आणि सुकन्या कुलकर्णी यांचेबरोबर काम करायला मिळाले. साधारण ५ वर्षे व्यावसायिक रंगभूमीवर काम करताना माझ्या उपक्रमांमुळे माझा एकीकडे ठाण्यातील इतर संस्थांशीही बराच संबंध राहिला.

नवोदितांना व्यासपीठ देणारी भारतीय जन प्रबोधिनी, अत्रे कट्टा, ब्रह्मांड कट्टा यातून आम्ही आमचे पहिले-वहिले वाद्यवृंदाचे कार्यक्रम केले. कधी 'पितांबरी' पाठीशी उभी, कधी 'कोकण मराठी साहित्य परिषद' माझ्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशन प्राचार्य अशोक चिटणीस सरांनी को. म. सा. प. तर्फे केले तेव्हा ठाण्यातील सर्व सुजाण मंडळी पाहायला मिळाली. 'महाशब्दे ब्रह्मर्स' हे मल्हार टॉकीज जवळील ट्रॉफीचे दुकान म्हणजे कलावंतांचा, संस्थांचा एक अड्डा. महाशब्दे सगळ्यांना मदत करायचे. त्यांनी मला निवेदिका म्हणून 'वर्षा मॅरॅथॉन'साठी पाठविले. सतीश प्रधान साहेबांशी ओळख करून दिली. त्यांनी मला काम नीट समजावून दिले. वर्षा मॅरॅथॉनचे मी ५ वर्षे सूत्रसंचालन केले. ठाण्यातील लोकसाहित्याचे अभ्यासक प्रकाश खांडगे, आज त्यांना प्रसिद्धी भारताबाहेरही आहे. त्यांनी प्रथम लावणी महोत्सवात नाट्यरूपाने निवेदन करायची संधी दिली. गडकरी रंगायतन, शिवाजी मंदिर, षण्मुखानंद येथे मी नरेंद्र बेडेकरांबरोबर निवेदन करायला सहभागी झाले. पुढे मी दूरदर्शनला देखील अनेक कार्यक्रमांमध्ये मुलाखती घेण्याचे काम केले. तेव्हा तेथील निर्माते वंदन कुलकर्णी, वृत्तनिवेदक प्रदीप भिडे, चंद्रकांत बर्वे हे मला प्रोत्साहन देत. आता अनेक निर्माते ठाण्यात राहायला आलेत.

नाट्यपरिषदेत आम्हाला गुरुस्थानी असलेले नाटककार व कलाकार अशोक समेळ, सुयोग मधील सहकलावंत नटश्रेष्ठ लीलाधर कांबळी, तो मी नव्हेच मधील विघ्नेश जोशी हे सारे कोणत्या ना कोणत्या थिएटरला नेहमी भेटत असू. उदय सबनीस, मुग्धा सबनीस हे देखील अधून मधून भेटत, कुठल्या ना कुठल्या सेटवर. पण राहतात ठाण्यातच. नृत्य आणि संगीत क्षेत्रात भारतभर नाव कमावलेली मंडळी मंजिरी देव, मुकुंदराज देव, सोनिया परचुरे ही ठाण्यातील सांस्कृतिक शान आहे. मंजिरी देव या अनेक कथ्थक नृत्यांगनींच्या गुरू. श्री गणेश कला मंदिर कडून गोपीकृष्ण महोत्सवही आयोजित होत असते. यावर्षी महापालिकेतही महापौर चषक आयोजित करून अनेक चांगल्या कलावंतांना व्यासपीठ दिले.






हार्दीक शुभेच्छा


ज्येष्ठ नाटककार, वस्त्रहरण फेम मा. श्री. गंगाराम गवाणकर ठाणे येथे भरत असलेल्या नाट्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली ही आनंदाची बाब आहे.

'सिने-नाट्य साहित्य कोश' चे संपादक मा.श्री. सत्यवान तेटांबे हे नाट्य संमेलन विशेषांक प्रसिद्ध करत आहेत, हे वाचून अतिशय आनंद झाला. मालवणी भाषेला सातासमुद्रापार प्रसिद्धी मिळवून देणाऱ्या गवाणकरांना तसेच संपादक श्री. सत्यवान तेटांबे यांना हार्दीक शुभेच्छा!

**अभिनेत्री - निशा जाधव**

बी/४०५ लेमॉन्ट अपार्टमेंट, राणी सती मार्ग, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे जवळ, मालाड (पूर्व) मुंबई ९७

मो. ०९८६९७०८०९१



हार्दीक शुभेच्छा

प्रसिद्ध नाटककार, मालवणी भाषेला ज्यांनी सुगीचे दिवस दाखविले ते वस्त्रहरण फेम मा. श्री. गंगाराम गवाणकर हे नाट्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यामुळे नाट्यसृष्टीत आणि कोकणात आनंदी वातावरण आहे. अलिकडेच तेटांबे यांच्यामुळे आमची त्यांची भेट झाली व प्रत्यक्ष मुलाखत घेण्याची संधी मिळाली.

त्यांच्या पंच्याहत्तरीलाच त्यांना अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला हा दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. गंगाराम गवाणकर तसेच त्यांच्यावर विशेषांक काढणाऱ्या श्री. सत्यवान तेटांबे यांना हार्दीक शुभेच्छा !

**सुनिल ढेकळे**

गायक/ वृत्तपत्र लेखक

ए/३०२, पी ॲंड टी कॉलनी, गांधी नगर, डोंबिवली

मो. ०८१०८८०३५६५



हार्दीक शुभेच्छा

वस्त्रहरण फेम मा. श्री. गंगाराम गवाणकर ठाणे येथे भरत असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष होत आहेत ही आनंदाची बाब आहे. माझे मित्र नाट्यपरिषद बोरिवली शाखेचे माजी अध्यक्ष, पत्रकार, संपादक **श्री. सत्यवान तेटांबे** हे सालाबादप्रमाणे नाट्य संमेलन विशेषांक प्रसिद्ध करीत आहेत ही आनंदाची बाब आहे.

नाट्य संमेलन विशेषांकास तसेच गंगाराम गवाणकर यांना माझ्या लाख लाख शुभेच्छा!

**गंगाधर म्हात्रे**

माजी - कार्यवाह - अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, बोरिवली शाखा,

मो. ९२२४३२९२१२



ठाण्यात नाट्यसंमेलन होतंय ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे; परंतु नाट्यसंमेलन हे सर्व समावेशक असावे, विविध क्षेत्रातील नाट्यरसिकांपासून कलावंतापर्यंत सर्वांचा या नियोजनात सहभाग असावा असे मला वाटते, ते सद्यस्थितीत ठाण्यात होताना दिसत नाही. नाट्य रसिक आणि कलावंताचा एकत्रित सहभाग वाढण्याच्या दृष्टीने आयोजकांचे प्रामाणिक प्रयत्न हवेत.


**दीपक दळवी**
**संपादक - दै. महाराष्ट्र जनमुद्रा**
ए/३, पटवर्धन वाडा, जोशी वाड्यासमोर,
चरई, ठाणे ४००६०१
टेलीफॅक्स - २५३९७८४५ मो. ०९८२०४४०८२१
janmudra_thane@yahoo.co.in
deepakmdalvi2@gmail.com


---

### नाट्य संमेलन विशेषांकास हार्दिक शुभेच्छा

ठाणे येथे भरत असलेल्या ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद मा. श्री. गंगाराम गवाणकर हे भूषवणार आहेत.

गवाणकरांनी मालवणी भाषेला एक दर्जा प्राप्त करून दिला. तेटांबे प्रतीवर्षी नाट्य संमेलन विशेषांक काढून संमेलनावर प्रकाशझोत टाकत असतात. त्यांच्या या धाडसाचे कौतुक करावेसे वाटते. कारण दिवाळी अंकाचा पसारा,सिनेनाट्य साहित्यकोश, साहित्य संमेलन विशेषांक या सर्व गोष्टी करणे म्हणजे शिवधनुष्य पेलण्यासारखेच आहे. त्यामुळे तेटांबे यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. या अंकाचे प्रकाशन संमेलनात होत आहे ही आनंदाची बाब आहे.


**कुंदन गोटे**
संपादक
बहुजन रत्न लोकनायक, ठाणे.
मो. ९८९२७४१२०५


## चित्र-नाट्य सृष्टीतील कलाकारांच्या घरांचा व पेन्शनचा प्रश्न सुटलाच पाहिजे

### - श्रीमती पुष्पा पागधरे



पार्श्वगायिका, ज्येष्ठ ख्यातनाम गायिका श्रीमती पुष्पा पागधरे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट झाली असता त्यांनी वरील उद्‌गार काढले. खरं म्हणजे हा प्रश्न आजचा नाही. कित्येक वर्षापासूनचा हा प्रश्न आहे. तो अजूनही सुटलेला नाही. कित्येक मुख्यमंत्री, तसेच नाट्यसंमेलनाध्यक्षांनी प्रयत्न करूनही अजून काही झाले नाही. कित्येक कलाकारांचा शेवटचा कालखंड वाईट परिस्थितीतून जातो. आयुष्याच्या उमेदीच्या काळात त्याला तशी पैशाची गरज पडत नाही. पण सरता काळ आला की आर्थिक विवंचना पाठी लागते. मला विचारले तर मी हेच म्हणेन की हा प्रश्न तातडीने ऐरणीवर आला पाहिजे. नाट्यसंमेलनाध्यक्ष गंगाराम गवाणकर यांनी पाठपुरावा करून हा जटील प्रश्न सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावेत असे मला वाटते. नाट्य संमेलने ही अवश्य झाली पाहिजेत. त्यामुळे वर्षभर बिझी असलेल्या कलाकारांना एकदा का होईना भेटीगाठी घेता येतात. विचारांची देवाण-घेवाण होते. त्यामुळे कलाकारांना परत फ्रेशनेस येऊन ते अधिक जोमाने कामाला लागतात. असो ह्या नाट्य संमेलनास माझ्या हार्दीक शुभेच्छा!

शब्दांकन - सुनिल ढेकळे


**पुष्पा पागधरे**
बिल्डिंग नं.१, रुम नं ३५५,
एम.एच.बी. कॉलनी,
माहिम कॉजवे, मुंबई १६
मो.९८६९५३४१६०





हार्दीक शुभेच्छा

बहुजनरत्न
**लोकनायक**
MARATHI DAILY
ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, रायगड

**चंदन गोटे**
व्यवस्थापकीय संपादक

मुख्य कार्यालय - पॅराडाइज हाईटस्, (माझिनिंग)
पहिला माळा, प्रभात टॉकीज जवळ,
शिवाजी पथ, ठाणे (प.)
फोन - ०२२-२५३६३४३७/ २५३३२३१७
फॅक्स -०२२- २५३३२३१५
मो. ९८९२३६०६४७
ईमेल : bloknayak23@gmail.com

हार्दीक शुभेच्छा

**वैशाली प्रकाशन**
३२३, नारायण पेठ, पुणे
शाखा - प्रेरणा प्रकाशन (शैक्षणिक)

**विकास बुक एजन्सी**

**व्ही. पोतदार**
मो. ९८९०९३३७९०

श्रीप्रसाद रो हाऊस, उदय कॉलनी, सिडको-४,
पवननगर, नाशिक, फोन ०२५३-२३७०६०३
E-mail-vaishali.prakashan@yahoo.com

हार्दीक शुभेच्छा

**संतोष घोंगडे**
बुक कव्हर डिझाईन
आणि इलस्ट्रेशन
मो.९९२३५२५८८०

३०- कर्मक्षेत्र हौ. सोसायटी,
सेक्टर नं.२९, रावेत, पिंपरी-चिंचवड पुणे४११०४४
26santoshghongde@gmail.com

गंगाराम गवाणकरांनी 'व्हाया वस्त्रहरण'च्या प्रस्तावनेत म्हटले आहे, 'आयुष्यात मागे राहण्यातसुद्धा मोठी मजा असते, पुढे जाणाऱ्यांची घोडदौड मागे राहून आनंदाने पाहता येते.' आम्हाला आत्मचरित्रातील हे वाक्य फार महत्त्वाचे वाटते. कारण या वाक्यातच गवाणकरांचे मोठेपण आहे. स्वतः संकोचाने मागे राहून पुढच्याची घोडदौड मौजेने पाहणे फक्त फार स्वच्छ मनाच्या माणसालाच शक्य आहे. पु. ल. देशपांडे म्हणतात तसेच आहे. दुसऱ्याचे न बघवणाऱ्या माणसांना नाक जणू उडविण्यासाठी व मुरडण्यासाठीच असते. गंगाराम गवाणकरांचे आयुष्य म्हणजे दाही दिशांनी दुर्दशेतून, भर उन्हात वाळवंटातून जाता जाता, त्यांना कोकणची शोभा असलेल्या आम्रवृक्षाखाली काही काळ चिंता नसलेला विसावा घेता आला.

दिले. मी कॅमेऱ्यासह विमान येण्याच्या ठिकाणी उभा राहिलो. विमान आलं. पंतप्रधान इंदिरा गांधी हळूहळू एक एक पायरी उतरू लागल्या. समोर फक्त मी उभो होतो. त्यांनी विचार केला असेल, बाकीची नेतेमंडळी का दिसत नाहीत, आणि हा कोण उपटसुंभ येथे उभा. त्या खाली उतरल्या. मी माझा परिचय देऊन सांगितलं की मी अत्यंत दुःखद बातमी देण्याकरिता उभा आहे. 'अभिनेत्री नर्गिसजींचं अमेरिकेत निधन झालं.' त्यावर त्यांनी एवढंच सांगितलं, 'हमे बहुत दुख हुआ.'



एकच वाक्य बोलून त्या पुढे निघाल्या. मी त्यांना विनंती केली. 'और आप कुछ नही कहना चाहेंगे ।' माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता त्या पुढे गेल्या. मी सरळ देव आनंद यांच्या ऑफिसात गेलो. त्याचा बाइट घेतला आणि नर्गिसजींच्या बंगल्याबाहेर गाडी उभी केली. त्यांचे नातेवाईक किंवा घरातली मंडळी यांची विचारपूस करावी या हेतूने. तर काय पाहतो समोर! बंगल्याच्या बाहेर संजय दत्त आपल्या मित्रांबरोबर चहा पीत बसलेला. मी विचार केला आई वारली आणि हे महाशय येथे मित्रांबरोबर गप्पा काय करत बसलाय. त्यांनी मला पाहिलं,

संजय - कहिये याकूबजी यहा कैसे?

मी - नर्गिसजी की तबीयत के बारे मे पूछने आया था, कैसी है वह?

संजय - उत्तम. फर्स्ट क्लास, आत्ताच मी फोनवर बोललो, आप को बात करनी है - त्याने फोन लावला. मी नर्गिसजींशी बोललो.

ऑफिसमध्ये परतलो. आता प्रश्न होता पंतप्रधानांना 'ही खोटी बातमी होती' असं कोण आणि कसं कळवणार आणि कुठल्या तोंडाने. तोपर्यंत संध्याकाळचे सात वाजले होते. काही मीटिंगमध्ये त्यांनी ही बातमी पत्रकार आणि इतरांना सांगितली. शेवटी साडेसात वाजता त्यांच्या खासगी सचिवाला आम्ही भेटलो. त्यांना कळल्यावर त्या खूप रागवल्या. 'दूरदर्शन'च्या कारभाराविरुद्ध खूप काही बोलल्या.

दुसऱ्या दिवशी एक इंग्रजी वर्तमानपत्रात बातमी छापून आली

'Doordarshan shot Nargis Dead'

००० 

'लहानपण देगा देवा' बाळ कोल्हटकरांचं तीन अंकी नाटक मी 'दूरदर्शन' करिता ध्वनिमुद्रित केलं. ज्या दिवशी प्रसारण होतं त्या दिवशी यशवंतराव चव्हाण यांचा वाढदिवस होता. 'याकूब, मी साहेबांबरोबर त्यांच्या घरी नाटक पाहणार आहे. काळजी घ्या.' बाळासाहेबांनी मला सांगितलं होतं. संध्याकाळी साडेसहा वाजता नाटक सुरू झालं. पहिला अंक एका तासाचा. साडेसात वाजता मराठी बातमीपत्र आणि नंतर नाटकाचा भाग दाखवला जाणार होता. पण ६.२५ वाजेपर्यंत नाटकाच्या दुसऱ्या अंकाची टेपच सापडेना, शोध शोध शोधलं आणि निवेदन केलं की काही तांत्रिक कारणामुळे आम्ही 'नाटक' दाखवू शकत नाही. बाळासाहेब खूप चिडले. रेकॉर्डिंग इंजिनीअर होते सामंत. त्यांनी दुसऱ्या अंकाच्या टेपवर तिसरा अंक रेकॉर्ड केल्यामुळे दुसरा अंक सापडलाच नव्हता...

'दूरदर्शन'चा माझा अनुभव खूप विशाल. हे फक्त काही प्रसंग आठवणीत घट्ट रुतलेले...

ysayed1934@gmail.com

हार्दीक शुभेच्छा

**जनता दल (सेक्युलर) महाराष्ट्र**

**संगीता अनंत माने (शितोळे)**

शिवडी तालुका महिला, अध्यक्ष

१०, सी.डी.ओ. बॅरॅन्स, योगक्षेम समोर, जीवन वीमा मार्ग, चर्चगेट, मुंबई - ४००००२

फोन फॅक्स (०२२) २२०२६७८१/ २२८२१९३८

मो. ७७१८००७०४९

jantadalsmaha@gmail.com

**९६वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन, (ठाणे) २०१६ विशेषांकास हार्दीक शुभेच्छा**




# आमचो गंगो खयच्या खय गेलो!



**राजा पटवर्धन**

patwardhanraja@Lokmat.com

गंगाराम महादेव गवाणकर अखिल भारतीय नाट्यसंमेलनाचे (९६वे) अध्यक्ष म्हणून एकमताने निवडले गेले आहेत. (२०१६) त्यांच्या निवडीवरून जर जाहीर वादावादीही झाली असती तर गंगाराम त्यापासून दूर राहिले असते. भंडारी असूनही त्यानी कुणाशीही भांडण केलेले नाही, मारामारी तर दूरची गोष्ट. माडबन ही मिठगवाणे गावच्या १२ वाड्यांपैकी एक वाडी. मिठगवाणे हा एवढा प्रचंड मोठा गाव. चव्हाणवाडी, करेल, निवेली, हुर्से, जानशी, तिबरांबी, बाकाळे, भंडारसारखी होळी, दळे, कुवैशी आणि माडबन. भंडारसाखरी माडबन वगळेता अन्य गावातील सर्व खोत ब्राह्मण होते. दळे-होळीत गोखले, निवेली, बाकाळे, हुर्से, जानशीचे परांजपे. चव्हाण वाडीचे रानडे, करेलचे जोशी तर कुवेशीचे करंदीकर. या खोतांच्या गावच्या नावाला पुढे कर लावायचा म्हणजे मान द्यायचा. निवेलीचे निवेलकर झाले. बाकाळ्याचे बाकाळकर, करेलचे करेलकर त्याच न्यायाने 'गवाणं' गावचे खोत म्हणून गवाणकर. गवाणं गावचे मडबन हे नंतर पडलेले नाव असावे. १८८५ सालच्या कागद पत्रातही माडबन असाच उल्लेख आढळतो. परंतु माडबन हे माडाने भरलेले गाव अशा अर्थाने कुणीतरी गवाणं गावचा माडबन असा उल्लेख केला व तेच गाव पंचक्रोशीत मान्यता पावले. नाव यथार्थच आहे.



खुद्द गंगाराम गवाणकरांनीच त्यांच्या 'व्हाया वस्त्रहरण' या आत्मवृत्तात दोन ठिकाणी गवाणं गावचा उल्लेख केलेला आहे. 'कारण आम्ही माडबनगावचे बारा गवाणकर म्हणजे वतनदार खोत-नाईक. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या आरमारात साडेतीनशे वर्षांपूर्वी 'नाईक' या हुद्यावर असलेले भंडारी समाजाचे. आमचा माडबन हा गाव महाराजांनी 'नाईकांना' बक्षीसपात्र म्हणून दिलेला. अख्खा गाव माडाच्या बनाने नटलेला म्हणून त्याचं नाव 'माडबन' असं झालं; जुनी माणसं आमच्या गावाला 'गवाणं' च म्हणतात.

याच पुस्तकात आणखी एक उल्लेख आहे त्यावरूनही माडबनचे मूळ नाव गवाणं होते असाच दाखला मिळतो. विजया भास्कर फोडकर या मुलीची गंगारामशी पहिली भेट नोकरीनिमित्त झाली. दोघांचीही माझगाव नाईट हायस्कूल, डोंगरी हीच रात्रशाळा. त्यांच्यात संवाद झाला. तिने विचारलं, 'आपलं नाव?' 'गवाणकर.' गवाण्यातले म्हणजे माडबनचे?' 'हो, मी माडबनचा.' म्हणजे खोत ना? अहो माझी सख्खी आत्या गवाण्यात राऊतांकडे दिलीय. सासरेबुवा फोंडकरानीही गवाणकर खोत आहेत म्हणूनच त्यांना घरात घेतले होते. नंतरचे नाते जावयाचे.

आता गंगाराम गवाणकर इतके मोठे झाले आहेत की माडबनचे मूळ नाव गवाणंच होते याचा मी शोध घेण्याचेच ठरवले. देवाच्या गोठणेच्या विजया फोंडकरनी माडबनला गवाणं म्हटलेले आहेच. माझ्या आणखीन दोघा मित्रांनी यावर प्रकाश पाडला. त्यांची आजोळे आडिवरे व शिरसे गावची. ही दोन्ही गावे आत्ता जरी सागरीमहामार्गाने माडबनला जोडलेली असली तरी पूर्वी या गावाला जायला जैतापूर व दांडे या गावाच्या खाड्यातून होडीने जावे लागत असे. माझ्या मित्रांनी मला असे सांगितले की

आमच्या आजींच्या तोंडी 'आमची लेक गवाण्यात दिलेली' असाच उल्लेख असायचा. म्हणजे माडबनच्या भोवतीच्या सलग गावात जरी माडबन असाच आता उल्लेख होत असला तरी खाडीपलीकडे माडबनला 'गवाणं'च म्हणत होते. गवाणं गावचे खोत म्हणून गवाणकर हा मुद्दा.

गंगाराम गवाणकरांचे माडबन हे जन्मगाव. त्यांचे आजोळ दांडे (पंगेरे) गावात. त्यांचे बिगरी पर्यंतचे शिक्षण दांड्यावरच झाले. पहिली ते ७ वी पर्यंत माडबनला. माझे गाव 'जानशी' हे या दोन गावांच्या मधले. गंगारामच्या बालपणी व मुंबईला येईपर्यंत त्यांनी माझ्या वडिलांची अनेक कीर्तने ऐकलेली. त्यांचे मामा शिकलेले परंतु गवाणकरांच्या घराण्यात मागच्या पिढीत कुणाला अक्षरओळखही नव्हती. त्यामुळे शाळेत नोंदलेले जन्मसाल १९४१ एवढेच खरे. जन्मदिवस अंदाजपंचे. असा हा माडबनचा सुपुत्र 'शनीमहात्म्य' व 'नवनाथ' ग्रंथाचे साभिनय वाचन करायचा. शंकरभाऊ पटवर्धनांची पंचक्रोशीतील कीर्तने ऐकायला पायपीट करायचा. खोत असल्यामुळे जमीन होती. घरात भाताची पोती व कणगी भरलेली असायची. घरचा काका रेड्याचे जोत धरायचा. गंगारामनेही रेड्याचे जोत धरून थोडी नांगरकी केलेली आहे. गुढ्यावर बसून शेतातील ढेकळे फोडलेली आहेत. समुद्रावरून मासेही पकडले आहेत व काकाने मोठा मासा आणला तर त्याचे तुकडे विकून आईच्या संसाराला हातभार लावलेला आहे. त्याच्या प्रेमळ पाचीने (आईने) त्याला पाच वर्षांचा होईपर्यंत स्तन्य पाजलेले आहे. वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी एस.टी.च्या लालगाडीतून माडबनला वर्षाकाठी चार पाच फेऱ्या अजूनही मारणारा हा रांगडा गडी कणखर आहे. त्याचे हेच रहस्य असावे. नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद मिळाल्यावर जवळजवळ महाराष्ट्रभर त्यांचे ७५हून अधिक सत्कार झाले. आमच्या पंचक्रोशीतच ३ सत्कार झाले. २२ डिसेंबरला (२०१५) जानशी हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसमोर त्यांचा सत्कार झाला. त्यांच्या आत्मवृत्तातून त्यांच्या जीवनातील एक खंत माझ्या लक्षात आली होती. अंगात गणवेश घालून शाळेत जाण्याची त्यांची इच्छा कुणीही पूर्ण केली नाही. जानशीच्या हायस्कूलमधील सत्कारात मी समोरच्या दीड -दोनशे गणवेशधारी मुलांना उभे राहण्याची विनंती केली. 'गंगाराम गवाणकर! ही तुमचीच नातवंडे आहेत. पहा स्वच्छ गणवेश घालून शाळेत तुमचे मार्गदर्शन ऐकायला उत्सुक आहेत.' गंगाराम गवाणकर कृतकृत्य होऊन गेले. त्यांचे डोळे आनंदाश्रुंनी भरून गेलेले मी


हार्दीक शुभेच्छा




# न्यू लाइफ़ म्यूज़िक

की तरफ से रफ़ी साहब के चाहने वालो के लिए एक अनमोल DVD का सेट जो आप के लिए एक बेहतरीन कलेक्शन है ।

## ''रफ़ी सुरों का बादशाह''

जिसमे रफ़ी साहब के इन्टरव्यू, लाइव स्टेज शो है, जिसे आप ने कहीं नहीं देखा होगा ।
इसके अलावा हमारे पास पुराने कलाकारों के इन्टरव्यू,
डॉक्युमेंटरी, गीत और फोटो की DVD, VCD, MP3 हैं ।
जिसे आप घर बैठे भी मंगवा सकते हैं । (डिलीवरी चार्ज एक्सट्रा)
हम आप के पसंद के गाने भर कर भी देते हैं।

**New Life Music**

Bano Apartments, 4th Floor, Room No. 402,
Near St. John Convent School, Mumbra, Dist Thane 400612
**Rauf Khan- 9833843483**
**Mohammad Khan - 9892839221**
newlifemusic2010@gmail.com






अशा जर्मनी देशाचे अधिकारी बसले होते. दूरदर्शन मुंबई, आकाशवाणी, फिल्म प्रभाग, कुणीही उद्घाटन सोहळ्याचं रेकॉर्डिंग केलं नाही. एक मिनिटाचे बाइट कुणाकडे नाही, ही खेदाची गोष्ट आहे. माझ्याकडे ३ ऑक्टोबर १९७२ च्या सर्व वर्तमानपत्रांची कात्रणे असल्यामुळे एक आणि मी स्वतः संचालन करत असल्यामुळे भारतात दुसरा-माझ्याशिवाय कुणी व्यक्ती नाही- मी 'आँखों देखा हाल' -म्हणजे कॅमेरा किंवा रंगमंचाच्या पडद्यामागे झालेले हाल फक्त मीच सांगू शकतो.

०००

एका सकाळी एक अत्यंत तरुण मुलगी माझ्या ऑफिसात आली आणि आल्याबरोबर जोरजोराने रडायला लागली. 'तुम्ही असं का केलं? मी काय गुन्हा केला होता? मी आता जाणार नाही. मला इथेच ठेवा. हँहँहँ...' मी घाबरलो. ही वाक्यं जर परक्या व्यक्तीने ऐकली असती तर म्हणाला असता - बाहेर खेचा, त्या स्त्रीवर कार्यालयात अन्याय- नहीं चलेगा, नहीं चलेगा... मी तिला विनंती केली.

मी - मेहरबानी करून रडू नका. रडायचं असेल तर हळू. जोरजोरात नको.

ती - मी रडणार. काहीही म्हणू दे लोक.

मी- पण असं झालं तरी काय?

ती - मी निवेदिकेच्या ऑडिशनसाठी आले होते, पण परीक्षक मंडळींनी मला सांगितलं तुम्ही वाईट दिसता. वाईट बोलता- आपण जाऊ शकता, ह्याँ....

मी- थांबा थांबा, चला माझ्याबरोबर.

मी तिला साहेबांकडे घेऊन गेलो. सगळी हकीकत सांगितली. त्यांनी तिच्याकडे पाहिलं. मला सांगितलं, ''याकूब, आपण पुन्हा टेस्ट घेऊ या. कॅमेरासमोर चल.'' आम्ही परत स्टुडिओमध्ये आलो. तिला दिलेला निवेदिकेचा पेपर परत वाचायला लावला. ती ढसाढसा दोन ग्लास पाणी प्यायली आणि नंतर एक गरमागरम चहा घेतला.

'आता मी वाचू?' ती वाचायला लागली, वाह अगदी गोड आवाज, सुंदर चेहरा, सुंदर डोळे, तिने एक पान हळू, जोरात, मध्यम स्वरात खर्जमध्ये सात सुरांपैकी सर्व सूर लावले. साहेब माझ्याकडे पाहत होते.

मी - सर व्हॉट ए फेस, व्हॉट ए वाइस डोंच्यू अॅग्री?

साहेब - येस येस याकूब. यू आर राइट, आस्क हर टू कम फ्रॉम टुमारो.

दुसऱ्या दिवशी ती आली. म्हणजे ती रडूबाई 'दूरदर्शन'च्या इतिहासात आपली नोंद करून गेली. निवेदन, वृत्तवाचन, नाटकांत कामं, आणि फारच अल्प वेळात मराठी, हिंदी, बंगाली चित्रपटांत, भारतातच नव्हे तर संबंध जगात तिनं आपलं नाव गाजविलं,

ती होती स्मिता पाटील.

०००

आणखी एक घटना. १० जानेवारी १९८१ रोजी दुपारी २ वाजता न्यूज रूममध्ये एक निनावी फोन आला की प्रसिद्ध अभिनेत्री आणि खासदार नर्गिस दत्त यांचं अमेरिकेच्या रुग्णालयात निधन झालं आहे. बातमी पंतप्रधानांपर्यंत पोहोचायला पाहिजे होती. पी.एम.ओ. दिल्ली कार्यालयामध्ये फोन केल्यावर कळलं की पंतप्रधान आताच मुंबई दौऱ्यावर रवाना झालेल्या आहेत. मुंबई विमानतळावर अंदाजे साडेतीनपर्यंत पोहोचतील. त्यांना कळवावे. त्या काळी मोबाइल नसल्यामुळे ही अरेंजमेंट केली गेली.

मला सांगण्यात आलं की, तुम्ही ही बातमी पंतप्रधानांना विमानतळावर जाऊन द्यावी. मी विमानतळावर आलो. काँग्रेसची सर्व बडी मंडळी पंतप्रधानांच्या स्वागतासाठी जमली होती. मुंबईचे त्या वेळचे मुख्यमंत्री, राज्यपाल त्याचप्रमाणे दिलीपकुमार या सर्वांना मी बातमी दिली आणि त्यांचे बाइट घेतले. त्या वेळचे पोलीस आयुक्त होते राजाध्यक्ष. त्यांनी माझ्याबरोबर दोन इन्स्पेक्टर


हार्दीक शुभेच्छा

# ग्रंथ दर्शन

**बुक सेलर्स, स्टेशनर्स, प्रिंटर्स**
शालेय प्रशासन संदर्भ पुस्तके,
स्कुल रजिस्टर्स फॉर्म्स मिळतील.

**प्रतिभा जोशी**
भ्रमणध्वनी - ९७६९५०५००६
**नरेंद्र जोशी**
भ्रमणध्वनी -९९६९९६७९४९

१, वक्रतुंड बिल्डिंग, कलावती आई मठाजवळ
राबोडी- २,ठाणे (प.) - ४००६०१
granthdrashan@yahoo.com

**मागाल ते पुस्तक घरपोच**

इस्लाम धर्मात पाच वेळा नमाज पठण होते. सकाळी, दुपारी, संध्याकाळी, सूर्यास्त झाल्यावर व रात्री. कार्यक्रम उशिरा सुरू झाला. संध्याकाळच्या नमाजची वेळ जवळ आली. बिस्मिल्ला खान साहेबांनी मला जवळ बोलावले, ''याकूब, नमाज का वक्त हो गया है । हम नमाज पढने जा रहे है । दुसरा कोई आयटम रखो ।'' आता दुसरा आयटम म्हणजे दोन्ही हातांनी शंखच वाजवायला लागणार होता. मी त्यांना विनंती केली, ''खान साहेब, गरीब की नौकरी की सोचो, मै तो मर जाऊंगा । घर से बेघर... '' त्यावर खान साहेबांचं उत्तर, ''हम तुम्हे नई नौकरी देंगे ।'' कसंबसं मी त्यांना राजी केलं.

'दूरदर्शन'ची पहिली निवेदिका ज्योत्स्ना किर्पेकर कॅमऱ्यासमोर आली. आपल्या गोड आवाज व व्यक्तिमत्त्वाने तिनं 'पसायदान'च्या नंतरच्या कार्यक्रमाचं निवेदन केलं. बिस्मिल्ला खान साहेबांनी 'सा' लावला आणि सबंध प्रेक्षक वर्गातून 'वाह वाह'चे स्वर बाहेर पडले. त्याच वेळी आशा पारेख आणि गोपीकृष्ण आपल्या कार्यक्रमाची जुळवाजुळव करत होते. ग्रीन रूममध्ये कुणी तरी चहा पिऊन ग्लास ठेवला होता. तो टेबलवरून खाली पडला आणि फुटलेल्या ग्लासचा तुकडा नेमका आशा पारेखांच्या पायात रुतला. रक्तबंबाळ झाला पाय. आता ती कशी नाचणार? तिने स्वतःच जाहीर केलं, ''अब मैं नहीं नाचूंगी'' मला एकदम


**हार्दीक शुभेच्छा**

**।। वाचाल तर वाचाल।।**

# मैत्रेयी पुस्तकालय

**दर्जेदार ललित साहित्य, बालसाहित्य, पाककला, आरोग्य, ज्योतिषशास्त्र, काव्य, नाट्य, ऐतिहासिक, व्यक्तिमत्त्व विकास, धार्मिक इ. सर्व प्रकारच्या पुस्तकांचे पिंपरी चिंचवडमधील माहेरघर**

**श्री./सौ. कासवा**

**भ्रमणध्वनी - ९८२२०८०२२१**

शॉप नं. १, दुर्गा अपार्टमेंट, गोखले आळी,
मोरया गोसावी मंदिर रस्ता,
चिंचवडगाव, पुणे -३३


झाशीच्या राणीनं त्या काळी सांगितलेलं, 'अब मैं अपनी झाँसी नही दूंगी'ची आठवण झाली. माझी धावपळ सुरू झाली. होते नव्हते तेवढे डॉक्टर, वैद्य, सर्जन, हकीम ज्यांना मनुष्याच्या शरीराबद्दल थोडीफार जानकारी असेल सगळ्यांना पाचारण केलं. बाहेर प्रेक्षकगृह आणि घराघरांत टीव्ही पाहणारे बिस्मिल्ला खान साहेबांच्या सनईवर दाद देत असतील. माझी दाद कोण घेतंय-कुणी जवळ नव्हतं.

एक तर आशा पारेख खूप प्रसिद्ध अभिनेत्री, सुंदर, प्रत्येक हिंदी पिक्चर सुपर हिट. 'मै यह टॅबलेट नहीं खाऊंगी,' 'मै यह मरहम नही लगाऊंगी', 'स्किन जल जायेगी', 'मै पैर उपर नही कर सकूंगी' 'मै यह नही करूंगी, मै वह नही करूंगी' सगळा नन्नाचा पाढा. मी थोबाडीत मारल्यासारखा एका कोपऱ्यात उभा 'या अल्ला मेरी लाज रखियो' म्हणत. काही क्षण गेले आणि माझ्या कानावर शब्द पडले, ''याकूबजी अब मैं नाच सकती हूँ।'' कसला आनंद झाला. मनात म्हणालो, 'मला जर कथ्थक आलं असतं तर मीच गोपीकृष्ण यांच्याबरोबर जुगलबंदी केली असती.'

नृत्य सुरू झालं. बिस्मिल्ला खानसाहेब नमाज पठणासाठी गेले. सरकारी कार्यक्रम, तिकीट वगैरे काही नाही, 'हाऊस फुल' प्रेक्षकगृहात चार कॅमेरे लावले गेले होते- 'दूरदर्शन'च्या कार्यक्रमाकरिता लावतात तसे. एक, दोन, तीन,चार, पाच मिनिटं झाली आणि एकदम सगळा प्रेक्षक वर्ग ओरडला. बचाओ - मेलो-वाचवा-मला काहीच कळलं नाही काय झालं ते. मध्य ठिकाणी हत्तीच्या वजनाएवढा कॅमेरा (पूर्वी कॅमेरे खूप मोठे आणि वजनदार होते) स्टॅण्डवरून खाली कोसळला होता. सुदैवाने समोर कुणी बसलं नव्हतं. नाहीतर लग्न आणि श्राद्ध एकाच वेळी साजरं करावं लागलं असतं. आरडाओरडा...कॅमेरा पडला, कॅमेरा पडला... पेशवाई काळातला प्रसंग मला आठवला. 'नारायणरावांचा खून झाला.'

कसंबसं करून आठ-दहा गडी माणसांनी कॅमेरा वर उचलून ठेवला. कॅमेरामन होते सतीश भाटिया. कॅमेरा खाली पडला पण तो बंद झाला नव्हता. त्यामुळे तो चालूच होता. कथ्थक नाचाबरोबर कुणाचे पाय, चप्पल, बूट, काढून ठेवलेले हातमोजे, फ्रॉक घातलेल्या बायकांच्या पायांचे क्लोजअप अशी अनेक सेन्सॉरने कापली असती अशी दृश्यं त्या दिवशी सर्वांना दिसली.

उद्घाटन सोहळा संपला. भारताचा जगाच्या यादीत नंबर लागला. श्रीगणेशा झाला. मंचावर अली यावर जंग, वसंतराव नाईक, ए. के. गुजराल, उमाशंकर दीक्षित आणि ज्यांनी भारताला टीव्ही. ट्रान्समीटर व इतर तांत्रिक बाजूंचा फुकट पुरवठा केला



पाहिले. त्यांच्या ७५व्या वाढदिवशी मुंबईत झालेल्या समारंभात गणवेश घातलेल्या त्यांच्या नातवंडांनी त्यांना रंगमंचावर आणलेले पाहून सर्व प्रेक्षकही गहिवरले होते.

गावच्या १५-१६ वर्षांच्या वास्तव्यात त्यांना कधी उपाशी रहावे लागलेले नाही. भात-मासे हा आहार पोटभर होता. पण सातवी पास झाल्यावर भगवती देवीला साखर ठेवायला चार आणे त्यांच्या आईजवळ नव्हते. समुद्रकिनारी जाऊन कोयतीने कालवे बोचून त्याची विक्री करून चार आणे साखरेचा प्रसाद देवीला अर्पण करावा लागला. विजयदुर्गला सहलीला जाण्यासाठी वर्गणीचे चार आणेही मित्रानेच भरले. या स्थितीत शिक्षणासाठी मुंबईला उताराला (तिकीट)लागणारे दहा रुपये कोण देणार? या शोधातच एक वर्ष वाया गेले. पण गावात संभाजी राऊतांचा आखाडा होता. घोडदौड, दांडपट्टा, लाठी-बनाठी व कसरतीचे अन्य व्यायाम यामुळे शरीर मजबूत होते. शिकण्याची जिद्द होती. प्रत्येक मुंबईकराला आई 'गंग्याक मुंबईत न्या व बापसाकडे पोचवा' अशी विनंती करायची. अखेर विष्णुभाटकराना दया आली व त्यांनी उंचापुऱ्या मिसरूड फुटलेल्या गंग्याला अर्ध्या तिकिटावर टी.सी.ला म्हणजे त्यांच्या भाषेत चेकीन मास्तरला

चुकेवीत संडासात अधूनमधून लपंडाव करीत भाऊच्या धक्क्यावर आणला. या पुढची ससेहोलपट प्रत्येकाने 'व्हाया... वस्त्रहरण' मध्येच वाचायला हवी.

गंगाराम गवाणकरांनी त्यांचे आत्मवृत्त छापायची टाळाटाळ केली होती. मुंबईतल्या पहिल्या दिवसापासून त्यांच्या वाट्याला जे कर्माचे भोग आले त्याची मित्रपरिवारात चर्चा होत असे. सर्वजण लिहिण्याचा आग्रह करायचे परंतु 'आत्मप्रौढी'चे पाप माथ्यावर नको म्हणून ते टाळत होते. मला महाभारतातल्या कृष्णार्जुन संवादाची आठवण येते. कर्णाने युधिष्ठिर धर्म राजाला रणांगणात आमनेसामने लढाईत निष्प्रभ करून जीवदान दिले व 'द्रौपदीच्या आश्रयाला जा' असे म्हणाला. गंभीर जखमी होऊन युद्ध हरलेल्या स्थितीत धर्मराजा युद्धभूमीतून शिबिरात परतला. धर्मराजाचा रथ दिसत नाही म्हणून कृष्णार्जुन धर्मराजाच्या समाचारासाठी शिबिरात आले. धर्मला वाटले की कर्णाने अर्जुनालाही पराभूत केल्याने अर्जुन युद्धविन्मुख होऊन आला आहे. रागाच्या भरात त्याने अर्जुनाच्या 'गांडीवा'चा उद्धार केला. अर्जुनाने गांडीवाचा अपमान करणाऱ्याला जिवंत ठेवणार नाही असा मनातल्या मनात पण केलेला होता. अर्जुनाने तलवारीलाच हात घातला व







# हेमंत डोके

**शिवसेना मा. नगरसेवक**

**जुन्नर तालुका संपर्क प्रमुख**

**निवास -४३/७, सहकारनगर, वडाळा, मुंबई ४०००३१**

**भ्रमणध्वनी - ९८३३९९५७५८**

धर्मराजाच्या दिशेने जायला निघाला. हा अनर्थ टाळण्यासाठी कृष्णाने त्याला अडविले व म्हणाला ज्येष्ठ बंधूला मारायचे असेल तर शस्त्राची गरज नाही. त्याची शाब्दिक निर्भत्सना केलीस वा अरे तुरे केलेस तरीही ती हत्येसमानच असते. अर्जुनाने धर्मराजाच्या द्युतासकट सर्व गोष्टींचे पातक पाढे वाचले. कृष्णाने आपण का आलो त्याचा खुलासा केला. 'राजा! तू सुखरूप आहेस आता आम्ही युद्धभूमीकडे जातो.' तेवढ्यात खिन्न झालेल्या अर्जुनाने 'खंजीर' बाहेर काढला.

'अर्जुना आता कुणाला खंजीर खुपसणार आहेस?'

'स्वतःला!'

'का?'


'मला आत्महत्याच करायला हवी. कारण मी ज्येष्ठ बंधुला दुखावले आहे. त्याचा अपमान केला आहे. मला आत्महत्याच करणे क्रमप्राप्त आहे.' कृष्णाने त्याची मनःस्थिती ओळखून म्हटले,


'अर्जुना? आत्मप्रौढी'कर. आत्मस्तुती ही आत्महत्याच असते. अर्जुनाने मग आपल्या धैर्याबद्दल, शौर्याबद्दल, सव्यसाचात्वाबद्दल जवळच्या सर्व दिव्यांस्त्रांसह आत्मप्रौढीचा पाढा वाचला. कृष्ण म्हणाला, 'अर्जुना तुझ्या हातून आता आत्महत्येचे पातक घडलेच आहे. चल-युद्धात तुला कर्णाशी लढायचे आहे.' अर्जुनाने पांडवांना विजयी केले.

मुद्दा असा की गंगाराम 'आत्मप्रौढी 'करायला अखेर तयार झाला हे महाराष्ट्राचे भाग्य. नाहीतर वस्त्रहरण नाटकापुरताच त्यांचा पराक्रम मर्यादित राहिला असता. व्हाया...वस्त्रहरण या आत्मवृत्तामुळे गंगाराम गवाणकर केवळ नाटककारच नव्हे तर महान साहित्यिक झालेले आहेत. ही आत्मप्रौढी मुळी नाहीच. निरक्षर आईबापापोटचा हा कलंदर अवलिया आपल्या कर्तृत्वानेच शिखरावर पोहोचला आहे. आत्मवृत्तात आत्मप्रौढी कुठेच नाही. नम्रता व कृतज्ञतेने भरलेले हे आत्मवृत्त आहे. वस्त्रहरण नाटक की व्हाया... वस्त्रहरण हे आत्मवृत्त यात श्रेष्ठ कोण? वस्त्रहरणचे नोंदलेले ५४०० प्रयोग आहेत. हौशी कलाकार त्या नाटकाचे गावोगावी प्रयोग करीत असतात. त्यांची गणती कोण करतो? गंगारामने सर्व हक्क जनतेच्या हाती दिलेले आहेत.

वस्त्रहरण नाटकाची मूळ (एकांकिका) संहिता १९६१ साली जेजेस्कूलमध्ये विद्यार्थी असताना त्यांनी लिहिली. (आज काय नाटक व्होवचा नाय!) तिचा पहिला व्यावसायिक प्रयोग १९७५ साली रविंद्र नाट्यमंदिरात झाला. त्यात तात्या सरपंचाची भूमिका राजा मयेकरने केली होती. प्रयोग पुढे काही चालेना. मच्छिंद्र कांबळी यांनी नंतर तात्या सरपंचाची भूमिका करायला सुरुवात केली. फारसा फरक पडला नाही. अगदी कोकणचा


With Best Compliments From





**Dr. Avinash K. Diwate**
B.A.M.S., MD.
(Reg. No. I-44482-A-1)
Family Physician & surgeon
Mob. 9820394698

**Dr. Nivedita A. Diwate**
B.A.M.S.
Mob. 9768340633

Time- Mor.10.00 a.m. to 1.00p.m.
Eve. 6.00p.m. to 10.00 p.m.
Sunday Mor. 10 a.m.to 1.00p.m.


Shop No. 4, Prarthana Co.op. Hsg. Soc., Behind Link-View Hotel,
Malhar Rao Kulkarni Marg, Vazira Naka, Borivali (W.), Mumbai - 91




# आव्हानांशी जुगलबंदी

**याकूब सईद**





भारतात 'दूरदर्शन' २ ऑक्टोबर १९७२ ला रुजू झाले. तांत्रिकदृष्ट्या भारतात टीव्हीचा जन्म झालेला होता, पण त्याची सुरुवात मुंबईत झाली. मुंबई महाराष्ट्राची राजधानी असल्यामुळे मराठी भाषेला प्राधान्य मिळालं. 'दृष्टिआडची सृष्टी...'चा अनुभव मला अगदी पहिल्या दिवशीच मिळाला. २ ऑक्टोबर १९७२. वार सोमवार. भाभा ऑडिटोरियम् कुलाबा येथे 'दूरदर्शन'च्या उद्घाटन सोहळ्याचं आयोजन केलं गेलं होतं. साडेसहा ते साडेसातचा कार्यक्रम. थेट प्रक्षेपण होणार होतं. महाराष्ट्राचे त्या वेळी गव्हर्नर होते अली यावर जंग आणि वसंतराव नाईक मुख्यमंत्री. माझी बदली आकाशवाणी मुंबईहून 'दूरदर्शन'ला झाली होती. मी त्या कार्यक्रमाचा रंगमंच संचालक होतो.

सहा वाजून गेले. सव्वासहा झाले. सगळीकडे शुकशुकाट. एक पोलीस नाही की एक पोलीस व्हॅन नाही. वास्तविक पंतप्रधान इंदिरा गांधीच येणार होत्या. पण त्यांनी त्यांच्याऐवजी केंद्रीय आरोग्यमंत्री उमा शंकर दीक्षित यांना पाठवलं. भारताच्या कारकिर्दीत शिरपेच लावणारा सोहळा इतका थंड का? माझे निर्देशक होते पी. व्ही. कृष्णमूर्ती. मी त्यांना सांगितलं, 'साहेब गव्हर्नर साहेबांना फोन तरी करा.' मी कनिष्ठ ऑफिसर असल्याने मला फोन करता येत नव्हता. त्यांनी फोन लावला. त्यांच्या पी.ए.नी उत्तर दिलं 'काय उद्घाटन आज आहे? मी माझ्या डायरीत ३ तारीख लिहून ठेवलेली आहे.' त्याला जेव्हा कळलं की तारीख ३ नाही २ आहे, त्याची



काय तारांबळ उडाली असेल देवच जाणे.

पहिला कार्यक्रम पसायदान, संचालक वसंत देसाई. दुसरा बिस्मिल्ला खान यांचं शहनाईवादन आणि त्यानंतर आशा पारेख आणि गोपीकृष्ण यांचं कथ्थक नृत्य. भारतीय 'दूरदर्शन'च्या इतिहासात ही नोंद झाली पाहिजे की पहिल्या दिवसाचा कार्यक्रम ६.३० ऐवजी ६ वाजून ३८ मिनिटाला सुरू झाला.

अपेक्षित आहे. नाट्यसृष्टीशी मराठी माणसाच्या प्रेमाची असणारी बांधिलकी अभूतपूर्व आहे. काळ बदलला तरी रंगभूमीवरची मराठी माणसाची निष्ठा कमी झालेली नाही. त्याच्या या असीम निष्ठेमुळेच रंगभूमीवर काय सुरू आहे, याची त्याला नेहमीच उत्सुकता असते. त्याच्या रंगभूमीकडून काही अपेक्षाही असतात. नाट्य संमेलनाच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या रंगकर्मीकडून त्या अपेक्षा पूर्ण होण्याच्या दिशेने काही पाऊल पडते का, याची त्याला आस लागलेली असते. त्यामुळे नाट्य संमेलनांना नाट्यरसिकांची नेहमीच गर्दी होते. या पार्श्वभूमीवर सध्याची रंगभूमी आणि भविष्यात तिच्याकडून अपेक्षा याबाबतीत जाणून घेणे औचित्याचे ठरेल.

गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये अन्य नाटककारांची नवी नाटके व्यावसायिक रंगमंचावर आली आणि गेली. अगदी एखादा अपवाद सोडल्यास नवे व्यावसायिक नाटक पाहायला जावे, असे प्रेक्षकांना वाटले नाही. पुन्हा पुन्हा तर नाहीच नाही. पुन्हा पुन्हा म्हणण्याचे कारण असे की, काही नाटकांचे प्रयोग वारंवार घडत गेले, प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत गेला की, रंगभूमी प्रवाही राहते. सातत्य हेच तिचे चैतन्य असते. तशी ती चैतन्यमय राहणे आवश्यक असते. तरच तिची गुणवत्ता आणि प्रयोगशीलता याला अर्थ असतो.

नाटकांकडे प्रेक्षक हवा तसा वळत नसल्यामुळे निर्मात्यांनी अनेक नव्या युक्त्या योजायला सुरुवात केलीय. जुनी नाटकं नव्या तगड्या कलाकारांना घेऊन करणं, दोन-तीन निर्मात्यांनी एक होऊन एखाद्या नाटकाची निर्मिती करणं, तिकीट दर कमी करणं या त्यापैकी काही. पण एकमेकांच्या नाटकांवरून वाद घालण्यापेक्षा आज इंडस्ट्रीतल्या प्रत्येकाला ही सिस्टीम बदलावीशी वाटतेय. करार हा त्यातला एक भाग झाला, पण नाटक व्यवसायात बेशिस्त आल्याची तक्रार होत आहे. यावर मात्र, प्रकाश टाकणे आवश्यक आहे. नाटकाचे दर, कलाकारांच्या सहमतीशिवाय नाटकात होणारे बदल, निर्मात्याचा रिस्क फॅक्टर या सर्वांना गृहीत धरून एक नियमावली झाली पाहिजे. त्यासाठी नाट्यपरिषद, नाटककार संघ, निर्माता संघ, कलाकार व्यवस्थापक संघ यांनी एकत्र येऊन विचारविनिमय केला पाहिजे.


## लिहाज महिबुब मुल्ला

माझगाव डॉक तर्फे महाराष्ट्र नाट्य स्पर्धेत सहभागी असतो. २ वेळा उत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक अनेकवेळा प्रमाणपत्र



जून२००४ साली अखिल भारतीय नाट्य परिषदेचे सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनयाबद्दल शंकर घाणेकर पुरस्कार. व्यावसायिक रंगभूमीवर ६ ते ८ नाटकामध्ये सहभाग. कामगार नाट्य स्पर्धेमध्ये सहभागी व ३ वेळा अभिनयाचे प्रमाणपत्र

कामगार औद्योगिक स्पर्धेमध्ये १ वेळा प्रमाणपत्र

३७,४४ वृंदावन सोसायटी, ठाणे (प.)
मो. ९८६९०७१५९० (१/४)





## पुनम मेहेर

जन्म ७मार्च १९८५

**गायिका**

सुगम संगीत, भक्ती गीते, भावगीते, भजन, गजल

कु. पुनम जगदीश मेहेर
मु.पो. अर्नाळा, बंदर पाडा, ता. वसई, जि. पालघर
मो. ९७६५२२५१७८




दौराही फ्लॉप झाला. शेवटी पुण्याच्या बालगंधर्व मध्ये प्रयोग करून या नाटकावर कायमचा पडदा पाडायचा असे ठरले. पुण्यात काय झाले हे पहाण्यापूर्वी या नाटकाचा जो आत्मा म्हणजे तात्या सरपंच त्या व्यक्ती बद्दल. खऱ्याखुऱ्या माणसावर बेतलेले हे व्यक्तिमत्त्व आहे. ती व्यक्ती आज हयात नाही. तो स्वतःला वाल्या कोळी म्हणायचा. पुढे मागे बॉडीगार्ड असल्यासारखे दोघेजण असायचे. ब्रिटिश आमदानीत त्याच्यावर वॉरंट असताना माझ्या वडिलांनी त्याना आमच्या वठारातील एका पडक्या घरात लपवून ठेवलेला होता. आमच्या घरातूनच त्याला जेवणाचा डबा दिला जायचा. कुणाच्याही दृष्टीला तो पडू दिला गेलेला नाही. याचे उपकार तो बोलून दाखवायचा. स्वच्छ पांढरे मर्सराइज्ड धोतर व नेहरू शर्ट. लांब केस, कुणा कुणाला ठकवल्याच्या वार्ता सर्वत्र पसरलेल्या. एका दलालाकडून (आंबा व्यापार) पैसे आगाऊ घेऊन आंबे दुसऱ्यालाच पाठवायचा. मी एकदा त्याला विचारले, 'तुम्ही दररोज राजापूरला जाता ते कशासाठी?' 'माझो राजापुरात झुगाराचो अड्डो हा.' हातात पत्ते पिसण्याचा अभिनय करून त्यानी फुशारकी मारली.' मी म्हणालो, 'राजापूरला कुठे?' 'पोलीस ठेसनाच्या समोर. माझ्या अड्ड्यावरच पोलीस चाय पितात.'

असेच एकदा एस.टी. चा माडबनातला थांबा कुठे असावा यावरून वाद झाला. या सरपंचाला स्टॉप त्याच्या घरासमोरच हवा होता. एस.टी.च्या अधिकाऱ्याला तो म्हणाला, 'उद्या जर या वडाखाली एस.टी. थांबली नाय तर एस.टी. वडाक बांधून ठेवीन.' गावातला एक पुढारी रत्नागिरी जिल्हापरिषदेत सर्वोच्च पदावर होता. त्याच्याशी एकदा त्याचे भांडण झाले. 'माजा ह्या काम नाय झाला ना तर माजी रांड तुका व्हावेन मारात' असला इरसाल हा नमुना होता.

...तर पुण्याच्या ६०व्या प्रयोगाला पु. ल. देशपांडे सहकुटुंब, पै-पाहुण्यांसह उपस्थित राहिले. पुणेकरांना समजावा म्हणून वस्त्रहरणाचा प्रयोग अस्सल मालवणी ऐवजी मराठीत झाला. पु. ल. नी. प्रयोगानंतर सर्वांना फार्स आवडल्याचे सांगून गंगारामकडून त्यांचा पत्ता घेतला. त्यानंतर पु. ल. देशपांडे यांचे ते 'ऐतिहासिक' पत्र आहे. ते पत्र व्हाया वस्त्रहरणमध्ये वाचकांनी वाचावे. त्या वाक्यावाक्याची जाहिरात प्रसिद्ध व्हायला लागली. त्यात या नाटकात पु. लं. नी मला काम करायला आवडेल अशी इच्छा प्रकट केली होती. त्यानंतरचा इतिहास सर्वश्रुतच आहे. १७५ व्या प्रयोगाला पु. ल. देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून पुन्हा आले. 'मालवणी रोंबाट' म्हणून हिणवलेल्या नाटकाचे प्रत्येक दिवशी तीन तीन प्रयोग होऊ लागले. हजारावा प्रयोग खुद्द माडबनला झाला. मच्छिंद्र कांबळी व तात्यासरपंच समोरा समोरच आले.

माडबनच्या मातीत समुद्रकिनाऱ्याची वाळू आहे. आज


With Best Compliments From :
**Tufail A. Shaikh**
Managing Director
Mob. 9820136712

H.O. 24114963/ 24184473
Factory : 27683281/ 27682380 Fax : 24151793

## Al-Zareen Spices Products

***Specialist in :***
Chilli Powder, Turmeric Powder,
Coriander Powder & All Types of Other Masala

**Factory :**
T.T.C. Industrial Area,
Plot No. D/340, MIDC,
Turbhe, Navi Mumbai- 705

**H.Office :**
10 -A, Tata Mill Comp.,
Near Elphinstone Bridge,
Parel, Mumbai 400012

Email:tufail188@gmail.com



हार्दीक शुभेच्छा

## ॲड. सुरेश एन. शिंदे

बी.कॉम., एल.एल.बी., जी.डी.सी. ॲन्ड ए.

वकील उच्च न्यायालय आणि कर सल्लागार

Adv. Suresh_Shinde@Yahoo.com
मो.९८६९०२९३७५/ ८१०८८५५२८३
फॅक्स - (०२२) २८६२३६५४

**कार्यालय**
दुकान नं. १२६, पहिला मजला,शिव प्लाझा प्रिमायसेस सह. संस्था मर्या.,
स्टेशन रोड, कांदिवली (प.), मुंबई ६७,

संध्याकाळी ५ ते ८

त्या गावात फक्त भंडारी समाज राहतो. पूर्वी एक तेली, एक चर्मकार (त्याचे आडनाव गवाणकर) एक मुसलमान व एक ब्राह्मणाचे घर होते. माडबनकरी म्हणतात की हा गाव भंडाऱ्यांशिवाय इतरांना लाभत नाही. या गावातील शिरवडकर, मयेकर, राऊत, सुर्वे, वाघधरे, साखरकर, चव्हाण, कोंडेकर आणि खोत गवाणकर भगवतीच्या सेवेला सुयर-सुतकामुळे खंड पडू नये म्हणून पुजाऱ्याला 'भुते' नाव दिले. ते मूळचे गवाणकरच. ही देवी माडबनकरांची म्हणजे सर्व गावाची की केवळ गवाणकरांची असा ही एक अंतर्प्रवाही वाद आहे. असो. या गावाने १२ स्वातंत्र्य सैनिक दिलेले आहेत. तात्या सरपंचाने बॅ. नाथ पै यांची माडबन ते जैतापूर घोड्यावरून मिरवणूक काढली होती. (काँग्रेसवाल्यांकडून पैसे घेतलेय व बॅ. नाथ पै चो प्रचार केलो असे सरपंच सर्वांना सांगायचा.) गावात दारूमुळे किती जणांच्या घरात कलह माजले. माऱ्यामाऱ्या झाल्या. डोकी फुटली त्याचा ठिकाणा नाही. जुगाराचा अड्डा व दारूभट्ट्यांची पोलीस चौकीत नोंदी त्याला साक्ष आहेत. या गावाने कलाकारही दिले. भजनीबुवा, पेटी वादक, गायक, हरहुन्नरी लोकांनी भरलेला हा गाव. गंगारामला मुंबईच्या उकिरड्यावर चोरांच्या संगतीत राहण्याची 'जिद्द' या गावानेच दिली.

गंगारामला आपल्या पित्याच्या मुंबैच्या बिझिनेसची कल्पना नव्हती. काचा मारलेले धोतर, कमरेला सोग्याचा करदोटा, गावच्या मुलांना ढब्बू पैसा देणारा अशी प्रतिमा ठसलेली होती; परंतु हा जन्मदाता तब्बल बारा वर्षे गावी का येत नाही? याचा उलगडा गंगारामला होईना. ७वी पास झाल्यानंतरही एक वर्ष वाया गेले.

जैतापूरच्या खाणावळवाल्या आत्याने गंगारामला पितृदर्शन घडवले. 'ये मेहमान कौन?' असा प्रश्न खुद्द बापाने आपल्या मुलाकडे पाहून बहिणीला केला. गंगाराम गांगरूनच गेला. ४X ६ असा ४५ चौरस फूटही नसलेल्या पत्र्याच्या खोलीत म्हणजे खुराड्यात गंगारामने प्रवेश केला. एक कोळशाची शेगडी, लाकडी भुसा घासलेटची त्रिकोणी चिमणी, बिनकडी कोयंड्याची पत्र्याची पेटी. पत्र्याच्या भिंतीला अनेक भोके दारच नसलेले खुराडे त्याला उंबारठा कशाला?

सार्वजनिक संडासात नळ, तिथूनच आंघोळ व प्रातर्विधी अशी आन्हिके उरकायची. या संडासाला आतून कडीही नाही. दोरी बांधलेली. सर्व उपचार पटापट आटपून घ्यायचे अशी बापाने समज दिलेली, कारण खूप मोठी पाण्यासाठी रांग असते. माडबनच्या नाईक खोत गवाणकरांच्या एकुलत्या एक वंशजाचे हे असे जंगी स्वागत झालेले.

अवती-भोवती गांजा, चरस पिणारे, भंगार चोरून विकणारी पोरे, ४X ६च्या खोलीत दारूअड्ड्याची पंगत प्यायला जमायची, त्यात बाप सामील झालेला. पोराच्या हातावर चार आणे टिकवून त्याला दूर जा असा सल्ला मिळाला. त्याच खुराड्यात बाप गोणपाटात स्वतःला गुंडाळून झोपी गेला. पोरगाही तिथेच कलंडला. माडबनला अंगणात आकाशाखाली नक्षत्रांची रांगोळी पाहत ध्रुवतारा शोधणारा गंगाराम जिवाची मुंबई करता झाला. या वातावरणात बापाने त्याच्या नाश्ता -जेवणाची महिन्याने फेड केली जाईल अशा आश्वासनाने सोय केली होती. उधारीवर का होईना खोताचा झिलगा उपाशी राहिला नाही. या वातावरणात शाळेत गणवेश घालून जाण्याचे स्वप्न तर कसे पडणार? माडबनच्या खोताची अशी तऱ्हा झाली तो भंडारी होता म्हणून नव्हे. काही ब्राह्मण खोतही झोपडपट्टीत राहायला आलेले आहेत.

शाळेचा विषय एकदा काढण्याचे गंगारामने ठरवले व पिता काय म्हणतो ते ऐकण्याचे धैर्य एकवटले. बापाने चक्क बोगीच्या तिकिटाची सोय करतो म्हणून सुनावले; परंतु एका कंत्राटदाराला छोकऱ्याला काम देण्याबद्दल शब्द टाकला. गंगारामला बापामागे पाण्याची बादली घेऊन कपबशा पुसत जाण्याचेच नशिबी आले होते. वडिलांचा बिझनेस होता तो गरम चहा किटलीत घालून 'चाय गर्रमऽऽम' म्हणत गल्लोगल्लीत फिरण्याचा. त्या कामापेक्षा सहाआणे रोजंदारीवर घमेल्यातून रेती, खडी, सिमेंट, विटा उचलण्याचे काम त्या बालमजुराला बरे वाटले. शिक्षणाची तळमळ होतीच. बालमजुरी चालू असताना 'मैसमा' सारखी मैत्रीण लाभली. ही तेलगू युवती गंगारामचे लाड पुरवायची. त्याचे घमेले जड होऊ नये म्हणून काळजी घ्यायची व विमानात बसून जेवताना सोबत करायची. कंत्राटदाराला कळले की गंगाराम रात्र शाळेत शिकतो. त्याला इंग्रजीत सही करता येत नव्हती. कंत्राटदाराला गंगारामने इंग्रजी सही करण्याचे शिकवले. गंगाराम मुनीम बनला. त्याचा रोज दुप्पट म्हणजे दिवसाला १२ आणे झाला व घमेली वाहण्याऐवजी हजेरी व हिशोब ठेवण्याचे कारकुनी काम मिळाले. रोजगार मिळाला. पोटालाही मिळत होते. पण पावसाळ्यात त्या उकिरड्यावर झोपायचे कसे हा गंभीरप्रश्न होता. शेजारच्या स्मशानभूमीतील एका कर्मचाऱ्याने खड्डे खणण्याच्या बदल्यात झोपायची सोय केली. बऱ्याच वेळी सरणावर लाकडे घालावी लागत. अर्भके पुरण्यासाठी खड्डे खणताना पूर्वी गाडलेल्या अर्भकांचे अवयव दिसायचे. मग गंगारामच्या वडिलांना शिव्यांचा भडिमार व्हायचा. गंगाराम निमूटपणे सर्व सहन करायचा. अन्न, वस्त्रा प्रमाणे 'निवारा' किती महत्त्वाचा असतो त्याचा धगधगता अनुभव मिळत होता. कधी कधी गारव्यात अपुऱ्या पांघरुणामुळे प्रेतांना जाळणारी धग हवीशी वाटायची. गंगारामची भीतीच नष्ट झाली. भुताखेतांच्या अस्तित्वावरचा विश्वासही उडाला असणार.



# नाट्य संमेलनाकडून अपेक्षा

- दीपक बिडकर

मागील संमेलना वेळी राज्य सरकारने नाट्य विद्यापीठ उभारण्याची घोषणा केली होती. नवे सरकार यासंदर्भात काय पावले उचलणार, याकडे नाट्यकर्मींचे लक्ष लागलेले आहे. संमेलनाच्या उद्‌घाटन समारंभास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहिले. नाट्यनगरीला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आले. शिवाय मुख्य मंचाला अभिनेत्री स्मिता तळवलकर यांचे, तर श्रीकांत मोघे यांच्यासह अभिनेते सदाशिव अमरापूरकर, कुलदीप पवार आणि नयनतारा यांची नावे इतर रंगमंचाला देण्यात आली.

सध्याच्या लोकप्रिय कलावंतांमधील बहुतांश जण हौशी रंगभूमीच्या चळवळीतून पुढं आले आहेत. मात्र, नंतर त्यांनी या चळवळीकडे दुर्लक्षच केलं आहे. नाट्य संमेलनाला होणारी गर्दी आता कमी होत चालली आहे. प्रेक्षकांची बदलती जीवनशैली, इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे अतिक्रमण, नाटकव्यवसायातील नवी पिढी या गोष्टी पाहता नाट्य संमेलन ही संकल्पना बदलेल का? संयोजनातल्या अडचणी मराठी माणसाच्या या जुन्या परंपरेसाठी घाला ठरतील का? या साऱ्या विषयाची उकल होणे आवश्यक आहे.

कोणत्याही नाट्य संमेलनाचं मुख्य आकर्षण असते ते चर्चेत असलेल्या अभिनेते-अभिनेत्रींची उपस्थिती. रुपेरी किंवा छोट्या पडद्यावर दिसणारी कलावंत मंडळी प्रत्यक्ष भेटतात म्हणून रसिकवर्ग संमेलनाला आवर्जून हजेरी लावतो. या सगळ्या नटमंडळींच्या कारकिर्दीचा प्रारंभ होतो तो हौशी रंगभूमीवर. एखाद्या एकांकिका किंवा राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयगुणांमुळे त्यांचा लौकिक होतो आणि ही मंडळी व्यावसायिक रंगभूमीवर पोचतात, यशस्वी होतात. त्यांच्यातील कलागुणांबद्दल शंका घेण्याचे काहीच कारण नाही. मात्र, हौशी रंगभूमीची शिडी करून हे सारे व्यावसायिक स्तरावर पोचले, की मूळ चळवळीशी असलेलं त्यांचं नातं तुटतं.

पुणे-मुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्रातील रंगभूमीवर काय चालले आहे याच्याशी व्यावसायिक कलावंतांना देणे- घेणे राहिलेले नसते. ज्या हौशी रंगभूमीनं उत्तमोत्तम कलावंत घडवले, तिची अवस्था आज काय आहे? मराठवाडा, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा प्रश्न असो किंवा शालेय शिक्षणाच्या दर्जाचा, असे विषय या भागात होणाऱ्या एकांकिका स्पर्धांमधून सादर होत असतात. स्त्री भ्रूणहत्या किंवा महिलांवरील अत्याचारांचे विषय पश्चिम महाराष्ट्रातील स्पर्धांमधून हाताळले जातात. तरीही आविष्काराच्या पातळीवर, तांत्रिक दर्जाबाबत ही नाटके- एकांकिका दुय्यम असतात. विषयाचा पट मोठा असतो, पण सादरीकरणात त्याचे ओझे झालेले असते. तरीही आपापल्या जगण्याशी संबंधित विषयांना भिडून उर्वरित महाराष्ट्रातील नाट्य चळवळ आपापल्या मगदुरानुसार कार्यरत आहे. या सगळ्याशी नाट्य संमेलनाचे काहीच देणेघेणे नाही काय?

रंगभूमीसमोरच्या प्रश्नांचीही चर्चा व्हायला हवी. एकेकाळी या रंगभूमीने सुवर्णकाळ अनुभवला आहे. मधल्या काळात रंगभूमीची अवस्था फार वाईट झाली होती. आता तिला जरा बरे दिवस येत आहेत. या रंगभूमीकडून नाट्यरसिकांच्याही काही अपेक्षा आहेत. त्याची नोंद संमेलनांच्या व्यासपीठावरही घेतली जाणे

**श्री. भास्कर वाकडीकर-सर**
(चतुरस्त्र आणि हरहुन्नरी अभिनेता)
व्यवसायाने मास्तर असून विशेष अभिनयाची ओढ, अनेक मराठी-हिंदी मालिकांमधून आपल्या अभिनयाची छाप... तसेच अनेक मराठी सिनेमात विभिन्न प्रकारच्या भूमिका

मुक्काम पोस्ट शिरढोण
तालुका पनवेल, जिल्हा रायगड
मोबा. ९९२१२१६६०९
९७६९३३८००७/ ९२२०२८३३३०

पुणे येथे आयोजित करण्यात आला. त्याचे आमंत्रण स्वीकारले. पुरस्काराचे वितरण करून पु.लं.च्या स्मृती जागवल्या.


१८) महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेची व पुरुषोत्तम करंडक या आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष. कलोपासक व पुरुषोत्तम करंडक स्पर्धेशी मी पहिल्यापासूनच जोडला गेलो आहे. या स्पर्धेच्या अंतीम स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरणासाठी पुण्याला गेलो. पारितोषिके प्रदान करताना पुरुषोत्तम करंडकचे प्रणेते राजा नातू यांची प्रकर्षाने आठवण झाली व त्या निमित्ताने राजा नातूंच्या स्मृती जागविल्या.

१९) पुण्याच्या भरत नाट्य संशोधन मंदिराला १२० वर्ष पूर्ण झाली.१२० व्या वर्धापन दिनासाठी निमंत्रण स्वीकारले. भरत नाट्यमंदिर ही पुण्यातील सर्वात जुनी नाट्यसंस्था. या संस्थेशी माझा ६० वर्षांचा संबंध आहे. माझ्या अध्यक्षतेखाली १२० वा वर्धापनदिन सोहळा यशस्वीरित्या संपन्न झाला. भरत नाट्य मंदिरात ६० वर्षांपासून वेळोवेळी केलेल्या नाट्यप्रयोगाच्या स्मृतींना उजाळा दिला.

२०) महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा

५३ व्या विभागीय स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यासाठी शासनाचे निमंत्रण स्वीकारले व १३जून रोजी संपन्न झालेल्या पारितोषिक वितरणाचे अध्यक्षपद स्वीकारून कलाकारांचे अभिनंदन केले.


**हार्दीक शुभेच्छा**





# भारतीय जनता पार्टी - मुंबई
## वसंतराव जाधव
**सेक्रेटरी**

कार्यालय -७, युनायटेड हाऊस, जे.के.सावंत मार्ग,
स्टार सिटी सिनेमाच्या बाजूला, माहीम, मुंबई-१६
फोन ०२२-२४३०९०५४
मो. ९८२१०७३५२५


तसेच सर्व स्तरातील स्पर्धेतील अंतीम फेरीतील सर्वोत्कृष्ट नाटकांना व कलाकारांना पारितोषिक वितरण सोहळा चंद्रपूर येथे आयोजित केला होता. प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रपूरला जाऊन पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन केले. मा. सांस्कृतिक कार्यमंत्री श्री.संजय देवतळे यांच्या अध्यक्षतेखाली सोहळा संपन्न झाला.

२१) या वर्षातील महत्त्वाची घटना म्हणजे लोकसत्ता आयोजित महाराष्ट्रातील आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा, तरुणाईला या स्पर्धेतून चांगले व्यासपीठ मिळाले आहे. लोकसत्ताचे अभिनंदन. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरणासाठीही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिलो. तरुणाईने सादर केलेल्या लोकांकिका पाहिल्या. कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लोकांकिका मराठी रंगभूमीला नवी दिशा देणाऱ्या ठरल्या. आजची तरुणाई उद्याच्या रंगभूमीची आशा आहे.

२२) माझा मित्र व सहकारी बाळ कर्वे यांची पंचाहत्तरी साजरी झाली. या सोहळ्यास आनंदाने हजर राहिलो व आनंद सोहळ्यात मित्राचे अभिष्टचिंतन केले.

२३) नाट्यकलेला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी महाराष्ट्र टाईम्सच्या वतीने म.टा.सन्मानासाठी स्पर्धा आयोजित होत असतात. त्यात प्रायोगिक रंगभूमीवरील नाटकास उपेक्षित ठेवले जाते. फक्त नाटकाला सन्मानित केले जाते. मी पत्र लिहून नाटककार, दिग्दर्शक, कलाकार आदींना सन्मानीत करावे अशी विनंती केली होती. तसेच परीक्षकांची संख्या विषम असावी अशीही विनंती केली होती. दुर्दैवाने माझी विनंती मान्य करण्यात आली नाही.

रसिकहो, माझा संक्षिप्त अहवाल आपल्यापुढे ठेवत आहे.

सकारात्मक परिवर्तनाची ही नांदी असू शकते, असे विधान मी माझ्या भाषणात केले होते. सुप्रसिद्ध दिग्दर्शक श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांचे खालील विधान माझ्या विधानाला पुष्टी देते.

अनेक प्रकारची, वेगवेगळ्या विषयावरची, विविध आशय कवेत घेणारी नाटकं रंगभूमीवर एकाचवेळी सुरू असणं आणि प्रेक्षकांनी त्यांचे आत्मीयतेने स्वागत करणं ही रंगभूमीच्या बहराची खूण असेल तर मराठी नाटकाच्या बहराची नांदी सुरू झाली आहे.

आपण केलेल्या कार्यावर समाधानी असू नये. जो समाधानी पावला त्याच्यातील सृजनाची ऊर्जा संपली असे मानणारा मी आहे. सहा दशकं कार्य करूनही मला ही ऊर्जा शेवटपर्यंत टिकवायची आहे.

धन्यवाद!



स्मशानात भुतांऐवजी माडबनच्या खोताला शंकराचे दर्शन घडू लागले. स्मशानातून प्रचंड ऊर्जा मिळाली असावी. स्मशानातल्या बाकावर बसून गंगारामचा रात्रशाळेचा अभ्यास होऊ लागला. गोपाळ गणेश आगरकर म्युनिसिपल दिव्याखाली शिकले तर १९६०-६१ साली गंगाराम स्मशानातील दिव्यांवर स्मशानात राहून शिकला. धडपडणाऱ्या चितेच्या प्रकाशाच्या साक्षीने.

रात्रीच्या शाळेत शिकताना फाटक गुरुजींनी तू मोठा लेखक होशील हे एका निबंधावरून केलेले भाकित खरे ठरले. वि. स. खांडेकरांनी गंगारामला जवळ घेऊन आशीर्वाद दिला व वहीत संदेशही लिहिला. फाटक गुरुजी पुन्हा म्हणाले की, ही मोठे होण्याची लक्षणे आहेत. हेही भाकित खरे ठरले. अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या यापूर्वीच्या अध्यक्षांची ९५ नावे वाचल्यावर हे स्पष्ट होईल. दादासाहेब खापर्डे , शिवराम महादेव परांजपे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर इ. टिळक युगातील नावे त्यात आहेत. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, बाल गंधर्व, आचार्य अत्रे, विनायक वामन शिरवाडकर, पु. ल. देशपांडे असे महान असामी ज्या खुर्चीवर बसले त्यांच्या खुर्चीवर आमच्या आजच्या माडबन (ता. राजापूर) गावचा निरक्षर आईबापांचा मुलगा विराजमान होताना पाहणे हे आमचे थोर भाग्य आहे. ही व्यक्ती माझा जवळचा मित्र आहे हे मी सर्वांना अभिमानाने सांगतो.

एका बोलीभाषेतले म्हणजे मालवणी नाटक इंग्लंडला घेऊन जाणे, तेही २२ जणांच्या संचासह व प्रॉपर्टीत बाळंतकाढ्याची बाटली सुद्धा. कुणाच्याही समोर हात न पसरता हा संच इंग्लंडला जाण्यासाठी षण्मुखानंद हॉलमध्ये - सिनेमा-नाट्य सृष्टीतील दिग्गजांनी भूमिका केल्या. तीन तासाचे नाटक साडेचार तास चालले. दिग्गजांनी मूळ संहितेला आपापली बहारदार भरही घातली व श्रोत्यांनी हास्यकल्लोळ टाळ्यांचा गजर सुरू ठेवल्याने नटांना थांबावे लागे. वाचकांनी 'व्हाया... वस्त्रहरण' पुस्तक विकत घेऊन वाचावे म्हणूनच ही नामावळी देत आहे. डॉ. काशिनाथ घाणेकर, नाना पाटेकर, अशोक सराफ, सचिन पिळगावकर, दिलिप प्रभावळकर, बाळ धुरी, विजू खोटे, मास्टर भगवान प्रेक्षकात गानसम्राज्ञी लता मंगेशकर. हा विक्रम अजरामर राहील. कारण पु. ल. देशपांडे यांनी या नाटकात स्वतः भूमिका करण्याची इच्छा व्यक्त केली होती. गंगाराम गवाणकर व मच्छिंद्र कांबळी आपल्याला विनंती करून 'वस्त्रहरणात' सामील व्हायला आमंत्रण देत आहेत. वरील दिग्गजांनी 'हो' म्हणून स्वतःची उंची अधिक वाढवली. हा पराक्रम गंगारामच्या आयुष्यातील इंग्लंडला नाटक नेण्याइतकाच महत्त्वाचा आहे.

मला स्वतःला हा आनंद फार झाला कारण १९८४ साली मी व माझ्या सहकाऱ्यांनी मिठगवाणे पंचक्रोशी विकास मंडळातर्फे गावातील निवडकांचा सत्कार समारंभ आयोजित केला होता. त्यात गंगाराम गवाणकर एक होते. बॅ. अंतुलेंच्या उपस्थितीत हा सत्कार मुंबईच्या 'रविंद्रनाट्यमंदिर'मध्ये झाला. त्यावेळी 'वस्त्रहरण' इंग्लंडला जाईल अशा शुभेच्छा मी दिल्या होत्या. त्यानंतर षण्मुखानंदचा प्रयोग झाला व नाटक शेक्सपियरच्या भूमित जाऊन पोहोचले. त्यावेळचे अनेक फोटो माझ्याजवळ जतन केलेले होते. ते पाहून गंगाराम अवाक् झाले. त्यावेळी मच्छिंद्र कांबळीही हजर होते.

गंगारामची नाट्यकर्मी म्हणून कामगिरी बॅकस्टेज आर्टिस्ट म्हणून सुरू झाली. नाटकातील नामावली वाचून दाखविली, एकांकिका लिहिल्या. अनेक स्पर्धेत आपली नाटके सादर करून बक्षिसे मिळवली. नाटकात भूमिका केल्या. चित्रपटांच्या कथा-संवाद लिहिले, व्हाया... वस्त्रहरण चे किस्से सांगणारे कार्यक्रम केले आणि हे सर्व करीत असताना पोस्टाचे डबे रंगविले, मुलांना ड्रॉईंग शिकवून महिना १०रुपये शिकवणीतून कमाई केली. शिपाई म्हणून नोकरी केली. आईला मांडीवर घेऊन तिच्या वयाच्या ३५व्या वर्षी शेवटचा श्वास घेताना पाहिले. मात्र एक गोष्ट केली नाही. रामागडी म्हणू राबणार नाही असे मालकीणबाईला ठणकावून सांगितले. आयुष्यात काय काय उद्योग केले? सकाळी ६ ते रात्री अकरा हा कित्येक वर्षांचा दिनक्रम होता. अकरानंतर वि. स. खांडेकर, साने गुरुजी, आचार्य अत्रे वाचून काढले. महाराष्ट्राच्या चळवळीतली भाषणे ऐकली. पुस्तके उधार, जेवण उधार असे दिवस जात असताना एक दिवस ११ वी पास झाला. त्याच रात्री डोंगरीतल्या उकिरड्यावर धो धो पावसात ताडपत्री गुंडाळून फूटपाथवर झोपला. दांडक्याने ढोसकून 'नाम बोलो' पोलिसांनी दरडावले.

'गंगाराम महादेव गवाणकर!'

'मराठी आहेस?'

'हो!'

'वय?'

'एकोणीस!'

'शिकलायस का?'

'मॅट्रिक पास आहे. कालच रिझल्ट लागला.' एकाच वेळी दोघांनी डोळ्यांवर बॅटरीतून झोत पाडला. 'मग इथे का झोपतोस?' मनात आलं वडिलांची मेहरबानी. असे उत्तर द्यावे परंतु हे शब्द बाहेर आले नाहीत. कुणाविषयी तक्रार करायची नाही. जे समोर येईल, त्याचा आहे तशा अवस्थेत स्वीकार

करायचा, असे ठरवून टाकलेलं होतं. मग इथे का झोपतोस? या प्रश्नाला 'नाइलाज' असे उत्तर दिले.

'वडील कुठे आहेत?'

गोणपाटात झोपलेल्या वडिलांकडे बोट दाखवले.

बेवारस लोकांची पहाटे शिरगणती करण्यासाठी पोलीस आले होते.

'बाप समोर असताना- बेवारस!'

इंग्लंडहून परत आल्यानंतर सुद्धा गावचे घर बांधले नव्हते. १९९० साली घराच्या पायाचा चर खणला होता. खोल होता. माझ्या वडिलांनी (कीर्तनकार शंकरभाऊ पटवर्धन) त्या चरात उतरून गंगारामने दिलेले सोन्याचे नाणे स्वहस्ते ठेवलेले आहे. असा आमचा ऋणानुबंध. मीच स्वतः माझ्या वडिलांना माडबनला या शुभप्रसंगी घेऊन गेलो होतो. आज मुंबईत सर्व मुलांना स्वतंत्र घरे आहेत व गावीही छान घर बांधलेले आहे.

हे सर्व चालू असताना गंगाराम गवाणकर पोस्टातली नोकरी करायचे तरी कधी? असा प्रश्न पडला. ते आत्मवृत्तात लिहितात की 'मी पोस्टात सम्राटासारखी नोकरी केली.'

२००८ साली त्यांच्या व्हाया वस्त्रहरणचे पहिले प्रकाशन झाले.


२००३ सालापासून जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला पराकोटीचा विरोध संघटित होऊ लागला होता. माडबन गाव हा विरोधाचा केंद्रबिंदू होता. गवाणकरांचा भाऊबंद दिवंगत प्रवीण गवाणकर त्याचा अखिल भारतीय नेता होता. मीही एक प्रकल्पग्रस्त भूधारक.

गावातला विरोध हा खोट्या प्रचारावर आधारलेला होता. प्रचंड दहशत माजवून दुसरी बाजूच ऐकायला द्यायची नाही अशी प्रकल्पविरोधकांची रणनिती होती. गावच्या तलाठ्याच्या ऑफिसला टाळे ठोकले गेले. पोलिसाचे रिव्हॉल्व्हर काढून त्याला चोप दिला गेला. साहाजिकच १४४ कलम हा दिनक्रमच झाला. प्रजासत्ताक दिनाला पालकांनी विद्यार्थ्यांना शाळेत पाठवू नका असे धमकवण्यात आले. परिणामी ही देशद्रोहाकडे जाणारी चळवळ होऊ लागली. अनेकांवर खटले भरले गेले. पोलीस केसेस, कोर्टकचेऱ्या वाढल्या. ही एक बाजू. सरकारने कवडीकिमतीने जमिनीचे दर ठरवले होते. हीच विरोधाला पाठिंबा मिळण्याचे मूळ कारण होते. त्याला विविध राजकीय पक्षांनी आपापल्या पोळ्या भाजण्याचे डावपेच आखले. या परिस्थितीत पंचक्रोशीतून विवेकी आवाज उठावा म्हणून मी सहकारी जमा केले. 'विकसनशील पुनर्वसन' ही तात्विक भूमिका घेऊन आमच्या वाढीव मोबदल्याच्या व अन्य मागण्या ठेऊन सर्वप्रथम जमिनीवरचा कर्जाचा बोजा रद्द

**राजा पटवर्धन**

patwardhanraja@Lokmat.com

**परिचय -** गंगाराम गवाणकरांचे मित्र



माडबनजवळच्या जानशी गावचे. त्यांच्या 'जैतापूरचे अणुमंथन' पुस्तकाला ग्रंथाली प्रकाशन डॉ. अनिल काकोडकरांची प्रस्तावना असून महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा 'महात्मा फुले' पुरस्कार (२०१३-१४) प्राप्त आहे. इंडियन न्युक्लिअर सोसायटी (INS) चा अद्वितीय कामगिरी - विज्ञान प्रसार संवाद (२०१४-१५) पुरस्कार मिळाला आहे.

लेखकाचा महाभारताचा व्यासंग असून महाभारत, वैज्ञानिक मनोवृत्ती, पर्यावरण, ऊर्जा, अर्थशास्त्र इ. विषयावर महाराष्ट्रात व्याख्याने देतात. दूरदर्शन व अन्य चॅनल्सवर तज्ज्ञ म्हणून अनेक वेळा सहभाग.

---

करविला. या प्रयत्नात मला गवाणकर बंधुनीच मदत केली. मिलिंद व आबाजी गवाणकर माझ्याबरोबर धाडसाने उभे राहिले. गंगारामही आमच्याबरोबर होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ. त्यांना भांडणे- झगडे न करता कुणालाही न दुखवता प्रकल्पाला समर्थन करायचे होते. अखेर आम्ही लोकांचे प्रबोधन करण्यात यशस्वी झालो. त्याचा साद्यंत इतिहास मी 'जैतापूरचे अणुमंथन' या पुस्तकात दिला आहे. गंगाराम गवाणकरांनी मोबदला स्वीकारला या बातमीने पंचक्रोशीत प्रकल्पसमर्थनाचा जोर वाढला. भगवती देवीच्या पुजाऱ्यानी म्हणजे भुतांनी (गवाणकरच) जमिनीचे पैसे घेतले त्यामुळे विरोधकांचे धार्मिक समर्थन लंगडे झाले. माझ्या व गंगारामसह अन्य समर्थकांच्या नावाने 'क्षुळक्षय' करणारी गाऱ्हाणी घालणारेच देवीच्या कोपाचे बळी ठरले. असो. माडबन गावात आजपर्यंत दोनशे कोटी रुपयाहून अधिक रकमेचे वाटप झाले. गंगाराम गवाणकरांनी त्यांच्या आत्मवृत्तात त्याबद्दल (तिसरी आवृत्ती) एक प्रकरणच लिहिले आहे. वाचकांनी ते जरूर वाचावे. हे आत्मवृत्त अनेकांना प्रेरणा देईल.

माडबनची एक प्रकल्पग्रस्त भगिनी मला भेटली होती. मी तिला विचारलं, 'गंगाराम गवाणकर अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष झाले हे तुला माहिती आहे का?'

'माका सगळा म्हायती हा! आमचो गंगो खयच्या खय गेलो. त्याचा भगवतीदेवी भलाच करणार.' हे तिचे उद्गार जैतापूर प्रकल्पातील वाढीव अनुदानामुळे गंगाराम गवाणकरांचे सर्व कुटुंबीय आज कर्जमुक्त झालेले आहेत. त्याशिवाय 'वस्त्रहरण' चे ए. टी. एम. अखंड चालू आहे. शुभेच्छा!



माझ्या प्रवासाची व्यवस्था केली होती.

८) वर्षभरात मी खालील परिषदेच्या शाखांना भेटी दिल्या. त्यातली महत्त्वाची पुणे शाखा, अध्यक्षपदी निवड झाल्यावर माझे ज्येष्ठ सहकारी डॉ. श्रीराम लागू यांना पुणे शाखेने जीवन गौरव पुरस्कार जाहीर केला. तो प्रदान करण्यासाठी ७ नोव्हेंबर २०१३ ला मी पुण्याला गेलो. आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्याला पुरस्कार प्रदान करण्याचे भाग्य लाभले. त्यावेळी पुण्याच्या परिषदेच्या शाखेला मी प्रस्ताव दिला होता. पुणे महापालिकेने घोले रोडवर छोट्या नाट्यगृहाचे बांधकाम गेली कित्येक वर्षे तसेच अर्धवट पडून आहे ते पुर्ण करून सुसज्ज असे छोटे नाट्यगृह प्रायोगिक नाटकांसाठी खुले करावे. सांगावयास आनंद होतोय की, २२० आसनी हे छोटे नाट्यगृह नुकतेच सुरू झाले आहे.

पुणे शाखेने इतिहासात पहिल्यांदाच ३ व ४ मे २०१४ रोजी बालनाट्य संमेलन भरवले. त्यासाठी पुणे शाखेच्या आमंत्रणावरून दोन दिवस बालनाट्य संमेलनात बाल जल्लोष केला.

पुणे शाखेने जुले २०१४ ला संगीत नाट्यमहोत्सवही आयोजित केला, त्यालाही हजेरी लावली. नुकताच ज्येष्ठ कलाकार मेळावा पुणे शाखेने आयोजित केला असे कार्यवाह पुणे शाखा यांनी मला सांगितले.

नाट्यपरिषदेच्या पुणे शाखेचे कार्य उल्लेखनीय आहे.

९) पिंपरी चिंचवड शाखेला भेट दिली त्यासाठी निमंत्रण मिळाले होते. पिंपरी चिंचवड शाखेतर्फे आशा भोसले यांच्या नावाने जीवन गौरव पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी सुप्रसिद्ध गायक सुरेश वाडकर यांना या पुरस्काराने सन्मानीत केले. याचा आनंद झाला. सोहळा संगीतमय वातावरणात संपन्न झाला.

१०) नाशिक व संगमनेर शाखा

नाशिक शाखेतर्फे २० फेब्रुवारी २०१४ रोजी पुरस्कार सोहळा माझ्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. त्यानंतर २३ व २४ मे रोजी नाशिक व संगमनेर शाखेने आयोजित केलेल्या बालनाट्य प्रशिक्षण कार्यशाळेचा समारोप समारंभ माझ्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. बालकलाकारांना प्रोत्साहन देताना, पारितोषिके प्रदान करतांना त्यांचा आनंदाचा जल्लोष अनुभवला. नाशिक महापालिकेचे छोटे नाट्यगृह बांधून पूर्ण करावे असे मी नाशिक शाखेला सुचविले. त्याचा पाठपुरावा झाला नाही.

११) मुंबईतील मुलुंड शाखेचे ३१ मार्च २०१४ रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर माझ्या हस्ते उद्घाटन झाले. उद्घाटन सोहळा अनेक मान्यवर कलाकार, नाट्य परिषदेचे अध्यक्ष, प्रमुख कार्यवाह यांच्या उपस्थितीत दिमाखात संपन्न झाला. मुलुंड शाखेने पहिल्याच वर्षात नाट्यलेखन कार्यशाळेचे आयोजन केले. हे फार महत्त्वाचे काम करून पुढील वाटचालीची दिशा मुलुंड शाखेने अधोरेखित केली.

१२) बोरिवली शाखा - वर्षभर शैक्षणिक उपक्रम करणारी ही शाखा. शाखेच्या अनेक कार्यक्रमाना हजर राहण्याचे भाग्य मला लाभले.

१३) डोंबिवली शाखा - डोंबिवलीकर ज्येष्ठ साहित्यिक शं.ना.नवरे यांच्या पहिल्या स्मृती दिनाला २७ सप्टेंबर रोजी अध्यक्ष म्हणून उपस्थित राहून शं.नां.च्या स्मृती जागविल्या.

१४) मध्यवर्ती शाखा -

मध्यवर्ती शाखेचे वर्षभरात आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमांचे अध्यक्षपद स्वीकारले. मध्यवर्ती शाखेने हा बहुमान दिला. १४ जून रोजी गो.ब.देवल स्मृतीदिनानिमित्त अनेक कलाकारांना सन्मानित करण्यात आले. या सर्व कलाकारांना सन्मानित करण्याचा आनंद फार मोठा असतो. मध्यवर्ती शाखेने वसंत जाधव खुली एकांकिका स्पर्धा व शाखांतर्गत डॉ. लक्ष्मणराव देशपांडे एकांकिका स्पर्धा-या दोन्हीही स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित केले. तसेच २५ जुलै रोजीही अनेक कलाकारांना सन्मानित करण्यात आले.

मध्यवर्ती शाखेने इतर शाखांना सृजनात्मक कार्यासाठी या एकांकिका स्पर्धा आयोजित केल्या व तेथील स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देणाऱ्या या स्पर्धा दरवर्षी आयोजित होणार आहेत.

मध्यवर्ती शाखा स्वतः वर्षभर कार्यरत राहून इतर शाखानाही कार्यप्रवण करीत आहे. हे सुचिन्ह आहे.

कोकण, विदर्भ, मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र या विभागातील शाखांना भेट देऊ शकलो नाही.

१५) याशिवाय इतर अनेक संस्थांची निमंत्रणे स्वीकारली, कुणाला नाराज केले नाही, दुखावले नाही.

अखिल महाराष्ट्र नाट्यमंदिर समिती सांगली यांचे निमंत्रण स्वीकारले व सुप्रसिद्ध दिग्दर्शक श्री. जब्बार पटेल यांना विष्णूदास भावे जीवन गौरव पुरस्कार ५ नोव्हेंबर या रंगभूमी दिनी प्रदान केला. सांगलीकर रसिकांसाठी हा सोहळा एक महत्त्वाचा असतो. त्यासाठी रसिकांच्या मांदियाळीने भावे नाट्यगृह तुडुंब भरलेले असते.

१६) मुंबई महापालिका आंतरविभागीय नाट्यविभागीय नाट्यस्पर्धेच्या पारितोषिक वितरणाचे प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण स्वीकारले. विजेत्यांचे अभिनंदन केले. महापालिकेच्या या उपक्रमाचे स्वागत केले.

१७) २३ ते २७ नोव्हेंबर या कालावधीत पुलोत्सव

# माजी संमेलनाध्यक्ष अरुण काकडे यांच्या कार्याचा संक्षिप्त अहवाल



१) पंढपूर येथील ९४ व्या नाट्यसंमेलनाध्यक्षपदी माझी निवड झाली. वास्तविक संमेलनाध्यक्षाला काहीच अधिकार नसतात. तरी पण रंगभूमीसाठी माझ्याकडून सकारात्मक कार्य व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. तसा प्रयत्न मी जरूर करीन व वर्षभरात जे कार्य माझ्या कडून होईल त्याचा अहवाल या संमेलनात सादर करीन असे मी कबूल केले होते. त्याप्रमाणे वर्षातील कार्याचा संक्षिप्त अहवाल सादर करीत आहे.

२) त्याआधी महत्त्वाचे सांगायचे म्हणजे मी हे सर्व करणार होतो ते माझ्या नाट्यसंस्थेचा सगळा व्याप सांभाळून. सतत ४४ वर्षे रंगभूमीच्या विकासासाठी कार्य करणारी आमची आविष्कार ही नाट्यसंस्था. वर्षाकाठी किमान तीन नाटकांची निर्मिती, आठ चालू नाटकांचे वर्षभरात सव्वाशे प्रयोग व महत्त्वाचा नाट्यमहोत्सव. या सगळ्यातून वेळ काढून जेवढं करता आलं ते मांडत आहे.

३) अ.भा.म.नाट्यपरिषदेकडे कायमस्वरूपी जागेची मागणी होती व आहे. त्यासाठी लढा उभारला. सामंजस्याने हा प्रश्न सोडवावा म्हणून आम्ही चर्चा केल्या. त्यातून निष्पन्न झालं ते असं. परिषदेने जा.क्र.९६१/२०१४-१५दिनांक २५ नोव्हेंबर २०१४ च्या पत्राद्वारे खालील माहिती सर्वांना दिली.

आपल्या यशवंतराव नाट्य संकुलनात ग्रंथालय, हॉस्टेल, प्रायोगिक/ समांतर रंगभूमीसाठी रंगमंच, मिनी थिएटर इत्यादी बांधकाम करण्यासाठी वाढीव एफ.एस.आय. मिळविण्याचा प्रयत्न सुरू असून त्यासाठी आवश्यक ते नकाशे दस्तावेज महापालिकेत जमा करण्यात आले आहेत.

यावर्षी हे काम मार्गी लागावे अशी आशा आहे.

४) माझ्या अध्यक्षीय भाषणात मी पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला ॲकॅडेमी बद्दल बोललो होतो.

सांगावयास आनंद होतोय की, मार्च २०१४ मध्ये एकूण ९ प्रायोगिक नाटकांचा महोत्सव अकाडेमीने आयोजित केला.

नुकताच युवा महोत्सव व प्रशिक्षण कार्यशालाही आयोजित करण्यात आल्या. महत्त्वाचे म्हणजे रवींद्र नाट्य मंदिराच्या चौथ्या मजल्यावर सुसज्ज असे ४०० आसनी नाट्यगृह प्रायोगिक नाटकांसाठी बांधण्यात येत आहे.

५) शासकीय पातळीवर नाट्यसंस्थांना अनुदान व प्रायोगिक नाट्यप्रयोगांना अनुदान या विषयावर सविस्तर चर्चा केली. या चर्चेतून या वर्षी सकारात्मक निर्णय होईल अशी आशा आहे.

६) दिल्लीत मराठी रंगभूमिनिमित्ताने नाट्यमहोत्सव आयोजित होत असे तो २००० पासून खंडीत झाला आहे. तो पुन्हा सुरू करावा म्हणून मी व श्री. हेजीव यानी संयुक्तरित्या प्रयत्न केले. २०१४ हे वर्ष निवडणुकींचे व आचारसंहितेचे असल्याने या महोत्सवासाठी खर्चाला मंजुरी मिळू शकली नाही पण या वर्षापासून हा महोत्सव दिल्लीत आयोजित होईल अशी ग्वाही दिली गेली आहे. त्याचा पाठपुरावा करणारच आहोत. माझ्या दृष्टीने भारताच्या राजधानीत मराठी नाटकाचा ठसा उमटणे फार महत्त्वाचे आहे. म्हणून हा खटाटोप.

७) नाट्यसंमेलनाध्यक्षांनी परिषदेच्या शाखांना भेटी देवून त्याचे कार्य समक्ष पहावे, जाणून घ्यावे, म्हणून काही आर्थिक तरतूद करावी असे मी सुचविले होते. तथापि, या वर्षात ज्या, ज्या शाखेंना भेट दिली त्यासाठी परिषदेने व स्थानिक शाखेने



# ओजामिनचे जनक



## एल. के. ताटे

**माझा अनुभव** - आज माझे वय ९५ वर्षाचे आहे. वयाच्या ४४व्या वर्षी मधुमेह झाला होता. मी अनेक औषधे घेतली, परंतु त्याचा मला काहीच उपयोग झाला नाही. म्हणून मी आयुर्वेदाचा अभ्यास करून आयुर्वेदिक काढा तयार केला. या काढ्यामुळे मी वर्षभरात नॉर्मल झालो, ते आजतागायत. गेली ४५ वर्षे मी कुठलेही औषध न घेता नॉर्मल असून सुदृढ आहे. मी कुठलेही पथ्य पाळत नाही व कितीही गोड खाऊ शकतो (माझा सध्याचा ब्लड शुगर लेव्हल रिपोर्ट सोबत दिलेला आहे.) माझ्यासारखे मधुमेही नॉर्मल व्हावेत या उद्देशाने हे औषध सरकारमान्य करून, विक्रीसाठी उपलब्ध केले आहे. ह्या औषधाचे नाव आहे ओजामिन.



ओजामिन या औषधाने १) पोट साफ होते. पोटाच्या तक्रारी नष्ट होतात. २) रक्त शुद्ध होते. ३) नैसर्गिकरित्या इन्सुलिन तयार होते. ह्या औषधामुळे अनेक लोकांना फायदा झालेला आहे. डॉ. संजीवनी परब (आयुर्वेदिक) माझ्या औषधाने नॉर्मल झाली आहे. दत्ताराम प्रभू ६५ वर्षाचे गृहस्थ १३ वर्षे मधुमेहाने जर्जर झाले होते. ते इन्सुलीनवर जगत होते. माझ्या औषधाने ते नॉर्मल झाले, ओजामिनमुळे शेकडो लोकांना फायदा झालेला आहे. मला विश्वास आहे की माझ्या एका रुग्णाची शुगर नियंत्रणात आली तर माझं १ दिवसानं आयुष्य वाढतं. ॲलोपॅथिक औषधाबरोबर हे औषध घेण्यास काहीही हरकत नाही. कालांतराने ॲलोपॅथिक औषध बंद करून ओजामिन चालू ठेवल्यास मधुमेह नियंत्रणात येतो. ओजामिन हे औषध इतर आजारासाठीही उपयुक्त आहे. श्री. म्हेत्रे यांना दम्यात फायदा झाला. सौ. पारखी यांना सायनसमध्ये फायदा झाला. या औषधामुळे सौ. आठवले यांच्या दातांच्या हिरड्या बऱ्या झाल्या. श्री. दातार व त्यांचे मित्र (सर्व ज्येष्ठ नागरिक आहेत.) ह्यांनी हे औषध ६ महिने घेतल्यानंतर पूर्णपणे तंदुरुस्त झाले आहेत. तसेच हे औषध सोरायसीस, सांधेदुखी, इत्यादीवरही उपयुक्त आहे. मधुमेह होऊच नये ह्यासाठीही हे औषध उपयुक्त आहे. तसेच संपूर्ण आरोग्यासाठी ओजामिन उपयुक्त आहे. लक्षात ठेवा तुमचे आरोग्य हे तुमचे, तुमच्या कुटुंबियांचे व राष्ट्राची संपत्ती आहे. म्हणून त्याचा ऱ्हास होऊ देऊ नका.

**Dr. (Mrs.) Meena A. Mehesh,** M.D. (Path& Bact.) on Panel or Air India, LIC
**Loboratory :** 1 Khar (W.) Mumbai- 400052    Date : 22/01/2010
Name : Mr. Laxmanrao Tate    Male    Age : 95 Yrs.

| Test | Results | Units | Nornal Range |
|---|---|---|---|
| Fasting | | | |
| Blood Glucose | 72.0 | mgs. % | 60-110 |
| Urine Glucose | Nill | | |
| Ketone Bodies | Nil | | |
| 2 Hours after | Meals | | |
| Blood Glucose | 96.2 | mgs.% | 60-130 |
| Urine Glucose | Nill | | |
| Ketone Bodies | Nill | | |

Done on XL-300 Autoanlyser
Dr. Pallavi Patil
M.B. F.C.P.S. (Path & Bact)

Dr. Meena A. Mahesh
M.D. (Path & Bact)

मुंबई - सुराणा सदन, ७३, बोराबाजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००००१    वेळ सकाळी ११ ते सायं. ६
फोन ०२२-६६३१०९९३ मो. ९३२२८८९२४२
पुणे - संतोषी अपार्ट., आयकर गल्ली, एरंडवणे, पुणे ४११००४    वेळ सकाळी ११ ते सायं ७
फोन ०२०-६५२७०८८४, मोबा. ९३७२२४५२३१

**Email :** tatesremedies@gmail.com **Website:** www. tatesremedies.co.in ISO 9001 : **2008 CERTIFCATION**

# आमचे लाडके नाना 'गंगाराम गवाणकर'


**सुरेश चाफेकर**
सर्व्हे नं. ४८, एम.आय.डी.सी. च्या मागे,
मिरारोड, ता. ठाणे ४०११०४ महाराष्ट्र- भारत


असं म्हणतात की, काही नाती ही रक्ताने नाही तर नशिबाने मिळतात, आणि त्या नात्यांचे नंतर घनिष्ठ नात्यात रूपांतर होते. माझ्या आयुष्यात देखील अनेक माणसे जोडली गेली, पण ह्या माणसांमध्ये स्मरणात राहणारी काही मोजकीच होती, त्यापैकी एक खराखुरा स्वभावाचा माणूस म्हणजे माझा परम मित्र गंगाराम गवाणकर! खरं तर आम्ही मित्र म्हणूनच भेटलो. पण आमच्या नात्यांमध्ये इतका सच्चेपणा, पारदर्शकता आहे की, त्या मैत्रीचे रूपांतर भावा-भावांमध्येच झाले, ते कधी आमच्या घरचे नाना बनले हे मला कळलेच नाही.

त्यांच्या संदर्भात माझ्या अनेक आठवणी आहेत. मला आठवतेय की, आमची भेट त्यांच्या वस्त्रहरण नाटकाच्या प्रयोगाला झाली. त्यांचे मालवणी भाषेवरचे प्रेम पाहून मी तर थक्कच झालो. ज्या माणसाचे बोली भाषेवर इतके प्रेम आहे, तो माणूस माणसांवर किती प्रेम करत असणार? त्या क्षणी हाच विचार माझ्या मनात आला. अखेर आमची ओळख वाढत गेली. आम्ही चांगले मित्र बनलो. माझ्या आयुष्यात अनेक चढ-उतार आले; परंतु तरीही आम्ही दोघांनी आमच्या नात्यांमध्ये कधी कटूता येवूच दिली नाही. नदीच्या संथ वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे तिला वाहू दिले. कारण पुढे त्या नात्याचे रूपांतर एक महासागरात होणार होते व ते झाले हे मला ठाऊक आहे.

नानांनी गरिबी अगदी जवळून पाहिलेली. दारिद्र्य सुखाला पाहून रडणारे डोळे त्यांनी अगदी जवळून पाहिलेत. पायात चप्पल नसलेला अंगावर शाळेचा युनिफॉर्म कधी उभ्या आयुष्यात त्यांना घालायला मिळाला नव्हता. फक्त विचारशक्ती आणि लेखणी हीच एक त्यांची खरी संपत्ती होती. पोटभरचे अन्न मिळेल की नाही ह्याची देखील शंका असायची; परंतु अशाही परिस्थितीत आपल्या दारिद्र्यामुळे नशिबाला दोष न देता, अगदी देवाने दिलेल्या विचारशक्तीचा वापर करून गवाणकरांनी स्मशानात राहून अभ्यास केला. पुढे ह्याच माणसाने त्याच्या हातून एक अजरामर कलाकृतीची निर्मिती केली. पुढे ह्याच नाटकाचे म्हणजेच वस्त्रहरणचे पाच हजारोवर महाविक्रमी प्रयोग झाले. या नाटकामुळे त्यांना खरी ओळख मिळाली; परंतु ते इथेच थांबले नाहीत. त्यांना अजून बरेच लेखन करायचे होते. तसे त्यांनी पुढे केले देखील.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार केला तर माझ्या मते, ते एक माणूस म्हणून खूप चांगले आहेत. गरिबांविषयी आपुलकी, माणुसकी, दुसऱ्यांकडून व्यवस्थित काम करून घेणारा व स्वतः मनापासून काम करणारा, हसणारे आणि हसवणारे असे त्यांचे बहुरंगी व्यक्तिमत्त्व. आम्ही जेव्हा जेव्हा भेटतो तेव्हा जुन्या-नव्या आठवणींमध्ये हरवून जातो. गंगाराम गवाणकर मला प्रेमाने 'डॅडी' म्हणून हाक मारतात. माणसाने माणसाला नाही तर त्याच्या माणुसकीला मान दिला पाहिजे. हे त्यांच्या वागण्यातून दाखवून देतात.

प्रयोगाचे सहस्त्रक ओलांडणारी तीन-तीन नाटके देणारा मराठी रंगभूमीवरील हा एकमेव नाटककार माझा जवळचा मित्र आहे, याचा मला अभिमान आहे. सदैव पराभूत करायला टपलेल्या आयुष्याला पचवून हसत-हसत चिकाटीने उभे राहण्यामागचे गमक त्यांनी शोधले आहे. नानांसारखा खुल्या विचारांचा माणूस लाभणे व त्याच्याशी असलेली नात्यातली बांधिलकी जपणे हे माझ्यासाठी अती मोलाचीच गोष्ट आहे. आज मी माझ्या वयाची सत्तरी ओलांडली तर नानांनी त्यांची पंच्याहत्तरी! पण वयालाही लाजविणारे आमचे जगणे आहे. दोस्ती आहे. मैत्री आहे.

आज, नानांच्या पंच्याहत्तरीच्या सोहळ्यात मला साक्षीदार होण्याचे भाग्य लाभले हे माझे नशीबच! नानांना काव्यातून सांगावसं वाटते की,

सागराच्या संथ प्रवाहाला
किनाऱ्याची साथ आहे,
कधीही साथ सोडणार नाही
असा मैत्रीचा माझा हात आहे
मी नेहमी तुझ्या सोबतच राहिल
कारण,
माणसे जोडणे ही माझी जात आहे!
अन् तोच माझा धर्म आहे.

- नानांचा लाडका
सुरेश चाफेकर



आविष्कारने आतापर्यंत तरुण कलावंतांसाठी ६३हून अधिक नाट्य प्रशिक्षण शिबिरे तसेच मुलांसाठी ६७ शिबिरे आयोजित केली आहेत.

संशोधन व प्रयोगशीलतेने काकांनी लहान मुलांसाठी ३५हून अधिक नाटके, पपेट शोज, नृत्यनाटिकांची निर्मिती केली. दरवर्षी बदलणाऱ्या ३ ते ३० वयोगटातील जवळपास ५० कलावंतांचा समूह सादर करीत असलेल्या 'दुर्गा झाली गौरी' या नृत्यनाटिकेला गेल्या ३० वर्षांपासून प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, चिं.त्र्यं. खानोलकर, शंकर शेष, सत्यदेव दुबे यांसारख्या प्रस्थापित नाटककारांबरोबरच चेतन दातार, चं.प्र.देशपांडे, इरावती कर्णिक, सुषमा देशपांडे यासारख्या नवोदित लेखकांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या नाटकांची निर्मिती करण्यातही काकांनी पुढाकार घेतला.

काकांनी नाट्य दिग्दर्शनात विविध प्रयोग करण्यासाठी ज्यांना प्रोत्साहित केले अशा दिग्दर्शकांमध्ये पं. सत्यदेव दुबे, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, जयदेव हट्टंगडी, चेतन दातार, नीलकांती पाटेकर, प्रतिमा कुलकर्णी, अजित भगत, विजय केंकरे, दीपक राजाध्यक्ष, गिरीब पतके, विश्वास सोहोनी आणि अनेकांचा समावेश होतो.

काकांनी महेश एलकुंचवारांच्या 'वाडा चिरेबंदी', 'मग्न तळ्याकाठी' आणि 'युगान्त' या नाटकांची एकत्रित साडे आठ तासांची त्रिनाट्य धारा ही अभिनव निर्मिती करून त्यांचे ५० प्रयोग केले.

काकांनी बादल सरकार यांच्या अबु हसन या नाटकाचा अनुवाद करून त्याची निर्मिती केली.

आविष्कारमधून काकांनी प्रकाशित केलेले साहित्य :-

**रंगभूमीच्या दृष्टीने महत्त्वाची दोन पुस्तके**

- रंगनायक
- तें आणि आम्ही

**दोन विशेषांक**

- आविष्कार - तिशी
- आविष्कार - चाळीशी

**सहा नाटके**

सावल्या - लेखक चेतन दातार
राधा वजा रानडे - लेखक चेतन दातार
ढोलताशे - लेखक चं.प्र.देशपांडे
बुद्धिबळ आणि झब्बू - लेखक चं.प्र.देशपांडे
जगदंबा - लेखक रामदास भटकळ
बया दार उघड - लेखिका सुषमा देशपांडे

काकांच्या नेतृत्वाखाली आविष्कारने २६ महोत्सवांचे आयोजन केले ज्यात नाट्य प्रेमींना २०५ नाविन्यपूर्ण नाट्यकृतींची मेजवानी मिळाली. यात १५ तरुण दिग्दर्शकांनी दिग्दर्शित केलेल्या विजय तेंडुलकरांच्या नाटकांचे दोन महोत्सव व महेश एलकुंचवारांच्या नाटकांचा महोत्सव यांचा समावेश होतो. नाविन्यपूर्ण कलाकृती आणि कलात्मकता यांना सतत उत्तेजन देण्याचा आपला ध्यास पूर्ण करताना काकांनी कुठलेही शिखर गाठायचे शिल्लक ठेवलेले नाही.

**काकांना मिळालेले काही महत्त्वपूर्ण मानसन्मान**

९४व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष, २०१४
नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, २०१३ (महाराष्ट्र शासन)
संगीत नाटक अकाडेमी पुरस्कार
२०१२ (नाट्य कलेच्या क्षेत्रातील सर्वांगीण योगदानासाठी)
जीवन गौरव पुरस्कार,
२०११ (झी.टी.व्ही मराठी)
सह्याद्री नाट्य रत्न पुरस्कार,
२००७ (सह्याद्री टी.व्ही.)
महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार,
२००५ (महाराष्ट्र शासन)
उत्तुंग गुणी जन पुरस्कार,
१९९९ (उत्तुंग प्रतिष्ठान)
गणेश सोळंकी स्मृती पुरस्कार,
१९८४ (नाट्य दर्पण प्रतिष्ठान)


**हार्दीक शुभेच्छा**


**शिवसेना - शाखा क्र. १४**

**सचिन म्हात्रे**

**शाखा प्रमुख**

कार्यालय - श्रीमती शांताबाई जयराम म्हात्रे मार्ग,
म्हात्रे वाडी, राम नगर, बोरिवली (प.), मुंबई ९२
कार्यालय - २८६४८६७३
मो.९८६७७२७७७४

## महाराष्ट्रातील प्रयोगिक नाट्यचळवळीत साठ वर्षे सक्रीय सहभाग असलेले, 'प्रायोगिक नाटक' हाच एकमेव जीवित हेतू मानणारे एक झपाटलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे अरुण काकडे



### श्री. अरुण काकडे यांचा परिचय

महाराष्ट्रातील प्रयोगिक नाट्यचळवळीत साठ वर्षे सक्रीय सहभाग असलेले, 'प्रायोगिक नाटक' हाच एकमेव जीवित हेतू मानणारे एक झपाटलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे अरुण काकडे.

नाट्यजगतात अरुण काकडे हे त्यांच्यावरील प्रेमामुळे 'काकडे काका' या नावाने ओळखले जातात. 'रंगायन' (सन १९५६-१९७०) आणि 'आविष्कार' (१९७१ ते आजतागायत) अशा दोन प्रायोगिक नाट्यसंस्था यशस्वीपणे चालविणारे 'काकडे काका' म्हणूनच, प्रायोगिक नाट्य चळवळ चालविणारी 'एक सैनिकी फौज' 'One Man Army' आहेत असे म्हटले तर वावगे ठरू नये.

स्वतःत दडलेल्या अभिनेत्याला स्वेच्छापूर्वक रंगमंचावरील झगमगाटापासून दूर ठेऊन प्रायोगिक नाटकाच्या अस्तित्वासाठी, भरणपोषणासाठी, वृद्धिसाठी आणि संशोधनासाठी रंगमंचाच्या पडद्यामागे राहून काकडे काकांनी सातत्याने काम केले. सृजनाच्या अपूर्व नवनवोन्मेषांना, कल्पनांना आणि विचारांना अभिव्यक्त करण्यासाठी एक पवित्र असा रंगमंच हवा या प्रबळ इच्छेपोटी विजय तेंडुलकर, अरविंद आणि सुलभा देशपांडे यांच्या बरोबर १९७१ साली त्यांनी 'आविष्कार' या नाट्यसंस्थेची स्थापना केली. 'आविष्कार' ही 'मातृनाट्य संस्था' म्हणून ओळखली जाते. काकडे काका याच आघाडीवरून समांतर नाट्य चळवळीचे नेतृत्व करीत आहेत.

पन्नासच्या दशकपूर्वार्धात पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्ये शिकत असताना प्रा. भालबा केळकर यांच्या रूपाने काकडे काकांना सुयोग्य शिक्षक लाभला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काकांनी रंगभूमी संदर्भातील कामाचे पहिले धडे गिरविले. यातूनच काकांच्या कार्याचा पाया घातला गेला आणि रंगभूमीच्या संदर्भातील श्रद्धाही सबळ बनल्या.

साठ वर्षे रंगभूमीशी संबंधीत असूनही काका अकारण भूतकाळात न रमता वर्तमान काळात जगत असतात आणि नेहमी भविष्यकाळाचा विचार करीत असतात. भारतातील प्रायोगिक रंगभूमीच्या प्रवासातील मैलाचा दगड मानली जाणारी 'रंगायन' नाट्यसंस्था स्थापन करणारे जे काही समविचारी साठीच्या दशक पूर्वार्धात एकत्र आले होते त्यापैकी 'काका' एक होते. सर्व ललित कलावंतांच्या प्रयोगशीलतेला वाव देणारी 'छबिलदास चळवळ' सत्तरीच्या दशकमध्यात जन्माला आली. या चळवळीच्या संयोजनात आणि संगोपनात 'काका' अठरा वर्षे सहभागी होते.

१९७४ ते १९९२ या कालावधीत काकांच्या भक्कम आधारावर आणि मार्गदर्शनाखाली ५०पेक्षा अधिक प्रयोगिक नाट्यसंस्थांनी छबिलदासच्या रंगमंचावर २००० पेक्षा जास्त नाट्यकृतींचे सादरीकरण केले.

मराठी रंगभूमीच्या इतिहासात २०० हून अधिक नाविन्यपूर्ण कल्पक प्रायोगिक नाट्यकृतींची निर्मिती व त्यांचे ७०००हून जास्त प्रयोग करणारे काकडे काका एकमेव व्यक्तिमत्त्व आहेत. 'Creativity, if rightly pampered and moulded, can create wonders!' यावर काकांचा ठाम विश्वास आहे. संगीत नाट्य आणि पपेट्रीया क्षेत्रातील तज्ज्ञांचा सहभाग व मार्गदर्शनाखाली



# निलकंठ उर्फ गंगाराम गवाणकर




ॲड. प्रकाश लब्धे

मुंबईकरांना सकाळी चहाबरोबर वृत्तपत्र लागते. मलाही ती सवय जडलेली. तो दिवस होता १९ ऑक्टोबर २०१५चा. चहाचा घोट घेत असताना एका बातमीकडे माझे लक्ष वेधले गेले. ती बातमी होती, श्री. गंगाराम गवाणकर ह्यांची नाट्यसंमेलनाध्यक्षपदावर एकमताने झालेल्या निवडीची. ती बातमी वाचून मला आनंद झाला आणि ही बातमी मी माझ्या मित्रांना कळविली. त्यांनीही आपला आनंद मजजवळ व्यक्त केला.

नाट्यपरिषदेच्या नियामक मंडळाच्या बैठकीत श्री. गंगाराम गवाणकर ह्यांच्या नावाला एकमताने पसंती मिळाली आणि त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आणि त्यांनी ९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी वयाच्या ७५व्या वर्षी बसण्याचा बहुमान पटकाविला.

कोकणातील मालवणी भाषेला सातासमुद्रापार नेलेल्या ह्या ज्येष्ठ नाटककार, रंगकर्मी आणि 'वस्त्रहरणकार' म्हणून ओळख असणाऱ्या श्री. गंगाराम महादेव गवाणकर ह्यांचे हार्दीक अभिनंदन!

मालवणी भाषा ऐकताना ती तिखट आणि शिवराळ वाटते. प्रेम आणि जवळीक साधणारी ही मालवणी भाषा, ऐकताना गोडवा आणि आपुलकी वृद्धिंगत निर्माण करते. शिवी ही ओवी वाटणाऱ्या मालवणी भाषेला साहित्यामध्ये जवळजवळ स्थान नव्हतेच; परंतु वि. स. खांडेकर, मधु मंगेश कर्णिक ह्यांच्या साहित्यामध्ये एक दोन वाक्ये मालवणी भाषेमधील आढळायचीच; परंतु मराठी साहित्यामध्ये मालवणी भाषेला सन्मानपूर्वक नेऊन तिला अढळस्थानावर बसविण्याचे कार्य श्री. गंगाराम गवाणकर ह्यांनी केले. एवढेच नाही तर त्यांनी तेथे मालवणी भाषेमध्ये प्रयोगही सादर केले. मी ही मालवणी असल्यामुळे मला त्याचा फार अभिमान वाटतो. एरवी मालवण /कोकण परिसरातील



लोक मुंबई सारख्या शहरी आल्यावर त्यांना मालवणी बोलायची लाज वाटायची. पण आता मात्र मी मालवणी आहे, मी कोकणी आहे, असे अभिमानाने सांगतात. हा परिणाम आहे वस्त्रहरणाचा! आणि त्या नाटकाचे लेखक श्री. गंगाराम गवाणकर ह्यांच्या लेखणीचा!

सन १९६२ सालापासून लेखनक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या श्री. गंगाराम गवाणकर ह्यानी दिलेल्या मुलाखतीत ते म्हणतात, 'मला नाट्यसंमेलनाध्यक्षपद मिळाले हा चमत्कारच वाटतो.

# राम गणेश गडकरींचे स्मारक आजही अधांतरी

# महाराष्ट्राच्या प्रतिभा सम्राटाचे स्मरण!



संजय राऊत

**कीर्ती आणि लोकप्रियता**

राम गणेश गडकरी यांच्या स्मारकाचे काय झाले, असा प्रश्न त्यांच्या चाहत्यांना नेहमीच पडतो. पिढ्या बदलल्या तरी गडकरी यांच्या साहित्याची गोडी कायम आहे. त्यांच्याइतक्या अफाट प्रतिभेचा लेखक, कवी, नाटककार जन्माला आला नाही. गावातल्या सरपंचाचे स्मारक होते, मंत्र्यांचे होते, पण गडकऱ्यांचे स्मारक होऊ शकले नाही. दिलीप गडकरी यांनी हे सर्व प्रकरण पुन्हा समोर आणले. दिलीप गडकरी यांचे आजोबा राम गणेश गडकरी यांचे चुलतभाऊ. गडकरी यांच्या स्मारकाची घोषणा सरकारने केली व शासन आता आपलीच घोषणा विसरून गेले. दिलीप गडकरी यांनी माहिती दिली. भाषाप्रभू कै. राम गणेश गडकरी यांच्या स्मारकाची चर्चा त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजे १९८५-८६ सालापासून सुरू आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तेव्हा वसंतदादा पाटील व सांस्कृतिक, शिक्षण मंत्री विलासराव देशमुख होते. जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता सोहळ्याला राम गणेशांच्या पत्नी श्रीमती (कै.) रमाबाई यांच्यासह हजारो चाहते उपस्थित होते. त्या सगळ्यांसमोर शासनाने गडकऱ्यांचे भव्य स्मारक बांधण्याची घोषणा केली. आज वसंतदादा, विलासराव व गडकरींच्या पत्नी रमाबाईदेखील नाहीत पण गडकरींचे लाखो चाहते मात्र स्मारकाची वाट पाहत आहेत. अर्थात सरकारे बदलली वा खुर्चीवरची माणसे बदलली तरी मुख्यमंत्र्यांची घोषणा ही सरकारची घोषणा असते व सरकारने घोषणांची अंमलबजावणी करायची असते. महाराष्ट्राने गडकऱ्यांवर जेवढे प्रेम केले आणि



त्यांच्या गुणाचे जेवढे कोडकौतुक केले तेवढे कोणत्याही मराठी लेखकाचे केले नाही. मराठी भाषेत नि साहित्यात राम गणेश गडकरी यांना जेवढी कीर्ती आणि लोकप्रियता मिळाली तेवढी या शतकातल्या फारच थोड्या मराठी लेखकांच्या वाट्याला आली असेल. आचार्य अत्रे यांनी मोजक्या शब्दांत गडकऱ्यांचे वर्णन केले ते असे, 'जो कवी असतो तो [illegible] नाटककारही असू शकेल पण तो विनोदकार असू शकणार नाही आणि जो विनोदाचा निर्माता असतो तो नाटककार होऊ शकेल पण उत्तम कवी असू शकणार नाही. मोलियर नि शेक्सपिअर हे दोघेही महान नाटककार होऊन गेले पण मोलियर हा कवी नव्हता नि शेक्सपिअर हा हास्यकार नव्हता. पण गडकऱ्यांनी मोलियर आणि शेक्सपिअरवरसुद्धा मात केली. कारण काव्य, नाट्य आणि विनोद या परस्परविरोधी तिन्ही क्षेत्रात ते सारख्याच दिमाखाने आणि वैभवाने तळपले!'

***राम गणेश गडकरी यांचे स्मारक आजपर्यंत तरी झेलेले नाही. महाराष्ट्र शासनाला ना खंत ना खेद महाराष्ट्र शासनाने ठाणे येथे संपन्न होत असलेल्या ९६ व्या अ.भा.मराठी नाट्य संमेलनात तरी घोषणा करावी आणि तात्काळ स्मारकाचे काम सुरू करावे. राम गणेश गडकरी आणि आचार्य अत्रे ही महाराष्ट्राची दोन नर रत्ने आहेत. त्यांचे भव्यदिव्य असे स्मारक महाराष्ट्रात होणे अगत्याचे आहे.***

***संपादक***

***सत्यवान तेटांबे***

**'राजसंन्या'ची अर्पणपत्रिका**

शिवछत्रपतींच्या चितेत आत्मार्पण करणाऱ्या त्यांच्या आवडत्या इमानी कुत्र्याला आपले 'राजसंन्यास' नाटक अर्पण करण्याची हृदयस्पर्शी कल्पना फक्त गडकऱ्यांनाच सुचू शकते.



झाली गौरी' हे त्या वेळचे एक जबरदस्त लोकप्रिय बालनाट्य होते. पुण्यात ग्रीप्स नाट्यचळवळ ही मुख्यतः रूजविली ती रंगा गोडबोले, विभावरी देशपांडे आणि इतरांनी. तसेच केंद्रे आणि कांचन सोनटक्के यांचेही मोठे योगदान आहे.

परंतु आज बालनाट्य चळवळ काहीशी थंडावली आहे. तसेच तिच्याकडे दुर्लक्ष होत आहे. त्याची कारणे माझ्या मते अशी आहेत-

१) आजकालच्या मुलांना अधिक चॉईस आहे.

२) तंत्रज्ञानामुळे टीव्ही आणि मोबाईल प्रगत, आधुनिक झाला आहे. त्यावर घरबसल्या विविध रियालिटी शोज, सिनेमा, गाणीबजावणी, ॲनिमेशन फिल्मस् बघता येतात.

३) जीवनाचा वेग वाढला आहे.

४) मुलांवर शिक्षणाचे ओझे आहे. त्यांना थिएटरवर जाऊन बालनाट्य बघायला वेळ नाही.

५) बालनाट्य सादर करायला खूप खर्च येतो. थिएटर भाडे, नेपथ्य, पोशाख इ. खर्च संस्थाना आजकाल परवडत नाही.

६) आज जमाना इन्स्टंटचा आहे. मुलांच्या पालकांकडे वेळ नाही. बालनाट्याची तालीम करा, वेळ द्या, यात त्यांना आणि मुलांना रस नाही. त्याऐवजी रियालिटी शोज मध्ये भाग घेतला, प्रसिद्ध असलेल्या गाण्यावर हिरो हिरॉईनप्रमाणे नृत्य केले की लगेच प्रसिद्धी आणि पैसा मिळतो. महागायक, महागायिका, महानर्तकी होता येते. फारसे कष्ट न करता, विनासायास सर्व मिळते. मग कशाला बालनाट्य करा असा एकूण सूर असतो.

**उपाय**

१) शासन आणि नाट्यपरिषदेने संयुक्तपणे बालनाट्य चळवळीला उत्तेजन देणे.

२) आर्थिक तरतूद करणे आणि सवलतीत थिएटर मिळवून देणे.

३) शाळांचे मुख्याध्यापक, प्रतिनिधी यांच्याशी सल्लामसलत करून बालनाट्याची जोपासना करण्याचे प्रयत्न करणे.

४) बालनाट्य लेखकांकरिता कार्यशाळा घेणे.

५) सबंध महाराष्ट्रभर बालनाट्य चळवळीचा प्रसार करण्याकरिता त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञांची समिती नेमणे व प्रत्यक्ष कार्यवाही करणे.

६) उद्याच्या रंगभूमीवरचे कलाकार हे बालनाट्यातून निर्माण होणार आहेत याचा विचार करून राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धांचे आयोजन करणे. ह्या स्पर्धा पुण्यामुंबई पुरत्याच मर्यादित न राहता गावागावातून घेतल्या जाव्यात.

## २) हौशी रंगभूमी, कामगार रंगभूमी

हौस म्हणून नाटकात काम करणारे जे असतात त्यांची रंगभूमी म्हणजे हौशी रंगभूमी. माझ्यावेळी गावागावात अशी अनेक मंडळे होती. बहुतांशी ही मंडळी पूर्वीचे गाजलेले एखादे नाटक रंगमंचावर सादर करायची. मुंबईत त्याला बहुतकरून क्लबची नाटके म्हणतात. नाटक करण्याची जबरदस्त आवड असणारी हौस भागवत असतात. विविध कॉलेजच्या गॅदरींगमध्ये आणि गणेशोत्सवात सादर होणारी नाटके, एस.टी.नाट्य मंडळ किंवा रेल्वे ग्रुप नाटक मंडळी ही खरी हौशी नाट्य मंडळी.

मी मूळची सोलापूरची. जेव्हा मी १५ वर्षांची होते तेव्हा रेल्वेच्या नाट्यमंडळामधून पहिल्यांदा काम केले. तेव्हा जो माझ्या तोंडाला रंगभूमीच्या रंगाचा स्पर्श झाला तो अजूनही तसाच आहे. या रंगभूमीच्या रंगस्पर्शानेच माझ्या आयुष्याला खऱ्या अर्थाने रंगत आणली आहे.

मी नृत्य करायची, गायची पण नाटकातला अभिनय मला नवा होता. सुरुवातीला मला भीती वाटायची, संवाद कसे पाठ करणार याची काळजी वाटायची. पण नंतर रेल्वेतल्या लोकांनी "ललित कला मंदिर" ही संस्था स्थापन केली व त्यांच्या अनेक नाटकातून काम करण्याची संधी मला मिळाली. फैय्याज नावाच्या एका अभिनेत्रीने आयुष्यात जे नाव कमावले त्याची पार्श्वभूमी ही अशी आहे.

### कामगार रंगभूमी

कामगार रंगभूमी ही मुखतः विविध कंपन्यांच्या पाठिंब्यामुळे गाजली, बहरली. अनेक कंपन्या, उदा. टाटा, बजाज, किर्लोस्कर, एस. के. एफ. यांनी कामगारांच्या कलागुणांना दाद देण्याकरिता कामगार नाट्यमंडळे स्थापन केली. राज्यशासनाच्या कामगार स्पर्धेत ही नाट्यमंडळे हिरिरीने उतरायची व नाटके सादर करायची. आजचे रंगभूमीवरचे अनेक यशस्वी, अभिनयकुशल नट हे कामगार रंगभूमीवरून आले आहेत. दिवंगत नट यशवंत दत्त हे त्यातील एक महत्त्वाचे नाव.

### हौशी आणि कामगार रंगभूमीच्या अडचणी

१.टी.व्ही मोबाईलमुळे घरबसल्या करमणूक होते.

२. एक नाटक सादर करणे हाच इतका मोठा व्याप असतो की त्याकरिता फार वेळ खर्च करावा लागतो. सध्याच्या वेगवान जीवनचक्रामुळे माणसांकडे पैसा असतो पण वेळ नसतो.

# बेळगावात संपन्न झालेल्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षा श्रीमती फैय्याज यांचे अध्यक्षीय भाषण



मी फैय्याज. आजच्या नाट्यसंमेलनाची अध्यक्षा, अभिनेत्री आणि गायिका. तुम्हा सर्व नाट्यरसिकांना वडीलधाऱ्यांना, सर्व रंगकर्मींना आदरपूर्वक, प्रेमपूर्वक प्रणाम करते.

मी अभिनेत्री, गायिका असले तरीही लेखिका, समीक्षक नाही. एक कलावंत आणि रसिक प्रेक्षक म्हणून मी आज बोलणार आहे. गेली ५० वर्षे व्यावसायिक रंगभूमीवर काम करत असल्यामुळे माझ्या संग्रही काही अनुभव जमा झाले आहेत. तसेच एक रसिक प्रेक्षक म्हणून मी अनेक नाटकांचा आस्वादही घेतलेला आहे. त्या अनुषगांनेच मी तुमच्याशी हितगुज करणार आहे, गप्पा मारणार आहे, माझे विचार मांडणार आहे.

आपल्या मराठी रंगभूमीला समृद्ध परंपरा आहे, तिला स्वतःची म्हणून एक संस्कृती आहे. मराठी नाट्यआविष्काराच्या विविध पद्धती आहेत. आपली रंगभूमी विविध स्तरांवर,पातळ्यांवर काम करते आहे.

मला असं वाटतं की मराठी रंगभूमी ही एखाद्या विशाल वटवृक्षासारखी आहे. जिला अनेक शाखा आहेत, मुळं आहेत. त्या सगळ्यांच्या सहकार्याने, प्रेरणेने, प्रयत्नाने या रंगभूमीचा महान वृक्ष चैतन्याने सळसळतो आहे. मग आपण असे म्हणू या की बाल, हौशी, कामगार, प्रायोगिक/समांतर, लोककला, संगीत आणि व्यावसायिक या नाट्यवृक्षांच्या शाखा आहेत. आणि मुळं आहेत ती भारतीय संस्कृतीची, परंपरेची.

मी या विविध प्रकारच्या शाखांचा माझ्यापरीने धांडोळा घेणार आहे. माझे त्यात असलेले योगदान नमूद करणार आहे. त्याची बलस्थाने, पूर्वीची स्थिती, सद्य स्थिती आणि त्यातल्या त्रुटी, उपाय माझ्या बुद्धीनुसार, क्षमतेनुसार मांडणार आहे.

माझी एकच इच्छा आहे की आपली ही मराठी रंगभूमी सर्वार्थानं समृद्ध व्हावी, संपन्न व्हावी, परिपूर्ण व्हावी, आशयघन व्हावी आणि तिचा लौकिक त्रिखंडात पसरावा.

## १) बालरंगभूमी

मी मुंबईत आले तेव्हा बालरंगभूमीवर अनेक बालनाट्य जोरात चालू होती. तेव्हा सुधाताई करमरकर हे नाव प्रकर्षाने चमकत होते. त्यांच्या अनेक बालनाट्यांसाठी तेव्हा मी गायले होते. रंगभूमीवरच्या अनेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कलावंतांनी त्यात भूमिका केल्या होत्या. वानगीदाखल दोन नावे सांगते-काशिनाथ घाणेकर, भक्ती बर्वे.

तसेच सुलभा देशपांडे, रत्नाकर मतकरी, आविष्काराचे काकडेकाका यांनीही बालरंगभूमीसाठी खूप काम केलं आहे. 'दुर्गा



त्यांच्या 'एकच प्याला'ने तर इतिहास निर्माण केला. गडकऱ्यांच्या लेखनातील पानापानांवर शेकडो सुवासिक सुभाषितांची पखरण झालेली आढळते. 'पुरुष परमेश्वराची कीर्ती आहे तर स्त्री ही परमेश्वराची मूर्ती आहे. रामाशी मन रमल्यावर माकडाशी मिठ्या मारण्यात काय अर्थ आहे? पाणी चंचल आहे, पण मन पाण्याहून चंचल आहे. जगण्यासारखे जोपर्यंत जवळ आहे तोपर्यंत मरण्यात मौज आहे' असे भाषेचे अलंकार त्यांनी उधळले. त्या अलंकारांचे तेज आजही कायम आहे. राम गणेशांचा जन्म गुजरातमधील नवसारी येथे झाला. (२६मे १८८५) नवसारीत त्यांनी दोन वर्षे गुजरातीत शिक्षण घेतले. नंतर रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील शाळेत ते आले. उत्तुंग मराठी भाषेचा पाया येथेच घातला व पुढील शिक्षणासाठी ते (१९०५) पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजात आले. नवसारीत जन्मलेल्या गडकरी यांनी नागपूरजवळच्या सावनेरला अंतिम श्वास घेतला. २३ जानेवारी १९१९ रोजी ते हे जग सोडून गेले. म्हणजे २०१९ हे गडकरींचे स्मृती शताब्दी वर्ष. अवघी ३३ वर्षे ७ महिने आणि २८ दिवसांचे आयुष्य त्यांना लाभले. ते अल्प आयुष्य त्यांच्या साहित्यामुळे अमर आहे. त्यांचे साहित्य हेच त्यांचे चिरंतन स्मारक. पण ज्या राम गणेश गडकरींनी महाराष्ट्राला मराठी भाषेचा डौल दिला तो महाराष्ट्र गडकरींचे ऋण कधी फेडणार?

**व्यसनमुक्तीसाठी 'एकच प्याला'**

गडकरी यांच्या नावाने दादरच्या शिवसेना भवनसमोर गडकरी चौक आहे. हे कार्य शिवसेनेने केले. ठाण्यात गडकरी रंगायतनही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे झाले. महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी विनोद तावडे यांनी राम गणेश गडकरी यांच्या स्मारकाचे मनावर घ्यायला हवे. अरबी समुद्रात शिवरायांचे स्मारक आपण उभारीत आहोत असे भव्य स्मारक नको, पण त्यांचे शिक्षण ज्या रायगड जिल्ह्यात झाले त्या सांगवी (ता. कर्जत) गावी हे भव्य सभागृह बांधून तेथे राम गणेशांचे जीवनपट व त्यांचे उत्तम साहित्य कायमस्वरूपी ठेवावे. गोविंदाग्रज म्हणून त्यांनी ज्या उत्तम कविता लिहिल्या त्यातील निवडक कविता ग्रॅनाईट दगडावर कोराव्यात. पुण्याच्या ज्या फर्ग्युसन कॉलेजात गडकरी शिकले व सावनेर येथे त्यांनी देह ठेवला तेथे त्यांच्या नावाने छोट्या वास्तू उभ्या केल्या तरी मोठे काम होईल. व्यसनमुक्ती व दारूबंदीसाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करते. त्याऐवजी गडकरींच्या 'एकच प्याला' तले मद्यपानाच्या दुष्परिणामाचे त्याचे ज्वलंत उपनिषद वाचा,

'आता या रिकाम्या प्याल्यात काय दिसतं तुला? काबाडकष्ट उपसून आलेला थकवा घालवण्यासाठी दारू पिणाऱ्या मजुरांच्या या पाहा झोपड्या! निरुद्योगाचा वेळ घालविण्यासाठी म्हणून दारू पिणाऱ्या श्रीमंतांच्या या पाहा हवेल्या! प्रतिष्ठितपणाचे लक्षण म्हणून चोचल्याने दारू प्यायला शिकलेल्या पढतमूर्खांचा हा पाहा तांडा! उद्योगी गरीब, आळशी श्रीमंत, साक्षर पडतमूर्ख, निरक्षर व्यवहारी या सर्वांना सरसकट जलसमाधी देणारा हा पाहा एकच प्याला! दारूबाज नवऱ्याच्या बायकांची ही पाहा पांढरी फटफटीत कपाळे! दारूबाजाच्या पोरक्या पोरांच्या उपासमारीच्या ऐका या किंकाळ्या! स्त्री जातीला नटवण्यासाठी समुद्राच्या उदरातून जितकी माती बाहेर निघाली त्यांच्या दसपट आसवांची मोती दारूमुळे स्त्री जातीने या एकच प्याल्यात टाकली आहेत! जगावर अंमल चालविणारा सिकंदर दारूच्या अमलाखाली मारेकरी बनून तो पाहा आपल्या जिवलग मित्राचा खून करीत आहे! मेलेल्यांना सजीव करणारा दैत्यगुरू शुक्राचार्य तो पाहा आपल्या त्या संजीवनीसह या एकच प्याल्यात स्वतःच मरून पडलेला आहे! जगाच्या उद्धारासाठी अवतरलेल्या श्रीकृष्ण परमात्म्याचे हे पाहा छप्पन्न कोटी यादव वीर दारूच्या एकच प्यालात बुडून अधःपातन भोगीत आहेत!'

असा प्रतिभासम्राट होणे नाही. दिवंगत उद्योगपतींना 'पद्म' पुरस्कार व 'भारतरत्न' सहज दिले जातात. गडकरींसाठी महाराष्ट्राचे सरकार काय करणार आहे?

With Best Compliments From

**Sagar S. Jadhav** (D.F.M.L.I.)

LIC, GIC, MUTUAL FUNDS ADVISOR

LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
Premium Collection Centre

145/1, Pansare Bldg., S.G.Road, Arthur Road Naka,
Chinchpokali, Mumbai- 400011

Mob. 9820379639/9820369639

Email:s.jadhav27674@yahoo.com/
s.jadhav27674@gmail.com



बाळासाहेब ठाकरे



आदित्य ठाकरे



उद्धव ठाकरे



# श्री. भरतशेठ गोगावले

**आमदार -महाड विधानसभा**


'मनोरा' आमदार निवास, सी-३१ नरीमन पॉईंट, मुंबई - ४०००३२
मध्यवर्ती कार्यालय - 'कांगोरीगड' प्रभात कॉलनी, महाड शहर
निवास - 'शिवनेरी' मु. ढालकाठी, पो. बिरवाडी, ता.महाड जि. रायगड
भ्रमणध्वनी - ९४२२०९५८८९ टेलिफॅक्स - ०२१४५- २५००८८
Email:bharatsheth.gogavle@gmail.com

राजू जाधव - पी.ए
७६७८०८८५००




## नूतन वर्षाभिनंदन

तिमिरातून प्रकाशात येताना
खुणावतात नव्या पाऊल वाटा
जुन्याने कूस बदलली
नवी पालवी उमलली
सहिष्णु, असहिष्णु सारेच वाद
नवे आले वर्ष २०१६
सुसंवादास...
संकल्पे नवे, नवी उभारी...
आनंद देण्यासाठी-घेण्यासाठी!
सुसंवादी नववर्षाच्या
स्नेहमयी शुभेच्छा!!


**सुरेश चाळके**
३३१/२, हरिदास बिल्डिंग, तानाजी चौकाजवळ,
न्युमिल रोड, कुर्ला (प.), मुंबई -४०००७०
दूर. २६५०४३०३


हार्दीक शुभेच्छा

# श्री. किसन खरोसे

**सामाजिक कार्यकर्ते**

आसन पोई, ता. महाड, जि. रायगड
मो. ९८५०७५६१६६

## खंत ना श्रमांची

विश्व सकळ सतत खपत खंत ना श्रमांची
भावी काळ दावी त्यास आस वैभवाची
विणुनी कोळी तंतूजाळ
नयन रम्य अति विशाल
बघत बसे टक लावूनी
भक्ष्य अडकवण्याची ॥
नाविक नाव वल्हवीत
दूर नेई सागरात
पसरिशी जाळे टक लाऊनी
मत्स्य अडकण्याची
बैलांसवे शेतकरी औत धरी
गोल फिरे शेतकरी
सोन्यासम पीक लाविले
पैसे मिळविण्याची ॥
संगीत धागे मागावरी
हा हा म्हणता वसन भारी
कीमत खूप येईल
स्वप्ने विणकऱ्याची ॥
आंचळांतुनी गोरस दुहिला
कासंडीभर दूध भरता
क्षीराचेही कांचन होईल
हसते मन गवळ्याचे ॥
कुंभाराचे चाक फिरे गरगरा
कुंभ घेईल आकार भरभरा
हायत नेऊन पैसे घेऊन
पैसे मिळविण्याची ॥
श्रमिक श्रमती भान विसरती
भविष्य उजळे हीच एक आस त्यांची
खंत ना श्रमांची


**नलिनी संझगिरी**
मुंबई -४
फोन - ०२२- २८६७७५८६